सोलापूर तरुण भारत
आसमंत

**होळी आणि धूलिवंदन हे वर्षाखेरीस साजरे होणारे सण आपल्याला वेगळ्या आध्यात्मिक उंचीवर नेणारे आहेत. अग्नी कोणताही भेदाभेद न करता अमंगल नष्ट करण्याचे काम करतो. कोणतेही अवशेष मागे न ठेवता नाश करणे, हा त्याचा गुणधर्म आहे. तेव्हा त्याचाच आधार घेत मनातील अमंगल विचारांची आहुती देत, षड्विकार पंचमहाभूतांमध्ये विलीन करत निर्मळ होण्याचा विचार हे सण देतात आणि तेव्हाच आतून शांत वाटते...**

# दुष्ट भावना शमवणारा दाह



विशेष
भावार्थ देखणे
संत साहित्याचे अभ्यासक

वेगवेगळ्या रूढी आणि पद्धतींनिशी साजरा होणारा होळी आणि धुळवडीचा दिवस भारतीय संस्कृतीमध्ये वेगळे महत्त्व राखून आहे. होळीच्या दिवशी होलिकेचे दहन केले जाते. यामागील पौराणिक कथेकडे पाहिले तर हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला मारण्यासाठी होलिकेला आवाहन केले होते. त्यानुसार कोणत्याही प्रकारच्या अग्नीमध्ये न जळण्याचे वा भस्म न होण्याचे अभय असणारी होलिका प्रल्हादाला मांडीवर घेऊन बसली खरी; पण त्याच्या भक्ती आणि सामर्थ्यासमोर तिचे हे अभयही कुचकामी ठरवले आणि प्रल्हादाला भस्मसात करू पाहणारी होलिकाच जळून खाक झाली. प्रल्हाद सुखरूप राहिला. या रूढ कथेचे स्मरण करत आजही आपण होळी पेटवतो. इथे प्रल्हाद भक्त आहे तर होलिका विकृती आहे. म्हणूनच आजही आपण विकृती आणि विकारांचे दहन करण्याचा विचार या कृतीद्वारे मांडतो. ही प्रतीकात्मकता होळीच्या निमित्ताने बघायला मिळते. होळी पेटवून त्यात वाईट असेल त्या सगळ्याचे दहन करण्याचा विचार असतो. मग यात चिपाडे, जुने सामान, वठलेली लाकडे हे सगळे टाकले जाते तेव्हा त्याच्या जळणातून वाईट प्रवृत्तीही जळते, असे आपण मानतो.

जाळून टाकण्याची ही पद्धत मृत शरीरासंबंधीही वापरली जाते. आपल्याकडे मृतदेह जाळतात. कारण अग्नीमध्ये समग्र नष्ट करण्याचे सामर्थ्य आहे. तो कोणताही अवशेष ठेवत नाही. त्यामुळेच मृतदेह जळतो तेव्हा त्यातील सगळे घटकही पंचमहाभूतामध्ये विलीन होतात. त्याचे कोणतेही अवशेष राहात नाहीत. याच न्यायाने आपण माणसाच्या मनात वास करणारे काम, क्रोध, लोभ, मद, मोह आणि मत्सर या षड्विकारांचे होळीच्या रुपकातून दहन करतो आणि वाईट प्रवृत्ती नष्ट झाल्यानंतरच्या शुद्धतेचा, निर्मळतेचा आनंद घेतो. शेवटी अग्नी हे सोवळे आहे. कोणतेही दोष राहू नयेत म्हणून गृहिणी वा पुजारीही सोवळे नेसून काम करतात. यायोगे स्वयंपाक वा पूजा निर्दोष, निर्भेळ व्हावी हा विचार असतो. त्या दृष्टीने पाहायचे तर अग्नी हे सर्वात मोठे सोवळे आहे, असेही म्हणता येईल. कारण अग्नीपुढे काहीही टिकत नाही. म्हणूनच तो सर्वात शुद्ध आहे. याच गुणांमुळे कदाचित पूर्वी स्वत:चे निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी अग्निपरीक्षा द्यावी लागत असावी. मथितार्थ इतकाच की, अग्नी कोणालाही क्षमा करत नाही. जळण्याच्या अवस्थेतील प्रत्येक गोष्ट त्यात जळतेच. त्याच्या ठायी भेदभाव नाही. म्हणूनच अशा या अग्नीमध्ये सगळे विकार, अपप्रवृत्ती, मनातील अढी यांचे अर्पण करायचे, खाक करून टाकायचे, जाळून टाकायचे; म्हणजेच होळी साजरी करायची. आजही याच भावनेने आणि भूमिकेतून होळीचा सण साजरा होतो. शरीर जळल्यानंतर आत्मा मुक्त होतो तसेच वाईट विचारांची आहुती दिल्यानंतर मन शांत आणि शुद्ध होते, हा आपल्या संस्कृतीने दिलेला विचार अत्यंत महत्त्वाचा वाटतो. याच गुणधर्मामुळे यज्ञामध्येही अग्नीचा वापर होतो. कारण वातावरण शुद्धतेसाठीही अग्नी महत्त्वाचा आहे. वातावरणातील अयोग्य, घातक, त्रासदायक घटक नष्ट करण्याची शक्ती आणि क्षमता त्याच्यामध्ये आहे. त्यामुळेच यज्ञाची जागा स्वच्छ करण्यासाठी अग्निकुंड प्रज्वलित करण्याची पद्धत पूर्वीपासून बघायला मिळते.

आज 'सॅनिटेशन' हा सगळ्यांच्या परिचयाचा शब्द आहे. मात्र, अग्नी हाच सृष्टीतला सगळ्यात मोठा आणि महत्त्वपूर्ण सॅनिटायझर आहे. अग्नीमुळे सगळे विकार जळतात. आसपासचे सगळे सोवळे, साजिरे होते. म्हणूनच होळीच्या निमित्तानेही अग्नीमध्ये जुनेरे, नकारात्मक असणारे सगळे जाणून त्यापासून मुक्त होण्याची कल्पना नवचैतन्य देणारी ठरते. अशा प्रकारे होळीमध्ये सगळी नकारात्मकता जळून नष्ट झाली की, माणसे अग्नीभोवती फिरत बोंब मारतात. ही कृतीही माझ्यामध्ये कोणाप्रती काहीही कील्मिष राहिलेले नसल्याची भावना दाखवणारी आहे. त्यामुळेच प्रत्येकाचे नाव घेत, बोंब मारत नकारात्मकतेच्या, विखाराच्या, मनभेदाच्या ओझ्यातून आपण मोकळे होतो. मी या सगळ्या दुष्ट भावना अग्नीला अर्पण करून टाकल्या असून त्यापासून मक्त झाल्यामुळेही बोंब मारतो आहे, असे या कृतीतून भगवंताला आपण सांगत असतो. त्याचवेळी आता माझ्यामध्ये कोणत्याही प्रकारचा विद्वेष राहिलेला नाही, याची खात्रीही देत असतो. त्यामुळेच होळी ही विकारविरहित होण्याची एक प्रक्रिया आहे, असेही आपण म्हणू शकतो. कोणतीही जुनी वस्तू कुजणे आणि ती जाळणे यात फरक असतो. समजा लाकूड कुजले तर त्यात अनेक घातक जीवाणू, विषाणू निर्माण होत वसती करू शकतात. म्हणूनच अशी लाकडे गोळा करायची, रचायची आणि नंतर विधिपूर्वक जाळायची हा पूर्वी होळीच्या निमित्ताने पाहायला मिळणारा सामूहिक उत्सव असायचा. आजही अनेक ठिकाणी हे काम याच पद्धतीने पार पडते. होळीत प्रज्वलित झालेल्या अग्नीला पुरणाच्या पोळीचा नैवेद्य दाखवला जातो. शुद्ध आणि पवित्र असणाऱ्या अग्नीला श्रीफळ अर्पण केले जाते. अशाप्रकारे भाजलेल्या श्रीफळाचा नैवेद्य वाटला जातो. एकूणच ही सगळी क्रिया वा उत्सव अंधाराकडून उजेडाकडे नेणारा संस्कृतीचा विचार दाखवतो. आपली संस्कृती अस्वच्छतेकडून स्वच्छतेकडे नेणारी आहे. ती देदीप्यमान असणाऱ्या सगळ्याची पूजा करणारी आहे. आपण सूर्यउपासक आहोत. तेव्हा या निमित्ताने आरोग्य, मन आणि बुद्धीला घातक असणारे सगळे तुझ्यात सामावून घे, अशी याचना करत आपण अग्नीभोवती प्रदक्षिणा घालतो आणि होळीचा सुंदर सण साजरा होतो.


होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदन साजरे होते. या दिवसाचा संदर्भ आपल्याला थेट कृष्णाच्या बाललीलांपर्यंत घेऊन जातो. गोकुळामध्ये कृष्णाच्या लीला रंगल्या. त्यामध्ये त्याने नानाविध पद्धतीचे खेळ खेळले. यातच होळीच्या माध्यमातून त्याने रंग खेळला, हे आजचे त्याचे स्वरूप दाखवले जाते. तेव्हा नक्कीच नैसर्गिक रंगांचा वापर करून खेळ खेळले जात असतील. हाच संदर्भ घेत आता कृत्रिम रंग वापरून धुळवड खेळली जाते. तसे पाहायचे तर माणसाला पूर्वीपासूनच रंगांचे विलक्षण आकर्षण आहे. प्रत्येकाला सप्तरंग खुणावतात. आकाशात इंद्रधनुष्य दिसले की अगदी केस पिकलेल्या माणसाच्या ओठांवरही हास्य विलसते. कारण आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात, भावनाविश्वात रंगाचे वेगळे स्थान आहे. रंगच नसते तर आपले आयुष्य किती बेरंगी, निरस झाले असते... खरे तर हा विचारही नकोसा वाटतो. त्यामुळेच आपल्या मनात रंगांची एक ओळख निर्माण झाली तर दुसरीकडे रंगांमुळेही प्रत्येक घटकाला नवी ओळख दिली. जसे की, हिरव्या रंगाने झाडांना, वृक्ष-लतांना ओळख दिली, काळ्या वा तांबड्या रंगाने मातीला ओळख दिली. निळ्या रंगाने पाणी तसेच ढगां ध्ये रंगांची पेरणी केली. तेव्हा रंगच नसते तर या घटकांची ओळखही संपली असती. वैविध्य निर्माणच झाले नसते. पृथ्वीच्या या महाप्रचंड गाड्यामध्ये रंगांच्या माध्यमातून आपण स्वत:चे अस्तित्व दाखवू शकलो. थोडक्यात, रंग त्या त्या गोष्टीचे अस्तित्व सांगत असतात. तेव्हा होळी वा धूलिवंदनाच्या दिवशी अशा या सर्वव्यापी रंगांचे लेपन होते. पण हा केवळ अस्तित्व देणाऱ्या रंगाचा उत्सव नसतो तर त्याची उधळण असते. उधळण होते तेव्हाच ते एकमेकां ध्ये मिसळून जातात, एकत्र होतात. अशा एकत्रित होण्यामधून मिळणारा आनंद वेगळाच असतो. म्हणूनच होळी वा धुळवडीच्या सणामध्ये माझा, तुमचा रंग म्हणजे आपल्या दोघांच्याही आवडीनिवडी, ओळख एकत्र करण्याचा आणि त्याची उधळण करत एकता साधण्याचा विचार पुढे येतो. अशा प्रकारे एकता साधली की अद्वैत निर्माण होणे सहज आणि स्वाभाविक होते. आध्यात्मिकदृष्ट्या बघायचे तर हाही एक वेगळा खेळ आहे. त्याचा आनंद घेता येणे गरजेचे आहे. एकत्र येऊन 'अवघा रंग एक झाला...' या भावनेचा अनुभव घेत असताना आपसूकच आनंद मिळतो. एकदा हे साधले तर श्रीरंगाची गाठ पडते. त्याच्या समीप जाता येते. ते तत्त्व जाणून घेता येते आणि जगण्याचा रंगीत सोहळा साजरा होतो. कृष्णाचा हा खरा रंग असीम आनंद देऊन जातो. म्हणूनच आताही आनंदाची, म्हणजेच रंगांची उधळण करत हे दोन्ही दिवस साजरे करायचे आहेत.

धूलिवंदनाच्या दिवशी आपण उभे राहतो त्या मातीलाही वंदन केले जाते. आपण या मातीतच जन्म घेतो आणि अखेरीस तीच आपल्याला स्वत:मध्ये सामावून घेते. तेव्हा तिच्याप्रतीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीही देहावर मातीचे लेपन करण्याचा विचार या सणामध्ये आला असावा. शास्त्रीयदृष्ट्या बघायचे तर मातीमध्ये शरीराला लाभकारक ठरणारे अनेक गुणधर्म असतात. आजही चेहरा उजळवण्यासाठी युवती मुलतानी मातीचा लेप लावतात. निसर्गोपचारामध्ये वेदनाशमनासाठी बाधित भागावर मातीचा लेप लावला जातो. तेव्हा याप्रतीची जागरूकता, विचार निर्माण होण्याच्या दृष्टीनेही एरवी पायाखाली तुडवली जाणारी माती मस्तकी धारण करून तिचा सन्मान करण्याचे हे औचित्य विचार आणि आचाराची महानता दाखवून देणारे आहे.

---

# इस्त्रायलचा 'षटकोन' हा भारताचाही दृष्टिकोन...!

लक्ष्यवेध
अनय जोगळेकर



इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील तीव्र संघर्ष आणि गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धाच्या सावटाखाली, भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इस्त्रायल दौरा संपूर्ण जगाच्या आकर्षणाचे केंद्र बनला. इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यासाठी ही भेट केवळ एक औपचारिक राजनैतिक सोहळा नाही, तर ती त्यांच्यासाठी एका 'धोरणात्मक संजीवनी'सारखी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी इस्त्रायलला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान म्हणून त्यांनी इतिहासात नाव नोंदवले आहे. इस्त्रायलचा दौरा अवघा दोन दिवसांचा असला, तरी या दौऱ्यामध्ये त्यांनी इस्त्रायलच्या संसदेला संबोधित केले. जिथे त्यांना संसदेचा सर्वोच्च सन्मान, नेसेट पदक अध्यक्ष म्हणून सन्मानित करण्यात आले. नेसेटला संबोधित करताना मोदींनी इस्त्रायलवरील हमास हल्ल्याचा निषेध केला. संरक्षण, अत्याधुनिक तंत्रज्ञान, शेती, जलव्यवस्थापन, सायबर सुरक्षा आणि दहशतवादविरोधी सहकार्य या क्षेत्रांत दोन्ही देशांमधील भागीदारी अधिक मजबूत करण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे सभापती अमीर ओहाना यांनी नमूद केले. सन्मान स्वीकारताना पंतप्रधान मोदी यांनी हा गौरव विनम्रतेने स्वीकारत असल्याचे सांगितले. त्यांनी हा सन्मान भारत-इस्त्रायल मैत्रीला समर्पित असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या भाषणानंतर नेसेटमधील सदस्यांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. नेसेटला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी इस्त्रायलवरील दहशतवादी हल्ल्यांचा तीव्र निषेध व्यक्त केला. भारताला अनेक वर्षे दहशतवादाचा सामना करावा लागला आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याने दोन्ही देशांतील सुरक्षा सहकार्य अधिक दृढ होण्याचे संकेत मिळाले. गेल्या वर्षी झालेल्या द्विपक्षीय गुंतवणूक करारामुळे आमच्या व्यवसायांना चालना मिळेल.' 'गेल्या काही काळापासून भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे. भारताने इतर देशांसोबत अनेक महत्त्वाचे व्यापार करार केले आहेत. आता आम्ही लवकरच जगातील पहिल्या तीन अर्थव्यवस्थांमध्ये सामील होऊ.' दोन दिवसीय इस्त्रायल दौऱ्यावर दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चा पार पडली. संरक्षण सहकार्य, प्रगत तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि दहशतवादविरोधी उपाययोजना यांसारख्या विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. या दौऱ्यादरम्यान भारत आणि इस्त्रायलने संरक्षण करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून, त्याद्वारे इस्त्रायलमधील संवेदनशील संरक्षण तंत्रज्ञान भारताला मिळू शकणार आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या इस्त्रायलच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत बोलताना बेंजामिन नेतान्याहू यांनी सांगितले की, आम्हाला उच्च तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वांटम क्षेत्रातील सहकार्य वाढवायचे आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, नेतान्याहूंनी मोदींच्या दौऱ्याला युरोप, उत्तर आफ्रिका, तसेच मध्य, पश्चिम आणि दक्षिण आशियातील देशांच्या षट्कोनाशी जोडले. नेतान्याहूंचे म्हणणे आहे की, या भागात 'शिया' आणि 'सुन्नी' मूलतत्त्ववादाचा शस्त्र म्हणून वापर करू पाहणाऱ्या देशांविरुद्ध हे देश एकत्र उभे राहतील. नेतान्याहूंच्या या वक्तव्याची अनेक अरब मुस्लीम देशांमध्ये दखल घेतली गेली. पश्चिम आशियातील राजकारणावर गेली अनेक दशके 'सुन्नी' विरुद्ध 'शिया', तसेच 'अरब' विरुद्ध 'पर्शियन' राजकारणाचा प्रभाव झाला. पण, गेल्या वर्षी अमेरिका आणि इस्त्रायलने इराणविरुद्ध हवाई हल्ले करून त्याच्या अण्वस्त्र तंत्रज्ञान प्रकल्पांचे मोठे नुकसान केले.

आपल्या कारवाईपुर्वी त्यांनी इराणची हवाई हल्लेविरोधी यंत्रणा निकामी केली. इराणचे समर्थन असलेली सीरियातील अनेक दशकांपासून आलेली बशर अल असद यांची राजवट उलथवून तेथे तुर्कीये, कतार आणि सौदी अरेबियाचे समर्थन असलेली अहमद अल शरा यांची राजवट आली. यामुळे इराणचा लष्करी, आर्थिक आणि प्रादेशिक प्रभाव मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे. अमेरिका आणि इराणमधील युद्धामध्ये अमेरिकेला इराणची राजवट उलथवून टाकण्यात यश मिळाल्यास पश्चिम आशियात मोठी पोकळी निर्माण होणार आहे. या घटनांमुळे पश्चिम आशियातील समतोल मोठ्या प्रमाणावर बिघडला असून, सौदी अरेबिया विरुद्ध संयुक्त अरब अमिराती यांच्यामधील शीतयुद्धाला तोंड फुटले आहे. तसे बघायला गेले, तर सुरुवातीच्या काळात सौदी अरेबियाचे युवराज आणि आताचे पंतप्रधान महंमद बिन सलमान संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष महंमद बिन झायेद अल नाहयान यांना आपला आदर्श मानून राजकारणात आले. ज्याप्रकारे महंमद बिन झायेद यांनी आपल्या देशाला तेल आणि नैसर्गिक वायूवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेपासून दूर नेऊन वित्त, गुंतवणूक, तंत्रज्ञान, गृहनिर्माण आणि पर्यटनकेंद्री अर्थव्यवस्था बनवले; तसे सौदी अरेबियाच्या बाबतीत करण्याचा महंमद बिन सलमान यांचा प्रयत्न होता. सौदी अरेबियातील नागरिकांची संख्या सुमारे ५८ टक्के, म्हणजेच दोन कोटींहून जास्त असून, संयुक्त अरब अमिरातीतील नागरिकांची संख्या अवघी १५ लाख म्हणजे एकूण लोकसंख्येच्या १५ टक्के आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये सौदीने अनेक सुधारणा हाती घेतल्या असल्या, तरी तेथील लोकसंख्येवर चार दशकांहून अधिक काळ इस्लामिक मूलतत्त्ववादाचा प्रभाव आहे. संयुक्त अरब अमिरातीने दूरदृष्टीने महत्त्वाच्या सागरी व्यापारी मार्गांवर बंदरे आणि त्याभोवतीच्या व्यापारी क्षेत्रांमध्ये गुंतवणूक केली. गुंतवणूक करताना परताव्याचा विचार केला, तसेच त्या देशातील राजकीय परिस्थितीपेक्षा स्वतःच्या गुंतवणुकीच्या सुरक्षेकडे लक्ष दिले. याउलट, सौदी अरेबियाने आपल्याकडील तेलाचा पैसा वापरून शेकडो अब्ज डॉलरची गुंतवणूक असलेले प्रकल्प सुरू केले. तेलाच्या किमती पडल्यामुळे, तसेच जागतिक परिस्थितीमुळे यातील अनेक प्रकल्प 'पांढरा हत्ती' ठरले. संयुक्त अरब अमिरातींसाठी यादवी असलेल्या युद्धातही बंदर विकत घेऊन चालवणे फायद्याचे ठरले. सुरुवातीच्या काळात संयुक्त अरब अमिरातींच्या पाठोपाठ सौदी अरेबियाही इस्त्रायलला मान्यता देऊन त्याच्याशी राजनयिक संबंध प्रस्थापित करणार होता.



भारताला पश्चिम आशियामार्गे युरोपला जोडणार्या मार्गिकेचा सौदी अरेबिया एक महत्त्वाचा भाग होता. पण, 'हमास'ने दि. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्यामुळे परिस्थिती पालटली. काही अटी-शर्तीवर इस्त्रायलला मान्यता देण्यास तयार असलेला सौदी अरेबिया संयुक्त अरब अमिरातीशी स्पर्धा करू शकत नाही, म्हणून इस्लामिक मूलतत्त्ववादी तुर्कीये, कतार आणि पाकिस्तानला मदत करू लागला. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर सौदी अरेबियाने पाकिस्तानसोबत परस्परांच्या संरक्षणाचा करार केला. उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये युद्ध झाले; तर तांत्रिकदृष्ट्या त्यात पाकिस्तानच्या बाजूने उतरायला सौदी अरेबिया कटिबद्ध आहे. स्वतःच्या सुरक्षेसाठी कायमच पाकिस्तान आणि इतर देशांतील सैनिकांवर अवलंबून असलेला सौदी अरेबिया असे करणार नसला, तरी या कृतीमुळे भारताच्या मनामध्ये संशयाचा खडा पडला. सौदी अरेबियाच्या मदतीने तुर्कीये आणि कतारने सीरियामध्ये एकेकाळी 'इस्लामिक स्टेट'चा भाग असलेल्या अहमद अल शरा यांना अध्यक्षपदी बसवून इस्त्रायलच्या मनात संशय निर्माण केला. इस्त्रायलसाठी एकीकडे इराणच्या नेतृत्त्वाखालील 'शिया' मूलतत्त्ववादी विचारसरणीची आघाडी अस्तित्वाचे संकट निर्माण करत असताना, दुसर्या बाजूने 'सुन्नी' मूलतत्त्ववादी विचारसरणी त्याला घेरू लागली आहे. कतार आणि सौदी अरेबियाकडे प्रचंड प्रमाणावर पैसा असून, त्या जोरावर अमेरिकेतील राजकारणाला, तसेच अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या जवळच्या लोकांना आपल्याकडे वळवण्याची ताकदही त्यांच्याकडे आहे. या परिस्थितीत इस्त्रायल राजकीय इस्लामचा वापर न करणारे मुस्लीमबहुल देश, तसेच या देशांचा उपद्रव सहन करत असलेल्या देशांची मोट बांधायचा प्रयत्न करत आहे. इस्त्रायलच्या झेंड्यावरच्या षटकोनी चांदणीला 'स्टार ऑफ डेव्हिड' असे म्हणतात. इस्त्रायलला केंद्रस्थानी ठेवल्यास अवतीभोवतीच्या इथिओपिया, सोमालीलॅण्ड, सायप्रस, ग्रीस, अझरबैजान, संयुक्त अरब अमिराती आणि बहारीन आणि भारत यांना जोडले; तर हा षट्कोन पूर्ण होतो. यातील अझरबैजान वगळता, भारताचे सर्व देशांशी चांगले संबंध आहेत. अझरबैजानच्या शेजारील आर्मेनियाशी भारताचे घनिष्ठ संबंध आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेऊन आर्मेनिया आणि अझरबैजान यांच्यामध्ये शांतता प्रस्थापित केली आहे. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी इस्त्रायलला जाऊन भारत आणि इस्त्रायल यांच्यातील बहरलेल्या द्विपक्षीय, तसेच बहुपक्षीय संबंधांना प्रकाशात आणण्याचे काम करणार आहेत. या दौर्यामध्ये संरक्षणासोबतच अनेक क्षेत्रांमध्ये भारत आणि इस्त्रायलमध्ये सहकार्य करार होणार असून, भारताला इस्त्रायलकडून संवेदनशील क्षेत्रातील संरक्षण तंत्रज्ञान मिळणार आहे. मोदींच्या या दौऱ्यामुळे भारत आणि इस्त्रायल या दोन प्राचीन आणि आधुनिक देशांमधील संबंध मजबूत होतील, हे निश्चित.

**इस्त्रायलच्या झेंड्यावरच्या षटकोनी चांदणीला 'स्टार ऑफ डेव्हिड' असे म्हणतात. इस्त्रायलला केंद्रस्थानी ठेवल्यास अवतीभोवतीच्या इथिओपिया, सोमालीलॅण्ड, सायप्रस, ग्रीस, अझरबैजान, संयुक्त अरब अमिराती आणि बहारीन आणि भारत यांना जोडले; तर हा षटकोन पूर्ण होतो. यातील अझरबैजान वगळता, भारताचे सर्व देशांशी चांगले संबंध आहेत. अझरबैजानच्या शेजारील आर्मेनियाशी भारताचे अत्यंत घनिष्ठ संबंध आहेत. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदींनी इस्त्रायलला जाऊन भारत आणि इस्त्रायल यांच्यातील बहरलेल्या द्विपक्षीय, तसेच बहुपक्षीय संबंधांना प्रकाशात आणण्याचे काम केले आहे.**

# ‘लव्ह जिहाद’ला सुरुंग लावणारा गुजरातचा कायदेबदल

समाजभान
योगिता साळवी



**‘सलीम-सुरेश’वाला खेळ आता चालणार नाही, असे म्हणत गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी विवाह नोंदणी कायद्यात बदल, संशोधन केले आहे. त्यानुसार, विवाह नोंदणी करताना नियोजित वधुवरांनी घोषित करायचे आहे की, त्यांच्या होणाऱ्या विवाहाची माहिती त्यांच्या पालकांना आहे अथवा नाही. तसेच वधुवरांना त्यांच्या पालकांची पूर्ण माहिती द्यावी लागणार आहे. असे अनेक स्वागतार्ह बदल या कायद्यात आहेत. या संशोधित कायद्यामुळे ‘लव्ह जिहाद’च्या खेळाला सुरुंग लागणार आहे. यासंदर्भातला आढावा घेणारा हा लेख...**

बुरखा नाही, मात्र मुस्लीम महिला ज्याप्रमाणे डोके झाकतात, तशी वेशभूषा केलेल्या पुणे ग्रामीणमधील भिगवणच्या त्या मुलीचा व्हिडिओ समोर आला. ती म्हणते, माझे आणि याचे (तिच्या सोबत असलेल्या मुस्लीम पुरुषाचे) नऊ वर्षांपासून प्रेम होते. मी स्वेच्छेने त्याच्याबरोबर आले. माझ्यावर याने कसलीच जबरदस्ती केली नाही. दुसरीकडे या मुलीच्या आईचा आकांत सुरू आहे. ती रडते, तडफडते, अपार वेदनेने म्हणते, माझी मुलगी मला परत करा, तिच्यावर १२ वर्षांपासून अत्याचार होतोय, त्या दबावामुळे ती असे म्हणत आहे. आज माझी गेली, उद्या तुमची जाईल. भिगवणच्या घटनेत त्या मातेचे आक्रंदन हृदय पिळवटून टाकते. मुलगी आईला अव्हेरते, सरळसरळ त्या पुरुषाचे समर्थन करत म्हणते की, तिची आई खोटे बोलते, तिचे अपहरण झालेच नाही. तरीदेखील आईचा जीव मुलीसाठी तुट तुट तुटतो. तिने परत यावे, त्या पुरुषासोबत अजिबात जाऊ नये, असे तिला मनापासून वाटते. गायीसमोर तिचे वासरू कसायाने न्यावे आणि गायीने हंबरडा फोडावा, तशी अवस्था याच नव्हे; तर अशा घटनांमध्ये प्रत्येक आईबाबांची असते.

या घटनेवरून मुंबईची एक सत्यघटना आठवते. साधारण दोन वर्षांपूर्वी मुंबईतली एक महिला भेटली. ती विधवा होती. एक मुलगी पदरात होती. आई आणि मुलगी दोघीच. सात वर्षांपूर्वी तिची मुलगी ११ वर्षांची होती. या महिलेला जाणवले की, बाजूच्या वस्तीतला एक मुस्लीम पुरुष सारखा त्यांच्या घराभोवती रेंगाळू लागला. आईने त्याची चांगलीच खरडपट्टी काढली. पोलिसात तक्रारही केली. पोलिसांनी त्याचा चांगला समाचार घेतला. त्यानंतर काही दिवसांनी त्याने त्या मुलीला गाठले आणि म्हणाला, तुझ्यासाठी मी मार खाल्ला. मी तुझ्यासाठी काहीही करू शकतो. त्यानंतर काही दिवसांनी तो पुरुष तिच्या घरात घुसला, त्या मुलीचे जबरदस्तीने चुंबन घेतले. त्याचे व्हिडिओही काढले. मुलीने आरडाओरडा केला, तर लोकांनी त्याला मारले. मग हा पुन्हा तिला सांगू लागला, तुझ्यासाठी मी मार खाल्ला. माझ्यासोबत इतक्या मुली असताना मला तूच पाहिजेस वगैरे वगैरे. त्याने त्या मुलीच्या मनात भरवले की, तो तिच्यासाठी काहीही करू शकतो. ‘मैं तुम्हारे लिए जान दे भी सकता हू, ले भी सकता हू’ असे डायलॉग सिनेमात त्या मुलीने पाहिले होते. मग काय त्या बालिकेला आपण हिरोईन आहोत, असे वाटू लागले. बापाविना असलेल्या त्या गरीब लहान मुलीचा त्याच्यावर विश्वास बसला. एकेदिवशी संधी साधून त्याने तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले. हे जे घडले, ते वाईट होते, हे त्या मुलीला वाटलेच. तिने त्याच्याशी संपर्क तोडला; पण त्याने त्या मुलीला सांगितले, आपल्यात जे झाले, ते माझ्या मोबाईलमध्ये आहे. तू मला सोडू शकत नाहीस. हे असेच अनेक वर्षे झाले. त्या मुलीला सुटका हवी होती; पण सुटका नव्हती.

आई दिवसभर मोलमजुरी करायची, रात्री थकून घरी यायची. ‘मुलगी शिकून पांग फेडेल आपले कष्ट दूर होतील’ असे ती म्हणायची. तिचे म्हणणे ऐकून मुलीची तिला काही सांगायची हिंमतच व्हायची नाही. अखेरीस तो दिवस उजाडला. तिचा १८वा वाढदिवस होता. तो घरी आला. मुलीला म्हणाला, चल नाहीतर तुझे व्हिडिओ जगजाहीर करेन. तिच्या आईने त्या पुरुषाला अडवले, तर त्याने कुत्सित हसत त्याचा मोबाईल त्या आईच्या हाती दिला. त्या मोबाईलवर तिच्या मुलीचा त्याच्या सोबतच्या लैंगिक संबंधाचा व्हिडिओ सुरू होता. महिलेवर आकाश कोसळले. तिला काही समजायच्या आतच मुलीचा हात धरून तो तिला घेऊनही गेला. जरा वेळाने सावरल्यावर ती त्याच्या घरी गेली, तर मुलीचे म्हणणे तू कशाला आलीस? इथून बाहेर येऊन माझे हाल आणखी खराब होतील. आता हेच माझे नशीब. आईने पोलिसात तक्रार केली, तर पोलिसांचे म्हणणे, मुलगी सज्ञान आहे. तिची काहीही तक्रार नाही. तू का रडारड करतेस. उगीच हिंदू-मुस्लीम वाद उकरू नकोस. मग ती आई पोलिसांकडे गेलीच नाही. मात्र, त्या मुलीला भेटण्याचे प्रयत्न करत राहिली; पण मुलीचे नखही तिला दिसले नाही. एक-दोन वर्षे गेल्यानंतरही त्या आईचे म्हणणे होते की, ती जे जगते आहे, ते दबावामुळे, त्याला घाबरून. तिचे व्हिडिओ त्याच्याकडे आहेत म्हणून. तर भिगवणच्या घटनेतील आईला पाहूनही या महिलेची आठवण आली.

या पार्श्वभूमीवर गुजरातमध्ये सध्या विवाहासंदर्भात कायद्यात जे प्रस्तावित संशोधन आहे, त्याचे महत्त्व मोठे आहे. त्यानुसार, कायदेशीर विवाह करणार्यांना दोघांनाही त्यांचे सर्व ‘केवायसी’ असलेली कागदपत्रे तर द्यायची आहेतच. शिवाय, त्यांनी घोषणापत्र द्यायचे आहे की, या दोघांनी त्यांच्या पालकांना या विवाहाबद्दल माहिती दिली आहे की नाही. त्याचबरोबर नियोजित वधुवरांनी त्यांच्या पालकांची संपूर्ण माहिती द्यायची आहे. मग दहा दिवसांत प्रशासन चौकशी-तपास करून त्यांच्या पालकांना सूचना देणार की, त्यांचे पाल्यं विवाह करणार आहेत. पुढे हे सगळे सोपस्कार झाल्यानंतर ३० दिवसांनी या वधुवरांना लग्नाचे प्रमाणपत्र मिळणार. तसेच लग्नाच्या वेळेस साक्षीदार म्हणून असलेल्या प्रत्येकाची संपूर्ण माहिती सादर करणे आवश्यक आहे. या कायद्याबाबत गुजरात सरकार सध्या सूचना मागवत आहे. अर्थात, यावर नेहमीच्या त्याच लोकांनी विलाप सुरू केला आहे की, जर नियोजित वधुवर सज्ञान असतील, तर त्यांना विवाह करण्यासाठी कोणाच्या संमतीची मुळी गरजच काय? त्यांना वाटले, केले त्यांनी लग्न. पण, ‘जब मिया बीबी राजी, तो क्या करेगा काजी’ ही म्हण मुस्लिमांमध्येच शोभते. तिकडे विवाह हा ‘करार’ आहे आणि अर्थातच ‘लव्ह जिहाद’मध्ये तर तिला कसे राजी केले जाते, हे सगळ्यांना माहिती आहे.

दुसरीकडे भारतीय संस्कृतीमधल्या १६ संस्कारांमध्ये विवाह म्हणजे केवळ एका पुरुषाचा एका स्त्रीशी सर्वतोपरी संबंध नाही, तर दोन कुळांचा, दोन कुटुंबांचा आत्मीय संबंध आहे. ज्या देशात ८० टक्के हिंदू आहेत, त्या देशात हिंदू संस्कृतीनुसार मुला-मुलींच्या विवाहाबद्दल आईबाबांना माहिती असणे आणि आपल्या पाल्याने कुणाशी विवाह केल्यावर आपल्या कुळाचे आणि प्रत्यक्ष पाल्याला सुख-समाधान मिळेल, हे आईबाबांनी समजून घेणे, धार्मिक आणि सांस्कृतिकरीत्या योग्यच आहे. याला ऐतिहासिक आधार आहे.

दुसरे असे की, ‘लव्ह जिहाद’च्या अनुषंगाने मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत वाट बघितली जाते आणि मग लगेच कायदेशीर विवाह केला जातो. त्याआधी अर्थातच, मुलीचे धर्मांतरण केले जाते. यातील बहुसंख्य घटनांमध्ये पालकांना माहितीही नसते की, १८वा वाढदिवस झाला की, मुलगी गुपचूप कोर्टात विवाह करणार आहे. इथे मुलगी आईबापाकडून शिक्षण घेणे, सर्व सवलती घेत राहते, तिचे पैसे-दागिने आणि इतर सुविधा त्या पुरुषाला देत राहते. दागिने काय झाले? पैसे काय झाले? असे पालकांनी विचारल्यावर म्हणते, हरवले, विसरले, मैत्रिणीला दिले, खर्च झाले. ती आईबाबांकडे राहत असल्याने त्याला तिची कोणतीच जबाबदारी घेण्याचे कारण नसते. मात्र, तो ‘शोहर’ म्हणून तिचे लैंगिक शोषण करत राहतो. कोणताही खर्च न करता त्याच्या सगळ्या गरजा त्या मुलीकडून तो पुरेपूर भागवत असतो. अनेक घटनांमध्ये असेही आढळले आहे की, तो पुरुष या मुलीला ‘ब्लॅकमेल’ करतो किंवा नशेचे व्यसन लावतो आणि तिला वेश्याव्यवसाय किंवा ड्रग्जविक्रीच्या धंद्यात लोटतो. तिच्या पैशावर ऐष करतो.

याअनुषंगाने गुजरातमधील या कायद्यातील बदलाने आईबाबांना वेळीच कळणार आहे की, आपला मुलगा-मुलगी नक्की काय करणार आहेत? विवाहाच्या नावाने त्यांचे भले होणार की, आणखी काय होणार. पालकांना त्यांच्या पाल्याच्या नियोजित जोडीदाराची माहिती काढण्याची संधी मिळणार आहे. यामुळे पाल्याचा जोडीदार संशयास्पद पार्श्वभूमीचा किंवा पाल्यासाठी धोकादायक असेल, तर पालकांना मुलीला समजावण्यासाठी वेळ मिळणार आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, ‘लव्ह जिहाद’ आणि त्यातून धर्मांतरण करणार्या घटनेत एक गोष्ट प्रामुख्याने आढळते की, मुलीच्या अशा विवाहाच्या वेळेस साक्षीदार असणारे लोक हे अनेकदा तेच-तेच असतात. मुलींचे ऐनकेन प्रकारे धर्मांतरण करण्याचा त्यांचा धंदाच असतो. गुजरातमधील प्रस्तावित संशोधनाने या असल्या धंदेवाईक नराधमांचे बुरखे फाटणार आहेत.

(पान ६ वर)

सुखात्म
डॉ. अविनाश मोहरील




## एक छोटीशी सुंदर गोष्ट

अनेक दिवसांनी सर्वांनी मिळून पुन्हा एकदा तो सिनेमा बघितला आणि पुन्हा एकदा तोच विचार मनात आला- ‘किती गोडुला सिनेमा आहे हा!’ एक खरोखरीच गोडुला चित्रपट बघितला होता आम्ही सर्वांनी. काय बघितले होते आम्ही या सिनेमात. एक छोटीशी कथा, एक छोटासा विचार आणि खूप सारे हसणे. मला तर या चित्रपटाच्या दिग्दर्शकाचेच कौतुक वाटत राहिले की, एखादा असा विषय जो एरवी चर्चेचाही ठरू शकत नाही त्या विषयावर एक अख्खा चित्रपट त्याने बनविला. खरोखरीच चांगली कलाकृती एखाद्यावेळी अतिशय छोट्या विचारातूनही निर्माण होऊ शकते. तो विचारही फार नवीन नाही, नेहमीचाच.

आपल्या जीवनात येणारा ताण व त्या ताणापासून मुक्तीचा एक छोटासा उपाय. शेवटी जीवनातील ताण हे आपण कोणता चष्मा लावून त्याकडे बघतो, यावर अवलंबून असतात. शिवाय हे ताण श्रीमंतासाठी कमी आणि गरिबासाठी जास्त असे वर्गीकृत होत नाहीत. ते असतात किंवा नसतात. ते अवलंबून असतात आपल्या प्रत्येकाच्या वैयक्तिक दृष्टिकोनावर. तो कसा असावा आणि कसा नसावा या दोन्ही बाबींवर प्रकाश टाकणारा नितांत सुंदर चित्रपट होता ‘पीकू.’ सुजीत सरकार या बंगाली दिग्दर्शकाच्या अप्रतिम दिग्दर्शनाने नटलेला, अमिताभ बच्चन, दीपिका पदुकोण व इरफान खान यांच्या कसदार अभिनयाने सजलेला थेट हृषीकेश मुखर्जी स्टाईलचा चित्रपट मनाला भुरळ घालणारा आहे. बद्धकोष्ठता हा सिनेमाचा विषय राहू शकतो का, या प्रश्नाचे उत्तर सर्वजण नकारार्थी देतील. मुळात हा विषय चारचौघांतही बोलण्याचे लोक टाळतात. तो त्रास ज्याला आहे त्याचे तोच जाणे, अशी अवस्था प्रत्येकाचीच असते. या विषयाला केंद्रिभूत ठेवून ताण या महत्त्वाच्या विषयाबाबत दिग्दर्शकाने केलेली मार्मिक कॉमेंट बघण्यासारखी आहे. बद्धकोष्ठतेचा त्रास असल्याने कायम त्रासलेले वडील व त्यामुळे सतत त्यांच्या भोवती गुंतलेली त्यांची स्वतंत्र विचारांची मुलगी या दोघांच्या त्रासलेल्या जीवनाची कहाणी या चित्रपटात दाखविलेली आहे. सहजपणे घडत असलेल्या घटनांच्या आधारे चित्रपट पुढे सरकत राहतो.

आपल्याही नकळत आपण पीकूच्या वडिलांच्या तर्कटिपणामध्ये गुंतून जातो. वयोमानानुसार प्रकृतीची काळजी करणे हे योग्यच आहे, परंतु त्या काळजीपोटी आपल्या जीवनाचा आनंद गमावून स्वतःचे व आपल्या सोबतच्या मंडळींचे आयुष्य रसहीन केले जाऊ शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे पीकूचे वडील. विक्षिप्त स्वभाव, हेकेखोर वृत्ती आणि त्यात सारे जीवन केवळ आणि केवळ बद्धकोष्ठतेशी जोडून त्याचाच विचार करीत राहणे, हा त्यांचा स्वभाव. आपल्या मुलीने आपल्याला सोडून जाऊ नये ही त्यांची इच्छा. त्यासाठी तिला लग्नाशिवाय शरीरसुखाचे स्वातंत्र्यदेखील त्यांनी दिलेले आहे. आपली मुलगी सर्वच बाबतीत स्वतंत्र आहे, असे एका बाजूने सांगताना त्यांनी मात्र तिला आपल्या तब्येतीच्या बाबतीत जखडून टाकलेले आहे. चेकअप करणारी यंत्रे घरीच आणलेली आहेत. वेगवेगळ्या टेस्टस् ते करीत राहतात. त्यामध्ये काहीच निघाले नाही म्हणूनही चिंतित होतात. वेगळ्या प्रकारच्या औषधी-गोळ्यांचे त्यांच्याकडे भांडार आहे. या सगळ्या प्रकारात त्यांनी केवळ पीकूलाच गुंतविले आहे असे नाही. त्यांचा एक प्रामाणिक नोकर आहे, जो त्यांची सर्व प्रकारची सेवा करतो. ती सेवा बघण्यातही मोठी गंमत आहे. एकंदरीत त्यांनी आपल्या बद्धकोष्ठतेच्या त्रासामुळे सर्वांनाच हैराण करून टाकले आहे. अशातच त्या दोघांच्या जीवनात एका तरुणाचा प्रवेश होतो अन् त्यानंतर अगदी अलगद पीकूच्या वडिलांचा दृष्टिकोन बदलताना बघता येतो. दिग्दर्शकाने हे बदल इतक्या हळुवारपणे व सहजतेने दाखविले आहेत की, आपण सहजच त्या कथेसोबत रममाण होतो. आपल्या जीवनात ताण निर्माण करणारी अनेक कारणे आपल्या आजूबाजूला आपल्याला दिसत असतात. पण त्या सर्व बाबींचा परिणाम आपल्यावर होऊ न देणे, हे मात्र आपल्या हातात असते. बरेच वेळा आपण लोकांना या ताण निर्माण करीत असलेल्या बाबींपुढे हतबल झालेले बघतो. दिवसेंदिवस आपल्या जीवनाच्या बदलत्या स्वरूपामुळे ताणाची निर्मिती आपसुकच होत असते. अगदी रस्त्यावर गाडी चालविणे हा देखील अनेकांसाठी अतिशय ताणाचा विषय आहे. त्यात आजकाल प्रकृती हा ताणाचा विषय बनलेला आहे. कोणतीच बाब आता साधी राहिलेली नाही, असा आपल्या सर्वांचाच समज आहे. साधी सर्दी स्पेशालिस्ट डॉक्टरकडे जाण्याचा विषय बनलेला आहे. माझे काही डॉक्टर मित्र-मैत्रिणी तर सांगतात की, त्यांनी वेगवेगळ्या टेस्टस् सांगण्याआधीच पेशंट त्याचा आग्रह धरतात.

एकदा सगळ्या टेस्टस् करून घेतल्या की निश्चिंत; पण ती निश्चिंतता काही काळापुरतीच असते. प्रकृतीबाबत जागरूक राहणे हे आपण समजू शकतो, परंतु केवळ त्याचाच विचार करून स्वतःला आणि इतरांना त्यात गुंतवून टाकणे हे अनेक घरी अनेक मंडळी करतात. वेगवेगळ्या आजारासंबंधीच्या अनेक पोस्ट व्हॉट्सअॅपवर लोक शेअर करीत राहतात. समजातील दोन-चार प्रतिष्ठित लोकांच्या नावाने अशा अनेक पोस्ट सध्या सोशल मीडियावर आहेत. तब्येतीचा आपणच बागुलबुवा बनवून त्याला आपणच घाबरत राहण्याचा हा प्रकार आहे. खरे तर या असल्या प्रकारांमुळे अधिकाधिक ताण निर्मितीशिवाय काहीही वेगळे होत नाही. चाळिशी ओलांडल्यावर मित्रांच्या ग्रुपमध्ये बीपी, शुगर यासारख्या गोष्टी सुरू होतात आणि मग त्या गोष्टी पुन्हा ताण वाढवतात. खरे तर या सर्व ताणांपैकी अनेक ताण केवळ दुर्लक्ष करूनही नाहीसे करता येतात. पण दुर्लक्ष करणे म्हणजे माझ्या स्वत्त्वावरील जणू आघात आहे अशा पद्धतीची मानसिक स्थिती बनविलेल्या व्यक्तींना पुढे पुढे ताण निर्मिती करून त्यातच राहणे हवेहवेसे वाटायला लागते. मला काहीच झालेले नाही, याचाही ताण आलेले लोक जेव्हा मी बघतो तेव्हा केवळ कीव कराविशी वाटते.

शेवटी या प्रत्येक व्यक्तीच्या आपापल्या स्वतंत्र दृष्टिकोनाच्या पद्धती आहेत. महत्त्वाचे हे की, थोडासा अॅप्रोच बदलविल्यास जीवन सुंदर वाटायला लागते आणि तेच चिरंतन असते. याच विचारांकडे ‘पीकू’ चित्रपट आपल्याला नेतो. चित्रपटाच्या कथेसोबत आपण अशा एका वळणावर पोहोचतो जेथे अचानक एके दिवशी पीकूचे त्रस्त वडील आपला स्वतःच्या आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलवितात. एक छोटीशी गोष्ट ते करतात आणि खूप सारा आनंद त्यांना प्राप्त होतो.

(पान ६ वर)

संस्कारांच्या देशा
रमा गोळवलकर

## व्रतबंध- 1

व्रतबंध हा जगाच्या पाठीवर घडणारा एकमेवाद्वितीय असा निखळ भारतीय विधी आहे हे विधान त्रिकालाबाधित सत्य आहे. कारण पृत्त्वीच्या आयुष्यात वेगवेगळ्या ठिकाणी काळाच्या ओघात उदयाला आलेल्या आणि लयाला गेलेल्या इतर कोणत्याही संस्कृतीत औपचारिक शिक्षणाचा आरंभ बिंदू असा कोणताही विधी नाही, असं आपण छाती ठोकून सांगू शकतो. वयाच्या आठव्या वर्षी आईवडिलांच्या संरक्षक छायेचा त्याग करायचा. म्हणजे आजच्या भाषेत कम्फर्ट झोन सोडून गुरूच्या घरी जायचं. तिथे राहायचं.

जगरहाटीत करावी लागणारी सगळी कामं गुरू आणि गुरुपत्नीच्या हाताखाली राहून सहपाठ्यांच्या सोबतीनं शिकायची. सोबतच विद्याभ्यास करायचा, म्हणजे पाठांतर करायचं. मेंदूच्या स्मृती नावाच्या पैलूला अशा प्रकारे प्रशिक्षित करायचं की, त्यात अधिकाधिक माहिती साठवून ठेवता यावी. ती सगळी माहिती तोंडपाठ असावी. कोणत्याही क्षणी ती प्रकट करता यावी. तिचा विनियोग करता यावा. हा सगळा बौद्धिक व्यवहार करण्यात कौशल्य मिळवायचं, निष्णात व्हायचं. त्याकरिता अपरिमित कष्ट सहन करायचे. सर्वप्रकारचे शारीरिक आणि मानसिक चोचले, लाड दूर सारत केवळ आणि केवळ स्वत:ला भविष्यकाळातील विविध दायित्व म्हणजे जबाबदाऱ्या पार पडण्यासाठी सिद्ध करायचं, हा एकच ध्यास मनात ठेऊन व्रतस्थ राहण्याचं व्रत घ्यायचा हा संस्कार अन्यत्र कुठेच नाही. शिक्षण कसे द्यावे याविषयीच्या कोणत्याही पाश्चात्त्य विद्वानांच्या कोणत्याही शैक्षणिक सिद्धांताआधी भारतीय संस्कृतीत शिक्षणाची एक अविरत, अविरल, अविश्रांत अशी परंपरा या भूमीत नांदते आहे.




त्याला विद्यादान आणि विद्याग्रहण असं म्हणतात. ही प्रक्रिया जेव्हा स्वत:च्या घरातून बाहेर पडून गुरुकुलात जाऊन करायची असते त्यावेळी तिथे काही विविक्षित नियम पाळायचे असतात. हेच व्रत घेण्याचा हा संस्कार आहे. ब्राह्मण म्हणजे वेदाध्यायन करणारे, क्षत्रिय म्हणजे राजनीती, न्यायशास्त्र, युद्धनीती या सारखे विषय शिकणारे आणि वैश्य म्हणजे व्यापार उदीम उद्योग आदी आर्थिक व्यवहार करू पाहणारे त्या त्या विशेषज्ञ अधिकारी व्यक्तीकडे जाऊन राहून ती विद्या ग्रहण करत. त्याआधी हा संस्कार करायचा असतो. याला आणखी एक नाव आहे ‘उपनयन’. नी + नयते या मूळ धातूचा अर्थ आहे नेणे. उपनयन म्हणजे जवळ घेऊन जाणे. जो संस्कार बालकाला गुरुजवळ घेऊन जातो तो ‘उपनयन’ संस्कार! बटू कोणत्याही वर्णाचा असला तरी त्याला इंद्रियनिग्रह करून ब्रह्मचर्याचं पालन करावंच लागतं. त्यासाठी त्याच्या कंबरेला पुन्हा एकदा मेखलाबंधन केलं जातं. अर्थात ही मेखला त्याच्या वर्णाप्रमाणे असावी असा संकेत आहे. म्हणजे ब्राह्मण वर्णाच्या बटूला मुंजगवताची दोरीची मेखला बांधायची असते तर क्षत्रिय वर्णाच्या बटूच्या कमरेला धनुष्याची प्रत्यंचा ज्या मूर्वा गवतापासून तयार करतात त्याची मेखला बांधतात. वैश्य वर्णाच्या बटूसाठी शण म्हणजे सनची दोरी मेखला म्हणून बांधावी असं स्मृतिग्रंथ सांगतात. असं का? या प्रश्नाच्या उत्तर शोधण्यासाठी या वैशिष्ट्यपूर्ण गवतांचा विचार करायला हवा. मुंजा (वैज्ञानिक नाव: सच्चारम मुंजा) भारतीय उपखंडात नद्यांचे काठ आणि रखरखीत प्रदेशात मोकळ्या जागेत नैसर्गिकरीत्या उगवणारं सुमारे सात फूट उंच वाढणारं बारमाही गवत आहे. याचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म आहे दुष्काळात तग धरणं, गुरांसाठी चारा आणि भूमी धरून ठेवणं. त्यामुळे हे गवत जमिनीची धूप थांबवण्यासाठी आणि भूमीच्या स्थिरतेसाठी सर्वाधिक उपयोगी ठरतं. यातली प्रतीकात्मकता अशी की ब्राह्मण वर्णाचं वेदाध्ययन, शास्त्राभ्यास आणि ब्रह्मज्ञान जाणणारं विद्वान म्हणून प्रशिक्षित होणारं मनुष्यबळ समाजासाठी या मुंजा गवतासारखं असतं. कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी हे तग धरून राहतं आणि आपल्या प्रखर बुद्धिमत्तेनं आणि विद्वत्तेनं समाजाची धूप अर्थात हानी होण्यापासून रोखतं. तर, धनुष्याची प्रत्यंचा मूर्वा नावाच्या गवतापासून तयार करण्यात येते. म्हणून तिला मोरवीदेखील म्हणतात. मूर्वा गवताला इंग्रजीत इंडियन बोस्ट्रिंग हेम्प म्हणतात. हे भारतीय उपमहाखंडात सर्वत्र बारमाही आढळणारं फांदीरहित रसाळ झाड आहे. याला लांबलचक चिवट मुख्य रेषेची गडद हिरव्या रंगावर फिकट आडव्या पट्टे असलेली ७० सेमी लांबीची कडक पानं असतात. अत्यंत चिवट, भक्कम, लवचीक, मऊ आणि टिकाऊ तंतूसाठी प्रसिद्ध असलेलं हे झाड कोरड्या, खडकाळ किंवा भरड जमिनीत वाढतं. यातली प्रतीकात्मकता अशी की, क्षत्रिय वर्ण हा समाजाचा संरक्षक आणि प्रशासक म्हणून प्रशिक्षित होणारं मनुष्यबळ आहे. सर्व प्रकारच्या विपरीत परिस्थितीवर मात करून समाज आणि राष्ट्राचं संरक्षण करणं हे याचं परम कर्तव्य आहे. पूर्वी धनुष्यबाणासारखं आयुध हे त्याच्या प्रत्यंचेवरच अवलंबून असतं. ती जितकी लवचीक, दणकट, आणि टिकावू असते नेमकं तसंच क्षत्रियाचं व्यक्तिमत्त्व असावं लागतं. मौंजी आणि मूर्वा दोन्ही प्रकारच्या दोऱ्या या तशा काचणाऱ्या असतात. त्याचा करदोडा सतत टोचत असतो. ज्यानं तो कमरेला बांधला त्याला सतत त्यानं घेतलेल्या खडतर व्रताची आठवण करून देत असतो. त्या मानानं शण म्हणजे सनची दोरी ही दिसायला सोनेरी साजिरी काहीशी मऊ असली, तरी अतिशय मजबूत, टिकाऊ असते. या दोरीचा वापर प्रामुख्याने दैनंदिन जीवनात शिंकाळी, बाज विणण्यासाठी, कृषी क्षेत्रात जनावरांच्या वेसण आणि दावणीसाठी, मालाची बांधणी करण्याची पोती/गोण्या आणि दोऱ्यांसाठी, माशांची जाळी तयार करण्यासाठी केला जातो. या वनस्पतीचे जाडी, रुंदी आणि लांबीनुसार सुंभ, दोरखंड, दोर, दोरी, दोरा अतिशय उपयोगी असतात. व्यापार उदीम आणि अर्थकारण ज्या वैश्य वर्णाच्या मनुष्यबळावर अवलंबून असतं ते असंच बहुपयोगी आणि बहुगुणी हवं. त्यातला तलम, मुलायम, सोनसळी बोलण्याचा पैलू मात्र विशेषच महत्त्वाचा.

यापुढचं व्रतबंध विश्लेषण पुढच्या अंकात.



# शुद्धीकरणासाठी मूळ समस्येचा वेध गरजेचा

**दरवर्षी अंदाजपत्रकानंतर गंगा शुद्धीकरण प्रकल्पाची चर्चा सुरू होते. गेल्या दोन दशकांमधील तरतुदी आणि प्रत्यक्ष कामे पाहिली, तर गंगा शुद्धीकरणापेक्षा पायाभूत सुविधा प्रकल्पाला जास्त प्राधान्य दिल्याचे दिसते. मूळ आजारावर कायमचा उपाय करण्यापेक्षा केवळ वरवरची मलमपट्टी करण्यावर सरकारचा भर असल्याचे दिसते. हे टाळून मूळ समस्या सोडविण्याकडे शासनाचा कल असायला हवा, असे वाटते.**

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

'नमामि गंगे' हा गंगा शुद्धीकरण प्रकल्प मोठा गाजावाजा करीत जाहीर केला गेला, पण गंगा वाचविण्याचे सरकारचे वचन अजूनही कागदावरच मजबूत दिसते. अर्थसंकल्पाच्या तरतुदींचा बारकाईने अभ्यास केल्यावर गंगा पुनरुज्जीवन आता पर्यावरणीय मोहिमेपेक्षा पायाभूत सुविधा प्रकल्प बनल्याचे दिसून येते. जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन विभागाच्या नव्या तरतुदींमध्ये २०२६-२७ साठी राष्ट्रीय गंगा योजनेसाठी (नमामि गंगे मिशन-२) ३१०० कोटी रुपयांची निव्वळ तरतूद निश्चित करण्यात आली आहे. ही रक्कम आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या २६८७ कोटी रुपयांच्या सुधारित अंदाजापेक्षा जास्त आहे, परंतु त्याच वर्षाच्या ३४०० कोटी रुपयांच्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कमी आहे. म्हणजे गेल्या आर्थिक वर्षातील काम प्रत्यक्षात पूर्ण झाले नाही आणि उर्वरित बजेट २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात परत जोडले गेले आहे.

२०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणात नद्यांचा उल्लेख नव्हता किंवा त्यात महत्त्वाकांक्षी गंगा-यमुना प्रकल्पांचा उल्लेखही नव्हता. तथापि, अर्थसंकल्पाच्या विश्लेषणातून दिसून येते की, मृत नद्यांच्या मूळ समस्येचे निराकरण न करता केवळ त्यांच्या लक्षणांवर उपचार केले जात आहेत. जलशक्ती मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधील प्रमुख प्रकल्प संरचनांचे परीक्षण केल्यावर चित्र स्पष्ट होते. या आर्थिक वर्षात या विभागाचे एकूण बजेट १९ हजार ९१२.९८ कोटी आहे. ते मागील आर्थिक वर्षी १८ हजार ४०५ कोटी होते. तथापि, २०२५-२६ या त्याच आर्थिक वर्षाच्या २५ हजार २७६.८३ कोटी रुपयांच्या अंदाजित बजेटपेक्षा हे खूपच कमी आहे. 'गंगा मिशन' मधील एक महत्त्वाचा घटक त्याच्या प्रमुख योजनांपैकी 'ईएपी घटक' किंवा बाह्य अनुदानित प्रकल्प आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात या प्रकल्पासाठी ६०० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. ती २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पीय ४५० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. 'ईएपी' म्हणजे ज्यांना जागतिक बँक, जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था किंवा आशियाई विकास बँक यासारख्या बाह्य संस्थांकडून कर्ज किंवा मदत मिळते, असे प्रकल्प. हे प्रकल्प बहुतेक वेळा सार्वजनिक-खासगी भागीदारी मॉडेलवर आधारित मोठे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, सांडपाणी नेटवर्क आणि शहरी पायाभूत सुविधा विकासावर लक्ष केंद्रित करतात. या अर्थसंकल्पीय तरतुदीवरून असेही सूचित होते की, गंगा स्वच्छतेकडे प्रामुख्याने सांडपाणी व्यवस्थापनाची अभियांत्रिकी समस्या म्हणून पाहिले जात आहे. त्याच वेळी सामान्य अर्थसंकल्पीय सहाय्याद्वारे निधी पुरवला जाणारा 'कार्यक्रम घटक' २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीच्या मूळ अंदाजापेक्षा सुधारित अंदाजात २९०० कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आला आणि आता २०२६-२७ साठी २५०० कोटी रुपयांवर निश्चित करण्यात आला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पापेक्षा ही वाढ आहे, परंतु तरीही सरकारने पूर्वी जाहीर केलेल्या पातळीपेक्षा कमी आहे. या घटकात प्रशासकीय खर्च, संस्थात्मक उपक्रम, देखरेख आणि काही किरकोळ पायाभूत सुविधांचा समावेश आहे. नदीच्या पर्यावरणीय पुनर्संचयनावर कोणताही मोठा किंवा वेगळा आर्थिक भर देण्यात आलेला दिसत नाही. गंगा नदीसाठीच्या अर्थसंकल्पीय तुलना वाटपाची इतर जलक्षेत्रातील प्राधान्यांशी केल्यास सरकारचे प्राधान्यक्रम वेगळे असल्याचे दिसून येते.

उदाहरणार्थ, २०२६-२७ या आर्थिक वर्षात आंध्र प्रदेशमधील पोलावरम सिंचन प्रकल्पासाठी वाटप केलेले ३३२० कोटी रुपये केवळ गंगा अभियानासाठीच्या संपूर्ण वर्षाच्या निव्वळ अर्थसंकल्पापेक्षा जास्त आहे.

नदी जोडणीसाठी १९०६ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी देण्यात आला आहे. दरम्यान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत हजारो कोटी रुपये जुन्या सिंचन प्रकल्पांवर आणि कर्जफेडीकडे वळवले जात आहेत. या तुलनेवरून दिसून येते की, राष्ट्रीय जल धोरणाचा भर मोठ्या धरणांवर, कालव्यांवर आणि महाप्रकल्पांवर जास्त आहे, तर नदीच्या पुनरुज्जीवनाकडे तुलनेने मर्यादित लक्ष आहे. 'गंगा मिशन'च्या पायाभूत सुविधांसाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदींवरून असेही दिसून येते की, नदीकडे जिवंत परिसंस्थेपेक्षा शहरी सांडपाणी समस्या म्हणून अधिक पाहिले जात आहे. अर्थसंकल्पात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, पाईपलाईन नेटवर्क आणि सांडपाणी पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला आहे; परंतु प्रवाह नीट राखणे, पूरग्रस्त पुनर्संचयित करणे, वाळू उत्खनन नियंत्रित करणे किंवा नदीशी संबंधित उपजीविका मजबूत करणे यासारख्या पैलूंसाठी स्पष्ट प्रमुख आर्थिक तरतूद नाही. नदी आता 'प्रकल्प स्थळा'सारखी दिसते. तिथे पाईप, पंप आणि प्लांटद्वारे उपाय शोधले जातात.

अर्थसंकल्पीय प्राधान्यक्रमांनुसार खरे लक्ष अभियांत्रिकी-आधारित प्रदूषण नियंत्रणावर असून नदीचे नैसर्गिक स्वरूप पुनर्संचयित करण्यावर नाही, असे दिसते. आज गंगेचे एक वेगळे राष्ट्रीय अभियान असून ती एक वेगळी ओळख आणि हजारो कोटी रुपयांची समर्पित पायाभूत सुविधा आहे. तथापि, देशातील उर्वरित नद्या अत्यंत मर्यादित बजेट असलेल्या प्रशासकीय व्यवस्थेवर अवलंबून आहेत. जलशक्ती मंत्रालयाच्या तरतुदींमध्ये राष्ट्रीय नदीसंवर्धन संचालनालयाचा उल्लेख इतर नद्यांचे व्यवस्थापन कसे केले जात आहे, हे स्पष्टपणे दर्शवतो. 'एनआरसीडी' ही राष्ट्रीय नदी संवर्धन योजना अंमलात आणणारी संस्था आहे. तिचे काम राज्य आणि शहरी स्थानिक संस्थांना प्रदूषित नदीच्या पट्ट्यांमध्ये प्रदूषण कमी करणाऱ्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आर्थिक मदत प्रदान करणे आहे. यात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, ड्रेनेज इंटरसेप्शन आणि सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प आदींचा समावेश होतो. तथापि, गंगा आणि तिच्या उपनद्या या मोहिमेत समाविष्ट नाहीत. त्यांच्यासाठी एक वेगळे 'नमामि गंगे' अभियान आहे. अर्थसंकल्पानुसार २०२६-२७ मध्ये 'एनआरसीडी'चा स्वतःचा संस्थात्मक खर्च सुमारे १० कोटी रुपये आहे. ही रक्कम कार्यालय, कर्मचारी आणि प्रशासकीय पायाभूत सुविधांचा खर्च दर्शविते, कोणत्याही नदी स्वच्छता कार्यक्रमाचा खर्च नाही. प्रत्यक्ष योजना निधी 'राष्ट्रीय नदी संवर्धन योजना- इतर खोरे' मध्ये प्रतिबिंबित होतो. त्यासाठी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे ५५० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

यमुना (गंगा खोऱ्याबाहेरील नद्यांसह), गोमती, दामोदर, साबरमती आणि महानदी सारख्या प्रदूषित नद्यांचे काम करण्यासाठीही हाच निधी आहे. गंगा मोहिमेसाठीची निव्वळ तरतूद ३१०० कोटी रुपये आहे, तर इतर सर्व नद्यांसाठी एकूण तरतूद ५५० कोटी रुपये आहे. हे बजेट प्रमाण सहापट जास्त फरक दर्शवते. एक महत्त्वपूर्ण भाग 'ईएपी' निधी किंवा प्रकल्पांसाठी बाह्य निधीचा आहे. 'एनआरसीडी' ही नदी परिसंस्था पुनर्संचयित करणारी संस्था नाही, तर प्रदूषण नियंत्रण पायाभूत सुविधा राबविणारी तांत्रिक संस्था आहे. तिचे लक्ष नदीचा अखंड प्रवाह, पूरक्षेत्रे, जैवविविधता किंवा नदीआधारित उपजीविकेवर नाही, तर सांडपाणी नदीत प्रवेश करण्यापूर्वी प्रक्रिया करण्यावर आहे. पाईप्स, पंप आणि वनस्पतींद्वारे समस्या सोडविण्याचे हे एक मॉडेल आहे. (पान ६ वर)

## सप्तरंगी रंगपंचमी..!



आला रंगपंचमीचा सण करीत सप्तरंगी उधळण
अबीर गुलालाने भरले सारे धरती नी गगन..!
प्रत्येक रंग आनंदाची लहर, अन् हरेक रंग गुणांचा सागर
साऱ्या रंगांचे होता मिलन रंगे इंद्रधनुत तन मन..!
पूर्वसंध्येला पंचमीच्या होई होलिका दहन,
करूनी अग्निदेवतेचे पूजन,
करती होलिकादेवीस आवाहन..!
करून विकृतीचे दहन, करती संस्कृतीचे दोहन..!
पंचमीचे दिनी सूर्यकिरणांची घेऊनी पिचकारी,
केशरी रंगाने रंगविण्या धरतीयेई क्षितिजावर सूर्यदेवाची स्वारी,
रंगात रंगुनी त्याच्या होई वसुंधरा बावरी,
धुळवडीच्या नाना रंगी होई जणु नार नवेली..!
ऐसा सण हा आनंदाचा, नववर्षाच्या स्वागताचा
वसंताच्या आगमनासाठी, धरतीवरती फाल्गुन घाली,
नक्षीदार नवरंगाच्या पायघड्या..!

वैजयंती वडनेरकर



## 'कृष्णगंध'

हृदयी तुझ्या नामाचा तेवत राहावा दीप
स्तब्ध होई विचलित मन असा तेजाचा तू नंदादीप
भक्ती कृष्ण नामाची झिजावी अंतरंगी चंदन स्वरूप
उगाळून चंदन शीतल ओठी नाम तुझेच पुनः देई हुरूप
प्रीति अस्सीम प्रेची फुलावी मनगाभारी तद्रूप
सुखद अंतरीचा प्रवास दरवळो दाही दिशा सुखरूप
गीतेच्या ज्ञानसागरात शोधावे स्वतःला खूप
विकार जीरावे मनाचे कृष्णमय होऊन सुगंधित धूप
नीलकमल नयन, सगुण स्वरूप नीलम चरण,
श्यामल सुंदर रूप रंगात रंगून तुझ्या ज्योतिर्मय
वाटते व्हावे राधाच, एकजीव एकरूप.

अवनी सप्रे

## अर्धांगिनी

पन्नाशी ओलांडलेली माझी अर्धांगिनी
वयाच्या तिसऱ्या वर्षी गुलाबी फुलांचा फ्रॉक घालून
कशी बागडली असेल ! गिरक्या घेत स्वतःशीच
गडबडली असेल पाय पूर्ण न टेकवता
घरभर थिरकली असेल घेर धरून फ्रॉकचा
आजीपुढे नाचली असेल कौतुकाने बाबांनी तिला
धरले असेल उंच खिदळून पुन्हा पुन्हा
हट्ट केला असेल तिने बाबांकडे !
निष्पाप, निर्व्याज प्रेमाची ती लेक एका बापाची
सांभाळली का मी योग्यतेने अपराध माझे दडपले कुठे
तू संगती तुझ्या मी विसरून गेलो

राजीवलोचन पुंडलिक

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

## अष्टदिशांचे दिकपाल




**आपल्या संस्कृतीला पुरातन काळापासून अवकाशाचे भान होते. आकाशाचे ज्ञान होते. विशाल अवकाशाला कवेत घ्यायचे असेल तर अष्टदिशांची गुंफण करावी लागेल, याची जाणीव आपल्या ऋषिमुनींना होतीच. त्यांनी आठ ऊर्जा क्षेत्रांमध्ये विश्वाची गुंफण केली आणि सतत प्रसरण पावणाऱ्या या अवकाश क्षेत्रांना दिशांची नावे दिली. प्राचीन काळापासूनच दिशा आठ होत्या, पण साधारणपणे उत्तर वेदिक काळात अष्टदिशांचे रक्षण करणाऱ्या देवता या अर्थाने 'दिकपाल' आपल्या संस्कृतीत रूढ झालेत. पूर्व दिशेला जीवनाचा आरंभस्वामी देवाधिराज 'इंद्र' दिकपाल म्हणून विराजमान झाला. वेदिक परंपरेत इंद्राला सर्वोच्च स्थान होते. तो महेंद्र होता, शक्र होता, सहस्राक्ष होता. त्याच्यावरती ऋग्वेदात २५० ऋचा लिहिल्या.**

उत्तर वेदिक काळात सर्वच वेदिक देवतांचे महत्त्व कमी होत गेले. पण या वेदिक देवतांना दिकपाल म्हणून उत्तर वेदिक काळात आपल्या संस्कृतीने स्वीकारले. देवाधिराज इंद्र पूर्व दिशेचा दिकपाल झाला. पूर्व दिशेचा जीवनारंभाचा हा स्वामी 'दिकपाल' म्हणून प्रत्येक पुराण ग्रंथांमध्ये डोकावतो. हा पूर्वेचा अधिपती कसा दिसत असेल? बृहतसंहितेमध्ये वर्णन आहे की, त्याच्या एका हातात वज्र आहे आणि त्याच्या कपाळावर समांतर तिसरा डोळा आहे. चार हस्तिदंत असलेल्या पांढऱ्याशुभ्र ऐरावतावर तो विराजमान आहे. मत्स्यपुराणात इंद्राचे फार रोचक आणि बारीक वर्णन आहे. ऐरावतावर आरूढ झालेल्या या दिकपालाच्या उजव्या हातात कुलीश म्हणजे वज्र आहे. त्याच्या डाव्या हातात उत्पल म्हणजे निळे कमळ आहे. त्याने दिव्य वस्त्र परिधान केले आहे. अंगावर रत्नखचित सुवर्णालंकार आहेत. जेव्हा तो सिंहासनावर बसतो तेव्हा त्याच्या बाजूला गंधर्व गाणी गातात. त्याच्या डावीकडे नीलकमल हाती घेऊन इंद्राणी उभी आहे. अगोदरच्या पुराणांमध्ये आणि आगमांमध्ये इंद्राचा रंग सावळा होता. पण विष्णुधर्मोत्तरपुराणापासून बरेचसे बदल जाणवतात.

इंद्राचा रंग आता शुभ्रधवल आहे. त्याच्या दोन उजव्या हातांमध्ये पद्म आणि वज्र आहे, डाव्या बाजूच्या एका हातात अंकुश आहे तर दुसऱ्या डाव्या हाताने इंद्राणीला जवळ घेतले आहे. पुढे कालानुरूप इंद्राच्या प्रतिमेत अजून काही बदल झाले. अभय मुद्रा आणि कमंडलूचीसुद्धा भर पडली. इंद्राचे सर्वात जुने शिल्प भाजे येथील अत्यंत प्राचीन लेण्यांमध्ये आहे. आणि गमतीची गोष्ट म्हणजे त्यात इंद्राने पगडी परिधान केली आहे. वेरूळ येथील कैलास लेण्यात गुहा क्रमांक १६ मध्ये अतिशय कुशलतेने कोरलेले सर्व दीकपाल बघता येतात. यात इंद्र इंद्राणी समवेत ऐरावतावर आरूढ आहे. इंद्राप्रमाणे यमाचेही महत्त्व पौराणिक काळात कमी होत गेले; मात्र दिकपालाचे स्थान त्याने शाश्वत ठेवले. यम म्हणजे दक्षिण दिशेचा दिकपाल. तो साक्षात मृत्यू आहे. विष्णुधर्मोत्तपुराणात तो रेड्यावर बसलेला दिसतो. त्याला चार हात आहेत. एका हातात तलवार, दुसऱ्या हातात सोटा, सोट्यावरची ज्वाला ओकणारी कवटी जिला खटवांग असेही म्हणतात. त्याच्या डाव्या हातात ढाल आणि दुसरा डावा हात धुमोरना देवीच्या कमरेभोवती आहे. धुमोरना ही यमपत्नी नीलवर्णीय आहे आणि युद्धकाळाच्या




वधाची ती देवता आहे. पण युद्धातल्या करुणामय मृत्यूचेही ती प्रतीक आहे. यमाच्या डाव्या बाजूला फास धरून काळही उभा आहे. यमाच्या उजव्या बाजूला राजबिंडा चित्रगुप्त एका हातात लेखणी तर दुसऱ्या हातात पर्ण घेऊन उभा आहे. नैर्ऋत्य दिशेचा दिकपाल नर्ऋती हा राक्षसांचा राजा होता. कालांतराने तो दिकपाल झाला. दिकपाल झाल्यावरही त्याचे राक्षसी स्वरूप बदलले नाही. अनेक आगमांमध्ये तो खड्ग आणि खेटकधारी आहे.त्याने काळे किंवा पिवळे वस्त्र परिधान केले आहे. अनेक आगमांमध्ये त्याचे वाहन म्हणजे मनुष्य आहे. शेवटी मनुष्यही प्राणीच तर आहे! कालिका पुराणात मात्र त्याचे वाहन गाढव आहे. अतिशय भीतिदायक अशी त्याची देहबोली आहे. निर्ऋतीचे शिल्प बघणे म्हणजे एक दुर्मिळ योग आहे. चालुक्यांच्या सुरुवातीच्या राजवटीतले ऐहोल येथे किंवा आलमपूर येथील स्वर्गब्रह्म मंदिरात निर्ऋतीचे शिल्प बघायला मिळते. यात मनुष्याच्या खांद्यावर हा दिकपाल बसला आहे. वेरूळच्या गुहा क्रमांक १६ आणि २९ मध्ये एका नरावर बसलेला निर्ऋती हातात खड्ग घेऊन नैर्ऋत्य दिशेचे रक्षण करायला सज्ज आहे. आग्नेय दिशेचा दिकपाल अग्निदेव वेदिक काळात इंद्र आणि सोमाच्या तुल्यबळ देव होता. नंतर त्याचे महत्त्व हळूहळू कमी होत गेले, पण आग्नेय दिशेचा दिकपाल म्हणून मात्र तो कायमच राहिला. देव आणि मनुष्य योनीमधील हा अत्यंत महत्त्वाचा दुवा. या ब्रह्मपुत्राला 'अभिमानी' असेही म्हणतात. अनेक शिल्पचित्रांमध्ये काळ्या कपड्यातला अग्नी आपल्या भाल्याने अग्निज्वाला फेकत असतो. त्याच्या रथाचे घोडे लालचटुक असतात. चाके सात प्रकारच्या वायुलहरींची असतात. त्याच्याबरोबर नेहमी मेंढा असतो. त्याची पत्नी स्वाहा हाती रत्नमाणकांचा घट घेऊन डाव्या बाजूला बसली असते. त्याची कांती सोन्याहून पिवळी असते. त्याने यज्ञोपवित धारण केले असते. त्याच्या उजव्या आणि डाव्या हातांमध्ये अक्षसूत्र आणि कमंडलू असतात. त्याची दाढी लांबलचक असते. महाभारतात त्याच्या सात लालभडक जिव्हांचे वर्णन केले आहे. त्याची सात तोंडे आहेत, गळा लाल आहे, डोळे तांबारलेले आहेत, जबडा अक्राळविक्राळ आहे, त्याच्या अवतीभवती धुराचे लोट आहेत. वेरूळच्या १६ क्रमांकाच्या गुहेत अग्निदेव सव्यललितासन घालून बसलेले दिसतात. पश्चिम दिशेचा हा दिकपाल आपला जलेश्वर वरुणदेव आहे. बृहतसंहितेमध्ये सांगितले आहे की, वरुण हंसावर बसतो आणि त्याच्या हातात पाश असतो. पण अग्निपुराणात त्याचे वाहन मगर सांगितले आहे. 'मकरे वरुणा पासें', पण सर्वात अद्भुत वर्णन मानसोल्लासात केलेले आहे. वरुण दिकपाल मोगरा, चंद्र आणि शंखासारखा श्वेतवर्णीय आहे. त्याच्या हातात पाश आणि कमळ आहे. तो त्याचे वाहन मगरीवरती बसलेला आहे. त्याने शुभ्र वस्त्रे परिधान केली आहेत आणि गळ्यात मोत्यांच्या सरी घातलेल्या आहेत. बहुतांशी उत्तर प्रदेशीय शिल्पांमध्ये वरुणदेव दोन किंवा चार हातांचा आणि हाती कमळ, पाश, रत्नपात्र आणि पुस्तक घेतलेला आहे. श्रीशैलम, लेपाक्षी आणि कालहस्ती शिल्पकलेत लेपाक्षी येथील वरुणदेव मात्र वेगळा आहे. त्याचे चार हात आहेत. वरच्या दोन हातांमध्ये पाश आहेत, पण खालचे हात अभय आणि वरद मुद्रेत आहेत.

वायू देवाला ऋग्वेदात कधीच महत्त्वाचे स्थान मिळाले नाही; पण नंतर रामायण-महाभारतामध्ये तो भिमाचा आणि उत्तर वेदिक काळात हनुमानाचा पिता म्हणून प्रसिद्ध पावला. तो वायव्य दिशेचा दिकपाल झाला. अग्निपुराणानुसार त्याचे वाहन हरीण आहे आणि त्याच्या हातात वज्र आहे. 'वायू वज्रधरो म्रीगों' तो राखडी रंगाचा आहे आणि त्याने विविध रंगाचे कपडे घातले आहेत. हा तरुण सळसळत्या उत्साहाचा असला तरी नजर मात्र शांत आहे. त्याच्या एका हाताने वरदमुद्रा धारण केली आहे आणि दुसऱ्या हाताने पथक ध्वज धरलेला आहे. हरणावर आरूढ होऊन तो पळतो आहे. केवढे सुंदर वर्णन केले आहे अग्निपुराणात! वेरूळ लेण्यांमध्ये शिवपार्वती विवाहावेळी वरुणदेव हजर आहे. अतिशय देखणा आणि हरणावर आरूढ झालेला हा वरुणदेव मन मोहून टाकणारा आहे. अथर्ववेदामध्ये कुबेराचा सर्वप्रथम उल्लेख आला आहे. बृहत् संहितेत त्याला यक्षांचा राजा मानण्यात आले आणि त्याला धनेश किंवा धनेश्वर म्हणण्यात आले. महाभारतातदेखील त्याच्या समृद्धीचे उल्लेख आहेत आणि उत्तर दिशेचा दिकपाल म्हणून त्याची ओळख आहे. पुराणांमध्ये तो शंकराचा मित्र आहे. हिद्धी त्याची पत्नी आहे.

बौद्ध वाङ्मयामध्येदेखील तो उत्तर दिशेचा स्वामी, हरितीचा पती आणि यक्षांचा राजा म्हणून ओळखला जातो. बृहत् संहितेत तो पोट सुटलेला आणि माणसाचा वाहन म्हणून उपयोग करणारा उत्तरेचा स्वामी आहे. त्याच्या डोक्यावर डाव्या बाजूने कललेला मुकुट आहे. अनेक प्राचीन आगमांमध्ये तो 'खरवाहन' म्हणजे गाढवावरती स्वार होतो. अग्निपुराणात तो गदाधारी आहे. बहुतांशी सर्व आगम पुराणांमध्ये तो मोठ्या पोटाचा, रुंद खांद्यांचा, गदाधारी आणि एका हाताने वरदमुद्रा धारण करणारा आहे. ईशान देव ईशान्य दिशेचा अधिपती आहे. त्याला गौरीश्वर असेही म्हणतात. ईशान देवाचे शिल्प फारच दुर्मिळ आहेत. त्याला तीन डोळे आहेत. त्याची नजर शांत आहे. त्याचा वर्ण शुभ्र आहे. त्याची वस्त्रेही धवल आहेत. तो बैलावर आरूढ आहे. हातात गदा आहे. ईशान देवाचे शिल्प फार दुर्मिळ आहे. पण ऐहोल येथील कोटीगुडी येथे सभामंडपाच्या वरच्या भिंतीवर हे शिल्प सापडते. या शिल्पामध्ये त्याचे चार हात आहेत. डाव्या हातात त्याने अतिशय विषारी नाग धरलेला आहे. एका हाताची त्याची अभय मुद्रा ओळखू येते आहे. काळाच्या ओघात वेदिक देवतांचे महत्त्व कमी होत गेले. पण दिकपालांच्या रूपात ते आपल्या खाणाखुणा उत्तर वेदिक काळात सोडून गेले. आजही हे अष्टदिकपाल मंदिरांच्या द्वारांवर किंवा कमानींवर उभे राहून सबंध मानवजातीला आशीर्वाद देत आहेत. अष्टदिशांवर जागता पहारा ठेवत आहेत. प्राचीन संस्कृतीचे हे निसटते दुवे केव्हातरी कुठेतरी दिसतात आणि मन कृतज्ञतेने उचंबळून येते.

## साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# बदललेल्या ऋतूंचे संदर्भ शोधताना...



**निसर्गाचे आणि माणसाचे अतुट नाते आहे, हे सांगण्याची खरे तर गरजच नाही. कारण निसर्गाचा एक सूक्ष्मघटक म्हणजे मानव होय. मात्र, कालांतराने बुद्धीच्या जोरावर निसर्गावर मात करत मानव सृष्टीवर राज्य करण्याचे स्वप्न पाहू लागला. ते बऱ्याच प्रमाणात सत्यातही उतरू लागले. मात्र जेव्हा जेव्हा निसर्गाने आपल्या शक्तीचे विकराल रूप मानव जातीला दाखवले तेव्हा मानव समाजाची अपरिमित हानी झालेली आपण पाहिली आहे. असे असले तरी मानव निसर्गाशी छेडखानी करून आपल्या अस्तित्वाच्या मुद्रा जिथे तिथे उमटवण्याचा प्रयत्न करतो. असे असताना अतिशय मोजके लोक आजच्या वर्तमान युगात यंत्र आणि यांत्रिकता याच्या पल्याड जाऊन निसर्गाशी रममान होताना दिसतात. तसा या निसर्गात फिरण्याचा छंद मला बऱ्यापैकी आहे.**

वसंत ऋतु फुलून आल्यावर धगधगत्या उन्हात मशालीप्रमाणे लाल केशरी टेंभे घेऊन उभे राहणारे पळस असो की, गुलमोहर ते नेहमीच माझ्या आकर्षणाचे ठिकाण राहिले आहे. आधुनिक तंत्रज्ञान आल्यापासून वेगवेगळ्या झाडांचे छायाचित्र काढून ते लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी अनेकदा प्रयत्न केला. पिवळ्या पळसाचे झाड कधी एकदा आपण पाहतो आणि तो बहर डोळ्यांनी टिपतो असे कधीकाळी मला झाले होते. ३५-४० फूट उंचावरील चिंचेच्या झाडावर चढून पक्ष्यांच्या पिल्लाचे निरीक्षण करण्याचे आणि त्यांचे फोटो टिपण्याचे कामही आम्ही केले.

अरण्यऋषी म्हणून त्यांची ओळख आपल्या सर्वांना आहे ते मारुती चितमपल्ली, ज्यांच्या साहित्यामध्ये निसर्ग विपुल प्रमाणात आढळतो असे व्यंकटेश माडगूळकर यांचे साहित्य मधल्या काळात मी बर्यापैकी वाचले. ऋतुचक्र लिहिणाऱ्या दुर्गाबाई भागवत यांच पैस खरे तर साहित्य अकादमी प्राप्त पुस्तकाच्या माझ्या एका प्रकल्पाच्या संदर्भात मी वाचले. मात्र, व्यासपर्वमध्ये त्यांनी लिहिलेली एकलव्याची व्यथा मला जास्त भावली. त्यानंतर त्यांचे ऋतुचक्र वाचवण्यात आले आणि पाहता पाहता माझ्या आवडीच्या पहिल्या पाच पुस्तकात त्यांचा समावेश झाला. ऋतुचक्र प्रमाणे श्याम पेठकर यांचे ऋतुस्पर्श हे सुद्धा माझ्या मनाला स्पर्शून गेलेले ऋतू वर्णन होय.

१९५६ पूर्वी पाहिलेला निसर्गाचा खेळ आणि ऋतूंचा मेळ दुर्गा भागवत यांच्या ऋतुचक्रमध्ये अजूनही अलवार सजीवतेसह पसरलेला आहे. मात्र १९५६ पूर्वीचा हा निसर्ग आणि हे ऋतू आज जवळपास बदलून गेले आहेत असे मला वाटले. आणि साधारण ७० वर्षांमध्ये बदलून गेलेल्या ऋतूसह बदलत गेलेल्या जीवनमानाचे अनेक पडसाद मनाच्या पटलावर उमटू लागले.

बदललेल्या ऋतूंचे संदर्भ या नावाने मी अगोदर एक लेख लिहिला. त्या लेखात साधारणपणे मागच्या शंभर वर्षात वेगवेगळ्या टप्प्यावर माणसाचे जीवन कसे बदलत गेले, याचा आढावा घेत आठवणींची पोटली उघडलेली होती. तो लेख प्रकाशित झाल्यावर भावनांनी ओथंबलेले अनेक प्रतिक्रिया देणारे फोन मला आले. गहिवरून आणि भरून येत ओलसर आणि कातर स्वरात अनेकांनी आपल्या काळात जसे होते तसे आज राहिले नाही अशी जाणीव करून दिली. योगायोगाने त्याच काळात कालिदासाचे मेघदूतम, ऋतु संहार यासह द हिडन लाईफ ऑफ ट्रीज अशी निसर्गाने ओतंबलेली पुस्तके माझ्या वाचनात आली. निसर्गकल्लोळ हे एक पुस्तक वाचायचे राहून गेले ते सावकाश वाचता येईलच. मात्र, या सर्वांचा परिणाम असा झाला की, मला कालिदासाच्या कालखंडातील निसर्ग वर्णनापासून आचार्य अत्रे यांच्या आषाढस्थ प्रथमदिवसेपासून ऋतू हिरवा, ऋतू बरवा यासह शांता शेळके, दुर्गा भागवत, शाम पेठकर इत्यादी लेखकांच्या निसर्ग वर्णनात्मक लेखनाची भुरळ पडली. या सर्वांच्या कालखंडातील निसर्ग मला जगता आला. त्यानंतर माझ्या जाणत्या वयात म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षापासून आजपासून ३५ ते ४० वर्षांपूर्वीचे जनजीवन आणि निसर्ग यांची तुलना आजच्या काळातील जीवन आणि निसर्ग यांच्याशी होऊ लागली. आठवणींचा कल्लोळ मनात दाटू लागला त्याचवेळी तरुण भारतकडून स्तंभ लेखनाची बोलणी सुरू होती. त्यांना निसर्ग या विषयावर मी लिखाण देतो असे सांगून बदललेल्या ऋतूंचे संदर्भ या लेखमालेची सुरुवात झाली.

मराठी ऋतू आणि मराठी महिने यावर केंद्रित करून साधारण कालिदासाच्या काळातील निसर्ग, शंभर वर्षांपूर्वीचा निसर्ग, ५० ते ६० वर्षांपूर्वीचा निसर्ग, २५ ते ३० वर्षांपूर्वीचा निसर्ग आणि आजचा पूर्णपणे बदलत गेलेला निसर्ग यावर मी मुक्तपणे चिंतन करत लिखाण करत गेलो ते अनेक वाचकांना आवडत गेले. वसंत ऋतु आणि चैत्र यातील मनोहारी निसर्ग जितका लाघवी होता तितकेच त्याबद्दल लिहिताना मला अप्रूप होते. मात्र, नंतर माझ्या असे लक्षात आले की ग्रीष्मातील रणरणत्या उन्हावर लिहिणे असो की हेमंतातील कडाडत्या थंडीवर लिहिणे असो तुम्ही निसर्गाशी एकरूप झालात की तुम्ही एकाच त तन्मयतेने लिहू शकता. खरे पाहिले तर आजच्या लोभस वसंत ऋतु पेक्षा चाळीसेक वर्षापूर्वीचा रखरखीत ग्रीष्म आणि शिशिरातील पानगळीचा ओसाडपणा सुद्ध जास्ता ओलावा धरून होता. हे सर्व लिहीत असताना वारा, पाऊस, आभाळ, चांदण्या, सूर्य, नदी नाले, झाडे, पशुपक्षी प्रसंगी जंगलातील प्राणी अशी ज्याची कोणाची मला आठवण येत राहिली त्याची नोंदणी त्या- त्या पातळीवर घेतली. एखादा डोह आटून गेल्यावर त्यातील मासोळ्या त्यांचे कोणतेही अवशेष न ठेवता कुठे अदृश्य होतात? किंवा आपल्या लहानपणी एखादा मदारी अस्वल आणि त्याच्या पिल्लाला घेऊन त्यांचे खेळ करण्यासाठी आपल्या दारात येत असेल त्यावेळी पाळीव वाटणारे हे अस्वल आज अत्यंत हिंस्र का झाले असावे? असे प्रश्न मला लेख लिहिताना पडत गेले आणि त्याचे उत्तर शोधताना माझे वाचक कासावीस होत गेले. त्यांनी दिलेली अशी प्रामाणिक कबुली हे माझ्या लेखनाचे म्हटले तर यश आहे असे मला वाटते. देऊळगाव कुंडपाळ या खेड्यातील महार्या या नावाच्या आंब्याची कथा सांगत असताना कधीकाळी आंब्याला सुद्धा जातिवाचक नामाने पुकारण्याचा असा प्रघात होता यावर मला भाष्य करावे वाटले. अर्थात यातील कोणतेही लेखन कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता जसे आठवले तसे लिहिले या एकाच तत्वाने अगोदर मनात आणि नंतर कागदावर उतरत गेले आहे असे मला या ठिकाणी सांगावे वाटते. जवळपास निसर्गाच्या या प्रवासात वर्षभराची फेरी मारल्यानंतर कुठेतरी थांबणे आणि घडीभर विश्रांती घेणे गरजेचे असते.

कोणी थांब म्हटले नाही तरी नेमके कुठे थांबले थांबायला हवे हे आपले आपल्याला समजायला हवे या जाणिवेतून बदललेल्या कालखंडाचे अनेक संदर्भ माझ्या मनात रुंजी घालत असले तरी ऋतूंचे जेवढे संदर्भ झाले तेवढे पुरेसे आहेत असे मला वाटते.

## वेधक

राहुल बोरगांवकर

# देर आए, दुरुस्त आए!

या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दोन निकालांनी देशातील निगरगट्ट राजकीय नेत्यांना दोन सणसणीत चपराक लगावल्या आहेत. एका निकालामुळे उत्तराखंडमधील हलद्वनी या शहराच्या रेल्वेमार्गाभोवती असलेल्या शेकडो एकर रेल्वेच्या जमिनीवर बेकायदा कब्जा करून राहात असलेल्या हजारो लोकांना ही जागा आता रिक्त करून अन्यत्र जावे लागणार आहे. दुसरा निकाल हा सर्वोच्च न्यायालयापुढे राजकीय चलाखी चालत नाही, हे सिद्ध करणारा ठरला आहे.
या निकालामुळे प. बंगालमध्ये मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणाची मोहीम (एसआयआर) अधिकच वेगवान करण्यात आली असून, तिच्या अंमलबजावणीत अडथळा आणणार्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे सारे अधिकार काढून घेण्यात आले आहेत.

वर्षानुवर्षे बोगस आणि बेकायदा मतदारांच्या मतांच्या जोरावर निवडणूक जिंकणार्या प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे राजकीय डावपेचांना काटशह देण्यात सर्वोच्च न्यायालयाला यश आले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेल्या 'एसआयआर' या मोहिमेला देशातील अन्य कोणत्याही राज्यात विरोध झाला नसून, तो फक्त प. बंगालमध्ये झाला. याचे कारण, यामुळे ममतांचे लाखो बोगस मतदार नाहीसे होणार होते. बांगलादेशातून बेकायदा आलेल्या लोकांना आणि रोहिंग्यांना सर्व सरकारी कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे काम ममता यांच्या सरकारने केले होते.

या कागदपत्रांच्या जोरावर या लोकांना बंगालच्या मतदारयाद्यांमध्ये घुसविण्यात आले होते. पण, 'एसआयआर' ही मोहीम अशाच बोगस मतदारांचा शोध घेऊन त्यांना या याद्यांतून वगळण्यासाठी राबविली जाते. तसेच मृत मतदारांची नावेही गाळली जातात. या मोहिमेमुळे आपला मतदारांचा पायाच खचेल, हे लक्षात आल्यामुळे ममतांनी या मोहिमेचा कडाडून विरोध सुरू केला होता. राज्यात निवडणूक आयोगाच्या अधिकार्यांना कसलेही सहकार्य देण्यात येत नव्हते. उलट, अनेकांना धमक्याही दिल्या जात होत्या. बंगालमधील कायदा-सुव्यवस्थेची स्थिती यथातथाच असून, आता तेथे कायद्याचे राज्यही उरले नव्हते. त्यानंतर 'एसआयआर'ला काहीही करून विरोध करण्यात आला. त्यासाठी ममता बॅनर्जी दिल्लीत आल्या आणि तेथे त्यांनी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांची भेट घेतली. पण, ही भेट त्यांना धमकाविण्यासाठी आणि त्यांच्यावर बेछूट आरोप करून त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी होती.

इतके करून ममतांचे समाधान झाले नाही. त्यानंतर त्या थेट सर्वोच्च न्यायालयात जाऊन पोहोचल्या. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या पीठापुढे काळी शाल अंगावर ओढून त्यांनी या मोहिमेविरोधात जोरदार बाजू मांडली. मात्र, तुमच्या सरकारने नेमलेल्या वकिलांवरही तुमचा विश्वास नाही का? या न्यायालयाच्या प्रश्नावर त्यांच्याकडे उत्तर नव्हते. कारण, त्यांना 'व्हिक्टिम' कार्ड खेळायचे होते. आपल्यावर कसा अन्याय होत आहे, ते दाखवून द्यायचे होते. अर्थात, न्यायालयावर या नाटकबाजीचा कसलाच परिणाम झाला नाही. न्यायालयाने त्यांच्या या सुनावणीनंतर दिलेल्या निकालाने ममतांच्या नाटकाचे ढोंग उघडे पडल्याचे दिसते.



**सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने ममता बॅनर्जी यांच्या आक्रस्ताळ्या वर्तनाला चाप तर लावलाच; पण त्यांची राजकीय चलाखीही निष्प्रभ करून टाकली. न्यायालयाच्या या आदेशाने जे केंद्र सरकारला जमले नाही, ते घडून आले. या आदेशाने घटनेचे '३५६ कलम' न लावताही ममतांना सत्ताहीन मुख्यमंत्री केले आहे; दुसरीकडे अनेक दशके सरकारी जमिनीवर कब्जा केलेल्यांनाही तेथून कोणतीही भरपाई न देता हुसकावून लावणे शक्य आहे, हे सर्वोच्च न्यायालयाने दाखवून दिले.**

बंगालमधील 'एसआयआर' चालूच ठेवण्याचा आदेश देताना निवडणूक आयोगाच्या कामकाजात कसलाही हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला. 'एसआयआर' ही मान्यताप्राप्त कायदेशीर प्रक्रिया असून, ती राबविण्याचा निवडणूक आयोगाला पूर्ण अधिकार असल्याचेही न्यायालयाने सांगितले. इतकेच नव्हे, तर मतदारांच्या पडताळणीसाठी राज्य सरकारचे कर्मचारी नव्हे, तर दिवाणी न्यायाधीशांच्या नियुक्त्या करण्याचा आदेश देण्यात आला. कारण, राज्य सरकारचे कर्मचारी हे प्रामुख्याने तृणमूल काँग्रेसचेच समर्थक आहेत. या सुधारित मतदारयाद्या येत्या शनिवारी, म्हणजे दि. २८ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध करायच्या आहेत. पण, हे काम इतक्या कमी दिवसांत कसे पार पडणार? असा प्रश्न उपस्थित केला असता, सर्वोच्च न्यायालयाने लगतच्या झारखंड आणि ओडिशा राज्यातील दिवाणी न्यायाधीशांची तात्पुरती नियुक्ती करण्याचे आदेश दिले.

खरी मेख तर पुढेच आहे. काही कारणाने येत्या शनिवारी ही सुधारित मतदारयादी प्रसिद्ध होऊ शकली नाही, तर या मोहिमेला मुदतवाढ देण्यात येईल, असे न्यायालयाने सांगितले. तसे झाल्यास प. बंगाल विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक बिघडू शकते. येत्या मार्च-एप्रिलमध्ये या निवडणुका होणार आहेत. पण, मतदारयाद्या तयार झाल्या नाहीत, तर निवडणूक लांबविली जाईल. तसे झाल्यास राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाईल. ही ममतांसाठी सर्वात मोठी चिंताजनक बाब आहे. कारण, राष्ट्रपती राजवटीत सारे अधिकार केंद्र सरकारच्या हाती जातील आणि ममतांना केवळ बघ्याची भूमिका घ्यावी लागेल.

न्यायालयाच्या दुसर्या निर्णयाचा देशव्यापी परिणाम होऊ शकतो. उत्तराखंडमधील हलद्वनी या शहराच्या रेल्वे स्थानकालगतच्या शेकडो एकर सरकारी जागेवर मुस्लिमांनी गेली चार-पाच दशके बेकायदा कब्जा केला आहे. रेल्वे खात्याला रेल्वेमार्गाच्या विस्तारासाठी ही जमीन हवी आहे. पण, या बेकायदा वस्तीमुळे रेल्वे हतबल होती. या बेकायदा वस्तीला तेथून उठविण्यासाठी २०२२ मध्ये रेल्वे खाते कनिष्ठ न्यायालयात गेले. तेथे न्यायालयाने रेल्वेच्या बाजूने निकाल दिला; पण संबंधित लोक सर्वोच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने आधी स्थगिती आदेश दिला; पण आता हे प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी आल्यावर न्यायालयाने ही जागा रिक्त करण्याचा आदेश बेकायदा रहिवाशांना दिला.

आपण तेथे अनेक दशकांपासून राहात आहोत, आता कुठे जाणार, अशाप्रकारची भावनिक आवाहने करण्यात आली. या बेकायदा लोकांचे नेतृत्त्व अर्थातच, प्रशांत भूषण आणि अभिषेक मनू संघवी यांसारख्या देशातील अग्रगण्य वकिलांनी केले. पण, न्यायालयाने त्यांचे म्हणणे साफ धुडकावून लावले. तुम्ही 'पंतप्रधान मोफत घर योजने'मध्ये गरिबांना मिळणार्या मोफत घरांसाठी अर्ज करा, असा सल्ला देतानाच न्यायालयाने या वकिलांना सांगितले की, त्यासाठी तुमचे 'अशील' या योजनेसाठी पात्र आहेत का, तेही तपासून घ्यावे लागेल. या बेकायदा रहिवाशांना कोणतीही नुकसानभरपाई देण्यास न्यायालयाने नकार दिला.

'देवाच्या दरबारात उशीर होतो; पण अन्याय होत नाही,' असे एक हिंदी वचन आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या दोन निकालांनी त्याची प्रचिती आणून दिली आहे.

## कथा

डॉ. आरती केळकर

# कळत नकळत

रविवारी सकाळी डॉक्टर रवी अंगणात पेपर वाचत बसले होते. एक स्कूटर येऊन थांबते. स्कूटरस्वार मोठ्या अदबीने रवीला नमस्कार करतो आणि हेल्मेट काढत विचारतो, ''ओळखलं का मला सर?'' ''सॉरी; मी नाही ओळखलं.'' ''एक मिनिट थांबा सर.'' स्कूटरस्वार स्कूटरमधून सफाई कामगाराचा युनिफॉर्म काढून चढवतो, चेहऱ्यावर फडकं बांधतो आणि विचारतो, ''आता ओळखलं सर?'' ''अरे देवा! म्हणजे देवांश! देवा !! तू? माफ कर, तू नेहमीच्या युनिफॉर्ममध्ये नसल्यामुळे तुला ओळखलंच नाही.'' ''कोरोना म्हणा की काळाचा महिमा, आता झाकल्या चेहऱ्यांमध्येच माणसांची ओळख पटायला लागली आहे.'' ''अरे पण काय छान वाटलं तुला पाहून! कुठे होतास इतके दिवस?'' ''सांगतो, सगळं सांगतो. आज तुम्हाला भेटायला माझी फौज येणार आहे.'' पाचच मिनिटात सोनू आणि सुमी- नवरा-बायकोची मस्त जोडी मीनूसकट अंगणात हजर झाली. डॉक्टरांनी मीनू आणि सुमीला लगेच ओळखले. हे सगळं काय सुरू आहे हे त्यांना कळेना. देवांशने सुरुवात केली. ''यातलं तुम्हाला काही आठवायचं नाही कदाचित; पण तुम्ही जे केलं त्याने आम्हा चौघांचं आयुष्य बदललं.'' देवांश बोलत होता... ''एक-दीड वर्षांपूर्वीचा तो डिसेंबर महिना होता.



सकाळचे ६ वाजूनसुद्धा बऱ्यापैकी काळोख होता. गारठा असा की सूर्याला पण उशिरा उठावसं वाटत असेल. झाडू धरलेले माझे हात थंड पडले होते; तरी मी सफाई करण्याचा प्रयत्न करत होतो. मनात भावनांचे काहूर माजले होते. ग्रॅज्युएशन करून चांगली नोकरी करायचे स्वप्न पाहणाऱ्या माझ्या हातात नियतीने झाडू का थमवला, या विचारात आपल्याच झाडूने जणू मी माझी स्वप्ने झाडत होतो.'' ''चांगला विद्यार्थी असल्यामुळे मला शिष्यवृत्ती मिळाली होती. बीएस्सी फर्स्ट ईयर फर्स्ट क्लास पास झाल्यामुळे भविष्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना होत्या. खूप शिकायचं होतं, पण दुर्दैवाने कोरोनाने माझ्या आई-वडिलांची छत्रछाया हिरावून नेली. मला आणि माझ्या बहिणीला- मीनाक्षीला पोरकं केलं. वडिलांच्या शिपाईच्या नोकरीऐवजी मुन्सिपालटीने मला नोकरी दिली; पण सफाई कामगाराची, फक्त बारावी पास असल्यामुळे.'' एके दिवशी सकाळी रस्ते झाडत असताना 'बढिया काम करते हो भाई' म्हणून कुणीतरी मला दाद दिली. फडकं बांधलेल्या चेहऱ्याने मी वर पाहिलं, वॉकला जाणारी ती व्यक्ती म्हणजे तुम्ही हात हवेत उंच करून, अभिवादन करीत पुढे निघूनही गेला होता. दुसऱ्या दिवशी त्याच वेळी पुन्हा मला तुम्ही येताना दिसला. जवळून जाताना हात उंचावून माझं अभिवादन केलं आणि 'बहोत बढिया काम भाई, बहुत बढिया' म्हणून छान हसत निघून गेले. आज मला खात्री पटली की कालही तुम्ही, मलाच उद्देशून ते वाक्य म्हटले होते.

मला एक वेगळी अनुभूती झाली. कडाक्याच्या थंडीत त्या शब्दांनी जणू ऊब मिळाली. माझं काम बढिया आहे हे कुणी म्हणाल्यावर अधिक उत्साहाने कामाला लागलो. आपल्या आयुष्यातही काही चांगले घडणार आहे, असं मन सांगायला लागलं. त्या दिवशी सफाई झाल्यानंतर कधी नव्हे तर इतर कामगार/पेपर वाटणारे जिथे चहा प्यायला भेटायचे तिथे मी पण पोचलो.. चहावाला हाच तो सोनू!'' आता सोनू पुढे बोलू लागला, ''देवा पहिल्यांदा माझ्या स्टॉलवर आला होता. आम्ही एकमेकांच्या घराजवळ राहतो, एवढंच माहिती होतं. मी देवाला चहा दिला. पहिला घोट घेताच त्याला ताजंतवानं वाटलं आणि तो लगेच मला म्हणाला, सोनू भाऊ तुमची कमाल आहे. इतक्या सकाळी थंडीत तुम्ही सगळ्यांचा विचार करता, चहा पाजता. किती कष्ट घेता!'' शेजारी चहा पीत उभ्या बागडे जमादारानेदेखील याला दुजोरा दिला. ''हे ऐकून मी हैराण झालो. माझी कमाई व्हावी म्हणून इतर दुकानदारांच्या आधी मी दुकान उघडतो, यात माझी तारीफ करण्यासारखं काय आहे? काही असो, पण कुठेही मला ती प्रशंसा खोटी वाटली नव्हती; उलट त्या वाक्यांनी मला नवे उत्तेजन मिळाले. इतक्या थंडीत कामाला येण्याचा अर्थ दुसऱ्यांसाठी आपण घेतलेले 'सेवाभावी कष्ट' असाही असू शकतो, हे मला कधी सुचलंच नव्हतं. त्यांच्या त्या वाक्याने मला स्वतःचा कामाबद्दल अभिमान का वाटू लागला, मला माझंच समजेना!'' ''डॉक्टर साहेब! मी नेहमी स्वतःवर नाराज असायचो. त्याला अनेक कारणं होती. तेव्हा वाटायचं जगातला सर्वात कमनशिबी माणूस म्हणजे मीच! तीन भावांमध्ये मी सगळ्यात लहान आहे. लहान-लहान म्हणून मला माझ्याच घरात काही किंमत नाही, हे न्यूनगंड होतं.

शिक्षण पूर्ण न करता एक दिवस मी गावातलं घर सोडून रूम घेऊन शहरात राहू लागलो, खूप नोकऱ्या शोधल्या, पण शिक्षण नसताना नोकरी कोण देणार? शेवटी चौकात चहा टपरी चालवू लागलो. काही महिन्यातच आई आजारी पडली तिची शेवटची इच्छा म्हणून माझं लग्न घाईघाईत फार गरीब घरच्या, या सुमीशी लावून देण्यात आलं. यामुळे माझा मनःस्ताप अजून वाढला. गंमत म्हणजे सुमीच्या सेवेमुळे आई बरी झाली.'' सुमी म्हणाली, ''लग्नानंतरचे ते दिवस फार विचित्र होते. मी खेड्यातली, गरिबीत वाढलेली. माझ्या मागे अजून दोघी बहिणी. आई-वडिलांनी मला न विचारता, माझं शिक्षण सोडवून सोनूशी लग्न ठरवून दिलं.

आमच्याच गावातला, शहरात राहणारा स्वतः कमवणारा, आमच्याच जातीचा मुलगा वगैरे वगैरे नेहमीची कारणे! सोनू दिसायला चांगलाच आहे, शहरात राहतो, राजा-राणीसारखा आमचा संसार होईल, मी शहरात माझं शिक्षण पूर्ण करीन, असं म्हणून मीच माझं सांत्वन केलं, पण सत्य परिस्थिती औरच होती.'' ''लग्न करून जणू (पान ६ वर)

संत

प्रकाश एदलाबादकर



# तरी न्यून तें पुरतें, अधिक तें सरत

चार वेद, अठरा पुराणे, उपनिषदे, श्रीरामायण, श्रीमन्महाभारत, श्रीमद्भागवत, भगवद्गीता, सहा दर्शने आणि संतांनी लिहिलेले, सांगितलेले आणि दर्शविलेले भक्तिपंथ हे सर्व आपल्या जगण्याच्या वाटेवरील दीपस्तंभ आहेत. याच दीपस्तंभांच्या प्रकाशात प्राचीन काळापासून मानवसमाज, विशेषतः भारतीय जनमानस आपली वाटचाल करीत आहे. या ग्रंथांमधून निवेदित केलेले ज्ञान पिढी दर पिढी एखाद्या पवित्र संचितासारखे आपल्या जीवनप्रवाहाशी एकरूप झालेले आहे. आपल्या दररोजच्या व्यवहारात, प्रपंचात, समाजात इतकेच नव्हे तर राष्ट्राच्याही व्यवहारात वावरताना आलेल्या समस्यांचा परिहार करण्याचे सामर्थ्य याच ग्रंथांमध्ये आहे. म्हणूनच केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर संपूर्ण भारतवर्षातील ऋषिमुनींनी, संतांनी, मनीषींनी, समाजचिंतकांनी या विचारांचा मागोवा घेतला. उत्तम आणि उत्कृष्ट समाजधारणेसाठी याच विचारांची आणि तत्त्वज्ञानाची कास धरली.

समाजाला नीतीच्या मार्गावर नेण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. त्यासाठी आपली लेखणी, वाणी आणि करणी झिजविली. समाजाचे नीतिधैर्य कोणत्याही कारणाने खच्ची होऊ नये यासाठी समाजात नेहमी शुभ, मंगल आणि शाश्वत मूल्यांची पेरणी केली. त्यासाठी आधार घेतला तो याच ग्रंथांचा! आपल्या महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले, तर योगिराज संत ज्ञानेश्वर, भक्तिरूप संत नामदेव, शांतिब्रह्म संत एकनाथ, समाजशील संत जगद्गुरू तुकोबाराय आणि ऐहिकतेतून परमार्थ साधायला सांगणारे राष्ट्रगुरू समर्थ रामदास या संतपंचकाने आणि त्यांच्या अनुयायांनी महाराष्ट्राच्या मातीचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक भरणपोषण केले. वेळोवेळी समाजाला जागृत करून त्याचे मन शुभकार्याकडे वळविले. समाजाचे मन आणि मनगट तयार केले. व्यक्ती-व्यक्तींमध्ये माणुसकीचे आणि चांगूलपणाचे बीज रोवले. पराक्रमाची बीजे रोवून शौर्याची विजिगीषा जागृत केली. या सर्व संत- माहात्म्यांचे शब्द आमच्यासाठी वेदवाक्य झाले. या शब्दांमधूनच जे काही सापडले आणि मनाला भावले ते या दीपमाळेतून मांडण्याचा एक अल्पसा प्रयत्न, माझ्या अल्पबुद्धीनुसार, मी केला. कोणतेही लेखन म्हणजे आत्मशोध असतो, असे अनेक ज्येष्ठ साहित्यिक सांगून गेलेले आहेत. स्वतःचा शोध घेणे म्हणजेच भगवंताकडे जाणे. या आत्मशोधाच्या वाटेवरचा प्रवास मलाही समाधान देऊन गेला. मागील वर्षीच्या रामनवमीपासून प्रारंभ झालेल्या या प्रवासाला आजच्या लेखाने मी पूर्णविराम देतो आहे.

**'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे।**
**परंतु तेथे परमेश्वराचे। अधिष्ठान पाहिजे।।'**

असे समर्थ सांगून गेले. लेखन ही एक चळवळ असेल तर माझ्या लेखनाला परमेश्वरी अधिष्ठान असावे, हे पथ्य मी कसोशीने पाळले. या लेखनातून समाजात एक चांगले आणि होकारात्मक परिवर्तन व्हावे हाच माझा हेतू होता. वेदांनी ज्ञान सांगितले. उपनिषदांनीही ज्ञानालाच प्राधान्य दिले. परंतु हे सर्व करताना या ग्रंथांनी भक्तीलाही तेवढेच महत्त्व दिले. भक्तीचा मूलगामी पुरस्कार ज्या ग्रंथांनी केला ते ग्रंथ म्हणजे गीता आणि भागवत! संतांच्या काळात हिंदू समाजात माजलेले वैचारिक अराजक, राजकीय अस्वस्थता, देवाधर्माच्या क्षेत्रात माजलेली विषमता, जाती-जातींमधील तेढ यांनी पराकोटी गाठलेली होती. आजही त्यात काही फरक पडलेला आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. अनेक देव, त्यांच्या उपासनेचे अनेक पंथ, नाना मते, नाना मंत्र, शास्त्राला फुटलेली पाखंडी मते, बुवाबाजीचे थोतांड यामुळे समाज पोखरला होता. पारमार्थिक क्षेत्रातही मतभिन्नता होती. अशा काळात संतांनी सर्व समाजाला एकाच विचाराने भारून टाकण्यासाठी क्रांतिकारी पाऊल उचलले. सर्व समाज एकाच ध्वजाखाली यावा यासाठी भक्तीचे साधन वापरले.

**'सोपे वर्म आम्हा। सांगितले संती।**
**टाळ दिंडी हाती। घेऊनि नाचा।।'**

या वचनामागील रहस्य समजून घेतले पाहिजे. समाज 'निश्चल' म्हणजे एकाच तत्त्वाखाली राहावा याऐवजी 'चंचल' याच तत्त्वाचा पाठपुरावा अंधश्रद्धेने केला जात होता. समाजातील सज्जनांची दखल घेतली जात नव्हती. समर्थ म्हणतात...

**'येक निश्चळ येक। चंचळी गुंतले सकळ।**
**निश्चळ ते निश्चळ। जैसे तैसे।।**
**पाहे निश्चळाचा विवेक। ऐसा लक्षांमध्ये येक।**
**निश्चळ ऐसा निश्चयात्मक । निश्चळिच तो ।।**
**या निश्चळाच्या गोष्टी सांगती। पुन्हा चंचळाकडे धावती । चंचळचक्री निघोनि जाती। ऐसे थोडे।।'**

यामुळे अशाश्वत तत्त्वांचा बडिवार माजू लागला. ही अराजकता आणि अविवेकी परिस्थिती दूर करण्याचे पहिले कार्य जर कुणी केले असेल तर ते संत ज्ञानेश्वरांनी! पांडुरंग हे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत. विठुमाउली म्हणून त्याला आईचे स्थान दिले ते वारकरी पंथाने, मनुष्यमात्र एक व्हावा याच तळमळीने ज्ञानदेवांनी, गीतेतील तत्त्वज्ञान सर्वसामान्यांसाठी देशीय भाषेत आणले. जनसामान्यांच्या शरीर -मनाला आधार दिला.

**'म्हणोनि कुल जाती वर्ण। हे आघवेचि गा अकारण।**
**एथ अर्जुना माझेपण। सार्थक एक।।'**

असे समाजाच्या समरसतेचे स्वप्न बघून ज्ञानदेवांनी मराठी भाषेचे वेगळेपणही जगाच्या प्रत्ययाला आणून दिले. केवळ संस्कृतातच नव्हे, तर देशीय भाषेतही परमार्थाची भाषा बोलली- लिहिली जाऊ शकते, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

**'जैसा वाग्विलास विस्तारू। गीतार्थेसी विश्व भरू ।**
**आनंदाचे आवारू। मांडू जगा।।**
**फिटो विवेकाची वाणी। ही कानामना जिणी।**
**देखो आवाडे ते खाणी। ब्रह्मविद्येची।।'**

अशी त्यांची प्रतिज्ञा होती. याच प्रतिज्ञेला अनुसरून ज्ञानदेवांनंतरच्या सर्व संतांनी व विचारकांनी याच विचारांचा पुनरुच्चार केला. लोकमान्य टिळकांना 'गीतारहस्य' लिहिण्याची प्रेरणा याच विचारातून झाली, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. समाजात निर्माण झालेली विषमता लोकमान्यांनाही नकोशी झालेली होती. सम ाजाच्या योग्य प्रबोधनासाठी त्यांनाही गीतेचाच आधार घ्यावासा वाटला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी समर्थांच्याच विचारांचे अनुसरण केले. ज्यांना ज्यांना म्हणून या हिंदू समाजाचे एकरस रूप अपेक्षित होते, त्यांनी त्यांनी वेळोवेळी संतवचनांचेच अनुसरण केलेले आहे. वारकरी पंथाने संपूर्ण समाजाला एकरस करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी प्रसंगी रक्त, अश्रू आणि घाम गाळला.

आज मात्र आपण या संतांना जातिपातीत विभागून टाकले. हे केवढे वैचारिक दारिद्र्य! प्रा. म. वा. धोंड म्हणतात, 'भागवत धर्माची किंवा वारकरी धर्माच्या विचाराप्रमाणे समाजजीवन हा एक अखंड यज्ञ आहे. या यज्ञाला आवश्यक असणारी सर्व कामे जो चांगल्या प्रकारे आणि निष्काम बुद्धीने करतो, तो या अखंड यज्ञात सहभागी होतो. विठ्ठलभक्ती ही विश्वव्यापी देवाची भक्ती आहे. संतांचा वारकरी संप्रदाय हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. विशेष म्हणजे हा अध्यात्ममार्गी असूनही पूर्णपणे इहवादी आहे.

वारकरी संप्रदायाची सर्वसमावेशकता आणि समर्थांची व्यवहारवादी ऐहिकता ही या सर्व तत्त्वज्ञानाची बैठक आहे.' आपल्या वाट्याला आलेले कर्म परमेश्वरी कार्य म्हणून करावे आणि प्रत्येक प्राणिमात्रावर मायेची पाखर घालावी, हाच संदेश संतांनी दिला. गृहस्थाश्रमात राहूनही भक्तिमार्गाने ईश्वराशी अनुसंधान साधता येते, हे संतांनी सांगितले.

भक्ती म्हणजे ईश्वरविषयक प्रेम. प्रपंचात राहूनही कोणीही ईश्वरविषयक प्रेम जागवू शकतो. संसाराचा सर्वथा त्याग करण्याची आवश्यकता नसल्यामुळे एखाद्या मुमुक्षूचे मनाचे सामर्थ्य कमी पडले तरीही त्याची प्रगती थांबून राहत नाही. ज्ञानाऐवजी भक्तीचा मार्ग यामुळेच सामान्यांना आपलासा वाटला. यातूनच संतांनी धर्म समाजाभिमुख केला. शतकानुशतके बंदिस्त असलेला धर्माचा प्रवाह समाजाच्या सर्व थरांमध्ये पोहोचला, हे संतांनी केलेले प्रबोधन आहे.

**'तया सर्वात्मका ईश्वरा। तोषालागीं अपारा।**
**स्वकर्म कुसुमांची वीरा। अर्पिलीया ।।**
**जे जे भेटे भूत। तया मानिजे भगवंत।**
**हा भक्तियोगु निश्चित। जण माझा।।'**

या आणि अशा अनेक वचनातून आध्यात्मिक तत्त्वज्ञान समाविष्ट झालेले आहे. संत तुकोबारायही हेच सांगतात...

**'दया तिचे नाव। भूतांचे पालन।**
**आणिक निर्दालन। कंटकांचे।।**
**धर्मनीतीचा तो। ऐकूनि व्यवहार।**
**निवडीले सार। असार ते।।**
**पाप त्याचे नाव। न आचरिता नीत।**
**भलतेची उन्मत्त।करती सदा।।**
**तुका म्हणे धर्म। रक्षावयासाठी।**
**देवासही आटी। जन्म घेणे।।'**

मी दुष्टांचे निर्दालन करीन आणि सज्जनांचे रक्षण करीन, असे आश्वासन प्रत्यक्ष भगवंताने गीतेत दिले आहे. त्यासाठी तोही आपली परीक्षा बघत असतो. आपले व्यवहार निरखत असतो.

आपण संतांचे अनुयायी आहोत. आपलीही सामाजिक जबाबदारी असते, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्यासाठी अहंकाराचा पूर्णतः निरास करावा लागतो. संपूर्ण विश्व आत्मरूप आहे याची जाण ठेवावी लागते. संतांची ही वचने माझ्या अल्पबुद्धीनुसार गेले जवळपास वर्षभर मी आपल्यासमोर मांडली. यात माझी भूमिका केवळ 'मी तो हमाल, भारवाही' अशीच आहे. यात जे जे उत्तम असेल ते ते संतांचे आहे आणि जे जे हीण असेल ते माझे आहे. त्यांच्याच चरणी नतमस्तक होऊन आज आपला निरोप घेतो.

**'तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें।**
**करुनि घेयावे हें। विनवितु असें।।'**


---

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# नॉर्मन कझिन्सः मूर्तिमंत सकारात्मकता

नॉर्मन कझिन्स हा एक अमेरिकन पत्रकार, प्राध्यापक आणि जागतिक शांततेचा खंदा पुरस्कर्ता! त्याची कथा मोठी विलक्षण आणि प्रेरणा देणारी आहे. अमेरिकेतून निघणाऱ्या The Sarrvded Review चे ते दीर्घकाळ संपादक होते. त्यांची दोन पुस्तके म्हणजे कोणत्याही कारणाने आयुष्यात निराश झालेल्या माणसाला मार्ग दाखवणारा दीपस्तंभ. The anaromy of Illnerr, Head First The Healing Heart ही त्यांची गाजलेली पुस्तके. या पुस्तकातून त्यांची जीवनगाथा लोकांसमोर आली. नियती एखाद्या माणसाची किती कठोर परीक्षा घेऊ शकते ते नॉर्मन कझिन्स यांच्या आयुष्याकडे



पाहिले म्हणजे लक्षात येते. १९६४ मध्ये त्यांना अँकीलोझिंग स्पॉन्डीलाईटीस हा दुर्मिळ आणि दुर्धर आजार झाला. स्नायू आणि सांध्यांच्या आजाराने या म ाणसाला बिछान्याला जखडून ठेवले. आपल्या कामात नेहमी कार्यरत राहणाऱ्या या उत्साही माणसाला अंथरुणाला खिळून राहावे लागले. डॉक्टरांनी त्यांच्या आजाराचे निदान केले आणि त्यांना सांगितले की, हा अत्यंत दुर्मिळ असा आजार आहे यातून बरे होण्याची शक्यता अत्यंत कमी. पाचशे व्यक्तीतून एखादीच व्यक्ती या आजारातून वाचू शकते. त्याच्या आजाराचे हे निदान करणाऱ्या डॉक्टरांनी त्यांच्या आयुष्यात हा आजार झालेला एकही रुग्ण बरा झालेला पाहिला नव्हता. डॉक्टरांचे आपल्या आजाराविषयीचे हे बोलणे ऐकल्यानंतर एखादी व्यक्ती हादरून गेली असती, निराश झाली असती, खचली असती. अशा व्यक्तीने मग एकतर आता आपले काही खरे नाही म्हणून मृत्यूला तोंड देण्याची तयारी केली असती किंवा आत्महत्येचा मार्ग पत्करला असता. पण नॉर्मन कझिन्स यांची जगण्याची इच्छा दुर्दम्य होती, प्रचंड आशावाद होता,

आजाराला आणि मृत्यूला हरवण्याची ताकद त्यांच्या मानसिकतेत होती. त्यांनी असा विचार केला की ५०० मधील एक व्यक्ती तरी वाचते ना! मग ती व्यक्ती आपणच का असू नये? नॉर्मन यांचे वैद्यकीय ज्ञान तर अफाट होतेच परंतु मानवी मनाचा देखील त्यांचा अभ्यास होता. जेव्हा प्रचंड भीतीची भावना मनात निर्माण होते तेव्हा हृदयाची धडधड वाढते, छातीचे ठोके वाढतात. दुःख आणि शोक या भावनांचे देखील विपरीत परिणामलगेच जाणवतात. या नकारात्मक भावनांचे जर असे परिणाम होत असतील तर आनंद, हर्ष, उल्हास, उत्साह, प्रेम, आशा, विश्वास यासारख्या सकारात्मक भावना आपल्या शरीरावर चांगले परिणामनक्कीच करू शकत असतील. आणि बरे होण्यासाठी याच भावनांचा आश्रय घेण्याचे त्यांनी ठरवले. रुग्णालयाच्या निराशाजनक वातावरणातून बाहेर पडून आपल्या स्वतःची उपचार पद्धती त्यांनी स्वतःच ठरवली. त्यात आशावादी राहणे, दिवसातून दहा मिनिटे तरी खळखळून हसणे आणि व्हिटॅमिन सीचा डोस घेणे या गोष्टींचा प्रयोग त्यांनी सुरू केला. या गोष्टींचे आश्चर्यकारक परिणामत्यांना मिळाले. हास्यामुळे एंडॉर्फिन या सकारात्मक आणि उपयुक्त हार्मोन्स निर्मिती होते. त्यांना असे आढळून आले की, दहा मिनिटांच्या खळखळून हसण्यामुळे आपल्या वेदना कमी होतात आणि शांत झोप लागते. त्यांनी मग काही विनोदी चित्रपटांच्या कॅसेट्स मागवल्या. काही विनोदी पुस्तके मागवली. दुर्दम्य इच्छाशक्ती, सततचे प्रयत्न यामुळे ते चक्क या आजारातून बरे झाले. त्यांच्या या अनुभवातून जन्माला आले ते anaromy of Illnerr हे त्यांचे पुस्तक! आपल्या वेदनांचे रडगाणे न गात बसता या माणसाने त्याचे सुंदर गाणे केले आणि जगाला सकारात्मक राहिल्याने काय होऊ शकते याचा संदेश दिला. या गंभीर आजारातून पूर्णपणे बरे झाल्यानंतर त्यांनी अनेक वर्षे युनिव्हर्सिटी ऑफकॅलिफोर्नियामध्ये मेडिकल ह्युमॅनिटीजचे प्राध्यापक म्हणून काम केले. या माणसाची पुढे नियतीने आणखी परीक्षा घेतली. या गंभीर आजारातून बरे झाल्यानंतर १६ वर्षांनी त्यांना हृदयविकाराचा झटका आला.

डॉक्टरांनी त्यांना अँजिओग्राफी करून बायपास करायला सांगितले. परंतु त्यांनी डॉक्टरांच्या या सल्ल्याकडे दुर्लक्ष करून आपल्या हृदयाची स्वतःच बायपास शोधण्याची क्षमता असते. या गोष्टीवर विश्वास ठेवला. पुन्हा एकदा सकारात्मक जीवनशैली, आहार, व्यायाम या गोष्टींवर भर देऊन हृदय रोगावर मात केली. यावेळी त्यांचे वय ६५ वर्षे होते. यानंतर दहा वर्षे ते सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे त्यांनी आयुष्य व्यतित केले.

३० नोव्हेंबर १९९० रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. आपल्या जीवन जगण्याच्या पद्धतीतून त्यांनी आधुनिक वैद्यक शास्त्राला हा संदेश दिला की, बरे होण्यासाठी फक्त औषधोपचार आणि शस्त्रक्रिया याच गोष्टी पुरेशा नसतात तर मानवी मनाचा सहभाग त्यात अतिशय महत्त्वाचे काम बजावतो. त्यांनी जगाला हा संदेश दिला की, एकदा तुमचे मन दुर्दम्य इच्छाशक्ती आणि आशावादाने भरले की तुमचे शरीर देखील तुमच्या या इच्छाशक्तीला साथ देऊ लागते. कुठल्याही आजाराकडे संकट म्हणून न पाहता एक आव्हान म्हणून त्याचा स्वीकार करा आणि हसतमुखाने त्याला सामोरे जा. आज छोट्या छोट्या गोष्टींनी निराश होणाऱ्या आणि आत्महत्येचा सोपा मार्ग स्वीकारणाऱ्या तरुणांना नॉर्मन कझिन्स यांचे आयुष्य म्हणजे एक मोठा सकारात्मकतेचा संदेश आहे.

---

प्रबंधांची बीजे

श्रीरंग हिर्लेकर

# चॅट जीपीटी - क्षमता आणि मर्यादा




चॅट म्हणजे संवाद आणि जीपीटी म्हणजे जनरेटिव प्रि टेन्ड् ट्रान्सफॉर्मर. याचा मराठी अनुवाद प्रशिक्षित (निर्जीव) यंत्रणेशी संवाद असा होईल. कधी यात्रेत जमिनीवर आसन ठोकून बसलेला एखादा ज्योतिषी दिसतो. त्याच्याजवळील पिंजऱ्यात प्रशिक्षित पोपट किंवा मैना असते. ज्योतिषाला दक्षिणा देऊन आपल्या मनातील प्रश्न विचारला की, ज्योतिषी आणि तो पक्षी एकमेकांच्या कानात कुजबुजतात किंवा पक्षी मालकाच्या जवळील शे-दोनशे कागदी चिठ्ठ्यांमधून एखादी चिठ्ठी काढतो. त्यानुसार मालक लगेच समाधानकारक उत्तरे देतो. पक्ष्याला स्वत:ची अक्कल नसते. मालकाजवळ सर्वसामान्य संसारिक उत्तरांच्या अनेक चिठ्ठ्या असतात. पक्ष्याच्या चिवचिवाटातून किंवा त्याने उचललेल्या कोणत्याही चिठ्ठीतून सोयीस्कर अर्थ काढून बोलणे यात त्या तथाकथित ज्योतिषाचे कौशल्य असते. काहीसा तसाच प्रकार या नवीन तंत्रात आहे.

मुद्दाम भरवलेल्या माहितीच्या प्रचंड संग्रहातून आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या अनेक विषयांच्या ज्ञानसागरातून हवी ती माहिती, गरजेप्रमाणे विविध ९० भाषा आणि काही लिप्यांद्वारे पाहिजे तितक्या शब्दसंख्येत, मागेल त्या आकृतिबंधात, रंगात, आवाजात क्षणात प्रस्तुत केली जाते. तंत्रज्ञानाधारित उपकरणाच्या माध्यमाद्वारे संवाद साधत प्रश्न विचारून, चर्चा करून अधिक माहिती जमा करत, त्यातील विश्वासार्हता तपासत आपल्याला हवे ते साध्य करता येते. 'अज्ञानांधस्य लोकस्य ज्ञानांजन शलाकया:। चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नम:।।' विद्यारण्यात भटकणाऱ्या शिष्याला बोटाला धरून, प्रसंगी कान पकडून, तो कोठे अडखळतो हे ओळखून, योग्य मार्गावर नेण्यासाठी अनुभवी गुरूसारखा मार्गदर्शकच हवा. लखनौच्या बडा ईमामवाड्यातील भुलभुलय्यात तेथील वाट्याड्याविना फिरून बाहेर निघणे जसे अवघड, तसेच येथेही होते. येथे तर गुरुशिष्य या दोनही भूमिका आपल्या आपल्यालाच पार पाडाव्या लागतात. जीपीटी आपल्याशी संवाद करीत माहिती देते, पण त्याला व्यवस्थित बोलते करण्यासाठी आपल्याजवळही कौशल्य असावे लागते. 'सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदन:। पार्थो वत्स: सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतंमहत्।।' प्रश्नकर्ता अर्जुनासारखा सुधीर भोक्ता असेल तरच गीतामृत प्रसवते. 'भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम्।।' याप्रमाणे कृष्णही शिष्याला परमसखा मानून आपले रहस्य सांगतो. मात्र 'धोका क्षेत्राची सीमारेषा' येथेच सुरू होते. कारण जीपीटीला स्वत:ची चेतना, भावना, मानवी संवेदना किंवा अनुभव नसतात. ते प्रश्नांची उत्तरे देणे, अर्थ, व्युत्पत्ती सांगत स्पष्टीकरण करणे, भाष्य करणे, हव्या त्या वृत्तात पद्य रचना करणे हे सर्व करते. मात्र, हे करताना त्याच्याजवळ असतात ते फक्त मानवी भाषेचे गणिती नमुने. म्हणून त्याची उत्तरे विचारप्रवर्तक असली, तरी अंतिम सत्य म्हणून स्वीकारता येत नाहीत. व्याकरण हे भाषा शिकवणारे मूळ कारण नाही तर भाषा वापरताना निर्माण झालेले सहउत्पादन आहे.

प्रत्येक भाषेचे व्याकरण निराळे असते. उदा. मराठीत कर्ता-कर्म-क्रियापद तर इंग्रजीत कर्ता-क्रियापद-कर्म असा क्रम असतो. प्रत्येक भाषेतील शब्दांचा क्रम, लिंग, वचन हे ठरलेले असते. लहान बालक व्याकरण नियम न जाणताही आधी बोलू लागते. जीपीटीलाही व्याकरण शिकवलेले नसते. तरी जवळच्या संग्रहातून असंख्य वाक्यांच्या नमून्यातून ते त्या भाषेच्या पद्धतीनुसार अस्खलीत संवाद करते. उदा. मराठीत 'मी क्रिकेट खेळतो' म्हणेल तर इंग्रजीत क्रियापदाचा क्रम बदलून 'मी खेळतो क्रिकेट' असे म्हणेल. जीपीटीजवळ नियमांची जाण नसून तर संभाव्यतेचे गणित असते. त्याला का असे समजत नाही, पण पूर्वनिरीक्षणामुळे कसे ते आठवते. बाळ आणि जीपीटीत ही समानता आहे. पण बाळाला शरीर आहे, इंद्रिये आहेत, अनुभव आहेत, भूक, वेदना आणि आनंद आहे म्हणून ते जीवनाशी जोडलेले आहे. जीपीटीजवळ यातील काहीच नसल्याने त्याची भाषा ही फक्त अनुभूतिशून्य रचना आहे. येथे असा प्रश्न उत्पन्न होतो की, आतापर्यंत शिकलेल्या सर्व माहितीच्या मंथनातूनच ते जर व्यक्त होते तर त्यात भावना अंकुरतात का? असे होताना मात्र दिसत नाही. मंथन झाले म्हणजे अनुभूती असेलच असे नाही. त्याच्याजवळ भावना नसतात तर विविध भावना व्यक्त करणाऱ्या शब्दांचा कोरडा संग्रह आणि संगती तेवढी असते. भावना उगवण्यासाठी स्वत्वाची जाणीव, हर्ष आणि मर्ष त्यानुसार अभिव्यक्तीसाठी काही विशिष्ट कृती ही सर्व शृंखला आवश्यक असते. जीपीटी मुळातच निर्जीव असल्याने यापैकी कशाची संभावनाच नाही. उदा. आरसा हसू दाखवेल, पण स्वत: हसत नाही. लाखो माणसांच्या भावनांची सरासरी ते व्यक्त करत असते म्हणून ते कधी संवेदनशील वाटतेही. ते चूक मान्य करते, पण त्याचा त्याला खेद वाटत असल्याचे दिसत नाही, ते दिलासा देईल पण त्यात काळजीचा अभाव आणि करुणावाचक शब्दात शुष्कपणा जाणवतो. हॉस्पिटलची सिस्टर आणि सख्खी बहीण यात जो भेद आहे तसेच अंतर मानव आणि जीपीटीत आहे. या सर्वांचे कारण म्हणजे तृष्णा आणि भय या दोन तीरांमधून मानवी षड्विकारांचे जे प्रवाह वाहतात त्यांचा अभाव. तृष्णेच्या काठावरील काम, लोभ आणि मोह आणि भयाच्या तीरावरील मद, मत्सर आणि क्रोध, या सर्वांची जीपीटीला अनुभूतीच नाही.

थोडक्यात म्हणजे जीपीटी ही भाषेची नक्कल आहे, जीवशास्त्रीय गुंतवण नाही. विवेकाचा अभाव : जीपीटीच्या उत्तर देण्याच्या पद्धतीवरून वाटते की, त्याच्याजवळ विवेक आणि स्मृती असावी. पण त्याच्या संग्रहात तयार उत्तरे, वाक्ये किंवा ग्रंथ नसून सांख्यिकी नमुने असतात. प्रश्नानुसार जीपीटी शब्दांचा अर्थ- आकृतिबंध ओळखत त्याला जुळणाऱ्या असंख्य संभाव्यतेतून एक मार्ग निवडते.

प्रत्येक शब्दावर स्वतंत्र विचार करून पुढील शब्द कोणता असण्याची शक्यता जास्त आहे. त्याचे अर्थ, तर्क, संदर्भ यातून एक संगती लावत संतुलित आणि अधिकाधिक संदर्भयुक्त उत्तर प्रस्तुत करते आणि यालाच आपण त्याचा विवेक समजतो. पण मानवाचा विवेक हा चेतनेतून आलेला असतो. त्यात काही मान्यताप्राप्त मूल्ये असतात. अनुभवातून आलेली समज आणि जबाबदारीचे भान असते. तर्क, न्याय, शहाणपण आणि चूक बरोबर याविषयी चिंतन असते. या सर्वांचे सार काढून जीपीटी व्यक्त होते, पण ती त्याची उसनवारी असते. ते सूर्यासारखे स्वयंप्रकाशी नसून चंद्रासारखे परावर्तक असते. '**भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्व संशया:। क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ।।**' मुण्डकोपनिषदातील शिष्य गुरूकडे जिज्ञासेने बघतो, गुरूही केवळ दृष्टिक्षेपाने त्याचे अंतरंग जाणतो. शिष्याची पूर्वतयारी त्याला ठाऊक असते.

'ये हृदयीचे ते हृदयी' उमटते. विचारणाऱ्याचा प्रश्न जितका सुस्पष्ट तेवढेच जीपीटेचे उत्तर मुद्देसूद. जीपीटी मानवी गुरूप्रमाणे प्रश्नातील संदिग्धता लक्षात न घेता तसेच पुढे जाऊन नवीन घोटाळा निर्माण करते. कधी तर जीपीटीला आपण कालिदासाच्या किंवा कोणाच्या एखाद्या श्लोकाचा फक्त पूर्वार्ध ऐकवून उत्तरार्ध सांगा, असे म्हटले तर मूळ रचनाकाराच्या ऐवजी स्वरचित उत्तरार्धही ते सादर करते. थोडक्यात म्हणजे ते योग्य बोलेलही पण ते सत्य असेलच असे नाही. ॲलेक्सा, गुगल आणि जीपीटी '**न प्रश्नमात्रे विलम्बमाचरेतु। न मौनमाश्रित्य गृहं विसृज्यते। गृहस्थधर्मस्य यथार्थसेविका। सखी सचिवाच गृहलक्ष्मिरिव।।**' 'ॲलेक्सा' ही चटपटीत आणि आज्ञाधारक सहायिका आहे. ती उपलब्ध असलेल्या अवाढव्य माहितीतून हवे ते तत्परतेने काढून देते किंवा सांगितलेली सर्व कामेही नीटनेटकी करते.

थोडक्यात ती गृहिणी सचिव: सखी आहे. गुगल आणि तत्सम शोधयंत्रांच्या उपयोगाने आपण त्याला शिकवलेली माहितीतून आपल्याला हवे ते चटकन् शोधू शकतो. जीपीटी प्रश्नांची उत्तरे आणि माहिती देईल, जोडेल आणि नवनिर्मितीही करेल. ते अर्थ, व्युत्पत्ती सांगत स्पष्टीकरण करणे, भाष्य, भाषांतरे करणे, हव्या तितक्या शब्दसंख्येत आणि पाहिजे त्या पद्धतीत गद्यपद्य रचना करणे, एकच गणित किंवा कोणत्याही विषयातील समस्या विविध मार्गांनी कशा सोडवाव्या ते सर्व सोप्या मार्गांनी संवाद करत सांगेल. पण तरीही त्याच्याशी चर्चा करताना कधी माउलींना अपेक्षित- '**अर्थ बोलाची वाट पाहे। तेथ अभिप्रावो अभिप्रायातें विये। भावाचा फुलोरा होत जाये। मतिवरी।।**' असे होत नाही. अभिप्रायातून अभिप्राय उत्पन्न होत नाहीत, बुद्धीवर भावसुमनांचा बहर येत नाही, संवादाचा सुवास दरवळत नाही. हृदयाकाशात सारस्वताचे मेघ दाटून येत नाहीत. हीच त्याची मर्यादा.

# ग्रहसंकेत

## (रविवार, १ मार्च ते शनिवार, ७ मार्च २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार,१ मार्च-** प्रदोष, श्रीदेवी करंजेश्वरी शिमगोत्सवारंभ मोवळकोट ✻ **सोमवार, २ मार्च-** हुताशनी पौर्णिमा सायं. ५.५६ नंतर, श्री दत्त महाराज कवीश्वर पुण्यतिथी पुणे ✻ **मंगळवार, ३ मार्च-** खग्रास चंद्रोदय, (ग्रस्तोदिन), धूलिवंदन, करिदिन, मन्वादि, अन्वाधान, कुलधर्म, चैतन्य जयंती, कृष्णामाई उत्सव महाबळेश्वर, रेणुकाचार्य जयंती, जागतिक वन्यजीव दिन, धुळोबादेव जन्मकाळ धारेवाडी, (चंद्रग्रहण १५: २० ते सायंकाळी १८ ४८ पर्यंत) ✻ **बुधवार, ४ मार्च-** अभ्यंगस्नान, ग्रहण करिदिन, वसंतोत्सवारंभ, आम्रकुसूमप्राशन, राष्ट्रीय सुरक्षा दिन, भांगीरबाबा, मानोबा, बालोबा यात्रा देहरे (ता.जि.नगर), रघुनाथ महाराज उत्सव प्रारंभ धोपेश्वर, सदगुरू स्मरणोत्सव कोरोची, नरवेळ जत्रा गडतरळ ✻ **गुरुवार, ५ मार्च-** श्री संत तुकाराममहाराज बीज देहू, यशवंत महाराज पुण्यतिथी पाडोळकरवाडी (मंगळवेढा), विवेश्वर महाराज छबिना महाड, साटममहाराज पुण्यतिथी दापोली ✻ **शुक्रवार, ६ मार्च-** संकष्ट चतुर्थी,(चंद्रोदय- मंबई-२१: १९, अहिल्यानगर-२१: ११, कलबुर्गी-२१: ००, कोल्हापूर-२१: ११, जालना-२१: ०७, धाराशिव-२१: ०४, नांदेड-२१: ००, पंढरपूर-२१: ०७, परभणी-२१:०३, पुणे-२१: १४, बीड-२१: ०६, लातूर-२१: ०३, विजापूर-२१: ०५, छत्रपती संभाजीनगर-२१: ०९, सातारा-२१: १२, सोलापूर-२१: ०५), कल्पादि ✻ **शनिवार, ६ मार्च-** वेढे महाराज पुण्यतिथी परंडा, दादोजी कोंडदेव पुण्यदिन, देव वायंगणेश्वर उत्सव वायगणी, भक्तराज माऊली पुण्यतिथी पैठण, परमहंस श्री योगानंद पुण्यदिन.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ५, ७ मार्च ✻ **डोहाळ जेवण-** ५ मार्च ✻ **बारसे-** ५ मार्च ✻ **जावळ-** ५ मार्च (८ नंतर) ✻ **गृहप्रवेश-** ५ मार्च

### मेष :- चंद्रग्रहण मिश्र फलदायी

मंगळवारचे चंद्रग्रहण आपल्या राशीत मिश्र फलदायी आहे. सप्ताह अखेरीस लाभात रवि-बुधाची युती होत आहे. त्यामुळे उत्तरार्धात महत्त्वाचे काम यशस्वी होईल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. प्राप्ती विविध मार्गाने होईल. उपजत कलागुणांमध्ये प्रगती होईल. शुभ ता. १, ५

### वृषभः- प्रकृतीची काळजी घ्यावी

चंद्रग्रहण अनिष्ट फलदायी असल्याने प्रकृतीची काळजी घ्यावी. अस्वास्थ संभावते. कर्मस्थानी रवि- बुधाची होणारी युती कार्यक्षेत्रात शुभ फलदायी ठरेल. प्रशासन, वैद्यकीय, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. कलेला चांगल्या संधी लाभतील. लाभ उठवावा. नव्या विचारांना चालना मिळेल. महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. शुभ ता. ५, ७

### मिथुनः- चंद्रग्रहण शुभ फलदायी

मंगळवारचे चंद्रग्रहण आपल्या राशीस शुभ फलदायी आहे. भाग्यात रवि- बुधाची युती होत आहे. भाग्योदयकारक घटना घडतील. सरकारी कामे मनासारखी होतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. सुख स्वास्थ्य वाढविणार्या घटना घडतील. अडचणींची चिंता नको, प्रतिकूलतेतून मार्ग निघत जाईल. वस्त्रप्रवरणे, खाद्यपदार्थ अशा व्यवसायात अनुकूलता वाढेल. धनप्राप्ती होईल. शुभ ता. १, ७

### कर्कः- कलेत प्रगती

चंद्रग्रहण आपल्या राशीत मिश्र फलदायी आहे. अष्टमात अरबी पदाची युती होत आहे पैशाअभावी रंगाळलेली कामे मार्गे लागतील शनिवारी अनोख्या जागेत जाऊ नका बाधा संभवते भाग्यातील शुक्र कलेत प्रगती करणारा आहे परोपकारी घटना घडतील दूरचे प्रवास शक्यतो गरजेच करावेत व्यवहार विचारपूर्वक करावे संततीशी मतभेद टाळावेत. शुभ ता. १, ५

### सिंहः- आत्मविश्वास वाढेल

मंगळवारी होणारे चंद्रग्रहण आपल्या राशीस अनिष्ट फलदायी आहे. ग्रहण पाहू नये, सप्तमात रवि- बुधाची होणारी युती आत्मविश्वास वाढवणारी आहे. कौटुंबिक जीवनात, भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. आर्थिक बाबतीत कसलीही चिंता करू नका. गुरुकृपेने सुस्थिती राहील. नव्या कामात गती मिळेल. महत्त्वाचे निर्णय घ्यावेत. शुभ ता. १, ७

### कन्याः- प्रकृती सांभाळा

चंद्रग्रहण कन्या राशीस अनिष्ट आहे. त्यामुळे प्रकृतीची मुख्यताः काळजी घ्यावी. नव्या योजना शक्यतो लांबणीवर टाकाव्यात. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. सप्तमातील शुक्र ग्रहसौख्य देईल. वित्तीय संस्था, ज्ञानदान अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. दगदग, दूरचे प्रवास नकोत. कार्यक्षेत्रात शुभ घटना घडतील. अपेक्षित कार्यसिद्धीसाठी परिश्रम घ्यावे लागतील. शुभ ता. १

### तुलाः- अपेक्षित कामे होतील

चंद्रग्रहण आपल्या राशीस शुभ फलदायी आहे. पंचमात रवि- बुधाची युती होत आहे. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. पोटाच्या तक्रारींची वेळेस दखल घ्यावी. अपेक्षित कामे मनासारखी होतील. अडचणी कमी होतील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. नव्या विचारांना चालना मिळेल. ऐश आरामाची आवड राहील. संततीकडे अधिक लक्ष द्यावे. शुभ ता. १, ५

### वृश्चिकः- कलेचा गौरव

सुखस्थानी रवि- बुधाची युती होत आहे. चंद्रग्रहणही शुभ फलदायी आहे. त्यामुळे स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील. अडथळ्यांची शर्यत आपण जिंकणार आहात. कलेचा गौरव होईल. कन्या संततीबाबत शुभ प्रगतीच्या घटना घडतील. नवे विचार अमलात आणावेत. नव्या कामाला गती मिळेल. अडचणी कमी होतील. शुभ ता. १, ५, ७

### धनुः- सौख्यदायी घटना

चंद्रग्रहण मिश्र फलदायी आहे. तृतीयात रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. सौख्यदायी घटना घडतील. चतुर्थातील शुक्र उच्च राशीत आहे. वास्तुसौख्य लाभेल. गृह सजावटीकडे अधिक लक्ष द्याल. कौटुंबिक जीवनात आनंदित रहाल. नवे विचार विचारपूर्वक स्वीकारावेत. अडचणी कमी होतील. शुभ ता. १, ५

### मकरः- पिंपळ पूजन करावे

धनस्थानी रवि- बुधाची युती होत आहे. आर्थिक प्रगतीचे मार्ग खुले होतील. चंद्रग्रहण अनिष्ट फलदायी आहे. व्यवहार विचारपूर्वक करावेत. कलागुणांचा विकास होईल. शनिवारी सायंकाळी पिंपळ वृक्ष पूजन करावे. मनावरील दडपण कमी होईल. नव्या संधी लाभणार आहेत. समस्या सुटत जातील. फार दगदग करू नका. त्रास संभवतो. शुभ ता. १, ७

### कुंभः- नव्या संधी लाभतील

राशीतच रवि बुधाची युती होत आहे. अनुकूलता असली तरी घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. चंद्रग्रहण मिश्र फलदायी आहे. विचारपूर्वक वाटचाल केल्यास लाभदायक ठरेल. नव्या संधी लाभतील. यांत्रिक, विधी क्षेत्रात प्रगती साधता येईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात. संततीबाबत शुभ घटना घडतील. शुभ ता. १, ५

### मीनः- कौटुंबिक सौख्य

मंगळवारचे चंद्रग्रहण आपल्या राशीस शुभ फलदायी आहे. व्ययात बुधासोबत पाप ग्रह आहेत. त्यामुळे आर्थिक बाबतीत विचाराने रहावे. डोळ्यांच्या तक्रारींची योग्य दखल घ्यावी. राशीतील शुक्र कौटुंबिक जीवनात सौख्य देईल. अनावश्यक खर्च टाळावा. गुंतवणूक विचाराने करावी. परिश्रमातून प्रगती साधता येईल. चिंता नको. शुभ ता. १, ५

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## एक छोटीशी सुंदर गोष्ट

ज्या त्रासामुळे ते स्वतः अतिशय त्रस्त असतात, ज्यामुळे त्यांची प्रचंड चिडचिड होत असते, ज्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी बदललेल्या असतात, ज्यामुळे त्यांना कायम आजारी असल्यागत वाटत असते, ज्यामुळे त्यांनी आपल्या मुलीच्या आयुष्यालादेखील त्याच बाबीशी जखडून ठेवलेले असते; इतकेच नव्हे, तर ज्यामुळे त्यांनी आपल्या मुलीचाही स्वभाव तिरसट, संशयी बनवून ठेवलेला असतो, त्या त्रासालाच ते काही काळ आपल्या मनातून दूर करतात आणि चमत्कार होतो. त्यांना चक्क कधी नव्हे तो आनंद मिळतो. मला अचानक एक इंग्रजी वाक्य आठवले, खष ्ीं वेप ी ळपव ींहशप ळीं वेशीप ी र्ींशी. एक छोटीशी, परंतु महत्त्वाची गोष्ट करूया - ज्या गोष्टीचा आपल्याला त्रास होतो त्या गोष्टीलाच आपण मनातून काढू शकलो तर! असे केले तर ताण निश्चित कमी होईल आणि ताण नसेल तर एकदाच मिळालेले आयुष्य खूप आनंदात जगता येईल. असा सुंदर विचार घेऊन आपण हा गोडुला चित्रपट पीकू बघून आपल्या मनात येतो. ताणासोबत कुढत कुढत जगायचे की ताणच बाजूला ठेवून मस्त आनंदात जगायचे, चॉईस आपला आहे!

पान २ वरून

## 'लव्ह जिहाद'ला सुरुंग लावणारा...

या असल्या प्रकरणात नेमकी मुलगी गैरमुस्लीम, शिक्षित आणि जिला चांगले भविष्य असू शकते, तीच असते, तर तो पुरुष अल्पशिक्षित, धर्मांध आणि लफंगाच असतो. त्या मुलीला शारीरिक संबंधांचे व्यसन लावणे आणि त्यात तिला पद्धतशीरपणे अडकवणे, हे एकच काम ती व्यक्ती इमानेइतबारे करत असते. त्याला न कसले वर्तमान, ना भविष्य. अशा व्यक्तीबरोबर कोणते आईबाप आपल्या मुलीचा विवाह करतील? पण, मुली पालकांच्या विरोधात का जातात? घाबरून की केवळ वासनेच्या आहारी जाऊन? की, त्यांना असे वाटते की, या पुरुषापेक्षा आपल्याला कुणीही जास्त जीव लावणार नाही म्हणून?खरेतर या तिन्ही घटकांचा संमिश्र परिणाम त्या मुलीच्या मनावर करण्यात आलेला असतो. एक म्हण आहे, 'बैल गेला आणि झोपा केला.' त्यानुसार, या अशा घटनांमध्ये मुलगी-मुलगा स्वतः च्या मर्जीने स्वतःच खड्ड्यात पडत असताना आईबाप रडून त्यांना समजावू शकतात. पण, कायद्याने ते सज्ञान असल्यामुळे ते पाल्यांना थांबवू शकत नाहीत. वेळ निघून गेलेली असते. त्या नराधमाने साम, दाम, दंड, भेद वापरत मुलाला/मुलीला पटवून दिलेले असते की, 'जगातला तुझा एकमेव तारणहार मीच आहे.' मात्र, एकदा का मुलगा/मुलगी त्याच्या पूर्णतः ताब्यात गेली की, त्यांचे परतीचे मार्ग संपलेले असतात. ते स्वतःच त्यांच्या पालकांच्या विरोधात जातात, त्यांच्याकडे पर्यायच नसतो. त्यामुळे पालक कायद्याने आणि सामाजिक रेट्याने त्यांच्यांपासून दूर जातात. अशाप्रकारे आईबाबांच्या संमतीविना मर्जीचे संबंध ठेवणार्यांचे विशेषतः मुलींचे पुढे काय होते, हा एक सर्वेक्षणाचा विषय. आपली ओळख पोलिसांकडे आणि मुलीच्या पालकांकडे आहे, याची जाणीव असल्याने मुलीसोबत कोणतेही गैरकृत्य करण्याला किमान काहीसा आळा बसणार आहे. गुजरातच्या कायद्यातील बदलामुळे 'लव्ह जिहाद'विरोधात एक नवा अध्याय सुरू होणार आहे. महाराष्ट्रातही 'मेरा अब्दुल सब्दुल वैसा नही हैं' म्हणत आईबाबांच्या विरोधात जाऊन पळून जाणार्यांची संख्या कमी नाही. त्यांचे पुढे काय होते, हे वेगळे सांगायला नको. त्यामुळे महाराष्ट्रातही अशाप्रकारे कायदा व्हावा, हीच सकल हिंदूंची इच्छा!

## दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# पर्वत- महिमंडण- चकदेव

सह्याद्रीच्या कुशीतील जावळी-जोर-कांदाटी हा चंद्रराव मोरेंकडे असलेला मुलूख छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळीच्या मोहिमेत स्वराज्यात सामील करून घेतला. चंद्रराव मोरेंनी दुर्गम डोंगरमाथ्यावर सात शिवालये बांधली. या परिसरात सात शिवपुऱ्या म्हणून ही प्रसिद्ध आहेत. पर्वत- महिमंडण-चकदेव या गिर्यारोहण मार्गावर आपले चकदेववरील चौकेश्वर महादेव आणि पर्वत माथ्यावरच्या जोम मल्लिकार्जुनाचे दर्शन होते. महाबळेश्वरच्या दक्षिणेला सातारा-रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमेपाशी कांदाटी नदीचे खोरे आहे. कांदाटी ही कोयनेची उपनदी असून हा परिसर कोयनेच्या जलाशयाने वेढलेला आहे.


सह्याद्री व्याघ्र प्रकल्प म्हणून संरक्षित असलेला हा भाग घनदाट जंगलामुळे दुर्गम आहे. त्यामुळेच येथील डोंगररांगेत वसलेले वनदुर्ग फिरताना परिसराची माहिती असलेल्या अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन अनिवार्य आहे. तीन दिवसीय गिर्यारोहण कार्यक्रम आखला तर चकदेव, पर्वत आणि महिमंडणगड हे तीनही किल्ले एकत्रित करता येतात. पर्वतवर जाण्यासाठी आंबिवली घाटातून आणि रघुवीर घाटातून असे दोन मार्ग प्रचलित आहेत. आंबिवली घाटातून जायचे ठरल्यास पहिला मुक्काम पर्वतवर करून दुसऱ्या दिवशी महिमंडणगड पाहून चकदेवला पोहोचायचे. त्या दिवशी चकदेववर मुक्काम करून तिसऱ्या दिवशी पहाटे सभोवतालचा परिसर पाहून शिडीडाक घाटवाटेने कोकणात उतरायचे. वरील मार्ग कठीण आहे, त्यामुळे ज्यांना दुर्गम वाटांचा मोह आहे, कठीण मार्गाने चढण्याची तयारी आहे त्यांनीच वरील मार्गाने जावे. दुसरा मार्ग रघुवीर घाटातून जातो. या नव्या डांबरी रस्त्याने आपल्याला आरामात गाडीने गडपायथ्याच्या गावापर्यंत पोहोचता येते. रघुवीर घाटाच्या मार्गाने गेलात तर जास्त सोयीचे आहे. पर्वत सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात वाघावळे गावाच्या जवळ असलेल्या पर्वत शिखरावर जागृत मल्लिकार्जुन महादेवाचे मंदिर आहे. गावातून पर्वतच्या दिशेने चढायला सुरुवात केली की, चढाईच्या शेवटच्या टप्यात पोहोचल्यावर आपल्याला शिवमंदिराचा कळस दिसतो. समोर गेल्यावर 'दक्षिणेची काशीस्वयंभू श्री जोम मल्लिकार्जुन देवालय, श्री क्षेत्र पर्वततर्फे वाघावळे' असे लिहिलेल्या, दोन्ही बाजूला स्तंभ असलेल्या प्रवेशद्वारातून आपला गडप्रवेश होतो. इतका कठीण चढ चढून गेल्यावर शरीर थकलेले असते, परंतु शिवालयातील प्रसन्न वातावरणाने थकवा निश्चितच कमी होतो. मंदिराच्या पूर्वाभिमुख प्रवेशद्वारातून आत गेल्यावर दगडी खांब असलेला सभामंडप आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात शिवपिंड, नागप्रतिमा, पाठीमागे मल्लिकार्जुन महादेवाचे पितळी मुखवटे आहे. मंदिराची काळ्या दगडातील जुन्या पद्धतीची बांधणी पाहत निवांत दर्शन घेऊन झाल्यावर पर्वत फिरायला निघायचं. पर्वतची उंची ११३५ मीटर आहे. सह्याद्रीच्या कडेकपारीत वाहणारा भन्नाट वारा अनुभवत शिखरदर्शन झाले की, मंदिराच्या सभामंडपात आराम करता येतो. येथे मुक्काम केला तर दुसऱ्या दिवशीची सोनेरी पहाट अनुभवता येते. गडमाथ्यावरून पाहताना सूर्यप्रकाशात हळूहळू उजळून निघणारा सभोवतालचा प्रदेश मनाला भुरळ घालतो. श्री मल्लिकार्जुन मंदिराविषयी आनंद पाळंदे यांच्या पुस्तकात एक दंतकथा प्रसिद्ध आहे.



अर्जुन वनवासात असताना पर्वत शिखरावर आले. त्यावेळी श्री शंकर पार्वतीने भिल्ल आणि भिल्लिणीचे रूप घेतले होते. त्यावेळी अर्जुनाने बाण मारायचा आणि शिवशंकर ते बाण पार्वतीच्या पायाजवळ पाडायचे, असे बराच वेळ सुरू होते. खूप वेळ झाल्यावर अर्जुनाला कळले की, मल्लिका भिल्लिण म्हणजे प्रत्यक्ष माता पार्वती होय. हे लक्षात आल्यावर त्याने भिल्लिणीच्या पायावर लोटांगण घातले, तेव्हा माता पार्वती मूळ रूपात प्रकटली. या प्रसंगामुळे हे मंदिर मल्लिकार्जुन देवालय म्हणून प्रसिद्ध झाले. पर्वत शिखर पाहून झाले की, सकाळी शिंदी गावात उतरायचे. महिमंडणगड शिंदी गावातून महिमंडणकडे कच्च्या गाडीरस्त्याने जाताना मध्ये वन विभागाची चौकी आहे. गावातून गडमाथा गाठण्यास दीड- दोन तासाची चढण आहे. गडाची उंची ९५३ मीटर आहे. गडावर पाण्याची सोय व्हावी म्हणून कातळात भरपूर टाके खोदलेले आहे. एका खांबटाक्याच्या माथ्यावर शिवपिंड आणि तीन पूजक असे शिल्प कोरलेले आहे.

गडावर भैरवाचे मंदिर आहे, मंदिर सुस्थितीत नाही. मंदिरात काळ्या पाषाणात भैरव आणि भैरवी यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. गडावर आता विशेष काही बांधकाम शिल्लक नाही, काही पुरातन वास्तूंचे फक्त अवशेष उरले आहेत. जावळी स्वराज्यात आल्यानंतर महाराजांनी हे दुर्ग बांधले, रघुवीरघाट आणि आंबिवली घाटाच्या संरक्षणासाठी यांच्या उपयोग झाला. पुढे १८१८ मध्ये किल्ले इंग्रजांच्या ताब्यात गेले, बाकी गडाचा अजून काही विशेष ऐतिहासिक उल्लेख आढळत नाही. गडावरून कोयना अभयारण्य, कोयना जलाशय, पर्वत, चकदेव, सुमार, महिपत, वासोटा, नागेश्वर असा आसपासचा मुलुख छान दिसतो. गड उतरून पुन्हा शिंदी गावात पोहोचावे. तेथून मेट शिंदीतून चकदेवला जाणारा रस्ता आहे. चकदेव शिंदी गावातून चढण्यास सुरुवात केली की आपण एका मोठ्या पठारावर पोहोचतो. तेथून पुढे झाडीतून वर चढणारी वाट पार केली की पुन्हा एक पठार आहे. येथे जंगम लोकांची वस्ती आहे. जंगम लोक शिवभक्त आहेत, गळ्यात शिवप्रतिमा धारण करतात. आपण या भागातील खोपी, शिरगाव, शिंदी आणि उचाट अशा चार गावांचे आराध्य श्री शैल्य चौकेश्वर महादेवाच्या दगडी देवालयात प्रथम दर्शन घ्यावे. मंदिराच्या गाभाऱ्यात शिवपिंड, पिंडीभोवती तांब्याची नागप्रतिमा तसेच शिवाची प्रतिमा आहे. मंदिरात पिंडीच्या पाठीमागे सहा देवतांच्या प्रतिमा आहेत.

स्थानिक लोक वरदायिणी, पार्वती, श्रीराम, लक्ष्मण, भरत, रघुवीर म्हणून या प्रतिमांची पूजा करतात. आनंद पाळंदे यांनी चकदेवचीदेखील दंतकथा त्यांच्या पुस्तकात लिहिली आहे. श्रीराम वनवासात असताना येथे आले. श्री शंकरांनी भिल्लाचे रूप घेऊन त्यांना आव्हान दिले. श्रीरामांनी बाण मारला की, तो शिवशंकरांच्या दिशेने न जाता मंदिराच्या जागेवर पडायचा. येथे महादेवांनी श्रीरामांच्या बाणाला सतत चकवले म्हणून हे ठिकाण चकदेव म्हणून प्रसिद्ध झाले. गिर्यारोहक चकदेववरून शिडीडाक मार्गाने कोकणात उतरतात. आपण आलेल्या शिंदीच्या वाटेने उतरू शकतो. चकदेवच्या शिडीडाक मार्गाने उतरायचे नसेल तरी गडाचे हे टोक नक्की पाहून यावे. येथून दरीत पसरलेला अथांग समुद्र आणि सह्याद्रीच्या डोंगररांगा असे अद्वितीय दृश्य दिसते. शिडीडाक वाटेवरून उतरणे कठीण आहे, गिर्यारोहणाचा अनुभव असल्यास हा मार्ग निवडावा. पूर्वी या मार्गावर लाकडी शिड्या होत्या. १९९० मध्ये येथे तीन लोखंडी शिड्या बसविण्यात आल्या. शिड्या भक्कम असल्या तरी येथे उतरताना झालेली एक चूक महागात पडू शकते. रघुवीर घाटमार्ग झाला तरी शिडीडाक मार्गाचे महत्त्व स्थानिक लोकांसाठी कमी झाले नाही. या वाटेने उतरणे हे ट्रेकर्स मंडळींसाठी आव्हान आहे. त्यामुळे गिर्यारोहक हा मार्ग आयुष्यात एकदातरी पूर्ण करतातच. सावित्री नदीच्या उगमापासून ते तिच्या मुखापर्यंत चंद्रराव मोरे यांनी, माळदेवला श्री माळेश्वर, गाळदेवला श्री गाळेश्वर, धारदेवला श्री धारेश्वर, तळदेवला श्री तळेश्वर, चकदेवला श्री शैल्य चौकेश्वर, पर्वतला श्री मल्लिकार्जुन आणि श्री महाबळेश्वर अशी सात शिवालये बांधली. जावळी परिसरात फिरताना वरील सर्व मंदिरात आपले दर्शन होते. या प्रदेशाला कैलास समजणाऱ्या जंगम लोकांच्या कित्येक पिढ्या येथे आनंदाने नांदतात आहे. इथले भूमिपुत्र निसर्ग, संस्कृती, देवावरील श्रद्धा जिवापाड जपतात. सह्याद्रीच्या कुशीत, दुर्गम दऱ्याखोऱ्यात, संस्कृती जपत व्रतस्थ जीवन जगणाऱ्या या लोकांसमोर आपण नतमस्तक होतो.



पान ३ वरून

## शुद्धीकरणासाठी मूळ समस्येचा वेध गरजेचा

नदीला जिवंत परिसंस्था म्हणून पुनरुज्जीवित करण्याची भाषा सध्या अस्तित्वात असताना अर्थसंकल्पीय रचनेतून खरा भर नदीच्या नैसर्गिक जीवन प्रणाली पुनर्संचयित करण्यावर नाही तर अभियांत्रिकी-आधारित स्वच्छतेवर आहे, असे सूचित होते. केंद्रीय जल ऊर्जा मंत्रालयाने गोमती नदीच्या उगमस्थानावरील संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरणासाठी ५६.८८ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

लखनऊचा अभिमान मानली जाणारी गोमती नदी माधोतांडा येथे उगम पावते. दररोज शेकडो भाविक प्रार्थना करण्यासाठी नदीला भेट देतात. दूरदूरहून पर्यटकदेखील येतात, परंतु गोमती नदीच्या उगमस्थानावरील विकास अपूर्ण राहतो. जल शक्ती मंत्रालयाने स्रोताचे संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास मान्यता दिली आहे. प्रकल्प अहवालाच्या आधारे गोमती स्रोतावर काम केले जाईल. येथे घाट, मार्ग, हिरवीगार जागा आणि पर्यटन सुविधा विकसित केल्या जातील. पूर्ण झाल्यानंतर हा प्रकल्प या प्रदेशाच्या पर्यटन क्षेत्राला चालना देईल. यामुळे स्थानिक रहिवाशांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. केंद्रीय राज्यमंत्री जितीनप्रसाद यांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे केवळ गोमती नदीचे पावित्र्य आणि ऐतिहासिक महत्त्व पुनर्संचयित होणार नाही, तर प्रादेशिक विकास, पर्यटन प्रोत्साहन आणि स्थानिक रोजगाराचे मार्गही खुले होतील.

पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी हे एक मैलाचा दगड ठरेल. (लेखक निसर्ग आणि प्राणिजीवनाचे अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

## कळत नकळत

मी फक्त सेवा करायला आली का, असंच वाटायला लागलं. बाहेर कुठे फिरणं, हॉटेल, सिनेमा, नाटक, शॉपिंग काही काही नाही. प्रेमाचे दोन शब्द तर सोडा; पण आमचं आपसात साधं बोलणंही नाही. त्यात मी कुठे शिक्षणाचा विषय काढणार? '' ''डिसेंबरचा तो दिवस मला चांगला आठवतो. दुपारी जेवण करायला सोनू घरी आले. नेहमी गंभीर असणाऱ्या माझा नवऱ्याच्या चेहऱ्यावर आज आनंदी असल्याचे भाव होते. हिंमत करून म्हणाली, 'आज गरमागरम भाकरी करतेय.

थोडं थांबाल ना, भरीत नि झणझणीत ठेचा तयार आहे.' ह्यांनी हलके हसून माझ्याकडे पाहिलं. लग्नानंतर प्रथमच त्यांनी मला इतकं लक्ष देऊन पाहिलं होतं. मला लाजायला झालं.'' ''गरम भाकरीचा पहिला घास तोंडात टाकताच सोनूने 'वाह! काय मस्त भरीत केलंस सुमे!' असे उद्गार काढले.'' ''मी हैराण. माझ्याशी नीट न बोलणारा सोनू आज तारीफ कशी काय करतोय. पण आतून मी फार सुखावली. सोनू गेल्यावर मी भाकरी-भरीत घेऊन मीनूकडे गेली आणि तिला पण ते खाऊ घातलं. आई-वडिलांच्या निधनानंतर मायेने प्रथमच कुणीतरी तिला भरवलं होतं. तिला फार गहीवरून आलं.'' ''सकाळी मिळालेली तुमच्या शब्दांची ऊर्जा देवा सोनूला, सोनू मला, मी शेजारी काकूंना, मैत्रिणींना आणि मीनूलासुद्धा द्यायची आणि अशा तऱ्हेने सकारात्मकतेचं, आनंदाचं वर्तुळ तयार होत गेले.'' सुमीच्या डोळ्यांत एक वेगळी प्रसन्नता होती. सोनू मध्येच बोलला, ''अगदी बरोबर! माझं सुमीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. देवा, मीनू आणि इतर शेजाऱ्यांशी माझी मैत्री वाढू लागली. घरच्यांशी पण माझे संबंध सुधारले. सुमीनेच मला सुचवलं की चहाबरोबर नाश्ताही ठेवत चला. मग काय, सुमीच्या पायगुणाने, गिऱ्हाईक आणि कमाई दोन्ही वाढत गेली आणि एक जागा भाड्याने घेऊन आम्ही आता नाश्ता पॉईंट सुरू केलं. सुमी लवकरच पुन्हा तिचं शिक्षण सुरू करेल आणि हो, सोबत मी पण...'' सगळे मनापासून हसले. रवीने मीनूकडे पहिलं. आता रवीची संपूर्ण लिंक लागली.

देवा पुन्हा बोलू लागला, ''आठवतं सर, आपण बरेचदा भेटायचो, कधी कधी बोलायचो पण. त्यावरून कळलं की तुम्ही डॉक्टर आहात आणि हे पण समजलं की एकदा मी घर नसताना सुमी मीनूला चेकअपसाठी तुमच्याच कडे घेऊन गेली होती. ती आई-वडील गेल्यामुळे डिप्रेशनमध्ये होती. तुम्ही तिचा पूर्ण इलाज आणि कौन्सिलिंग सेशन्स मोफत करीत होता. फी विचारल्यावर तुम्ही म्हणायचे, तुझ्या भावाला त्याच्या मनासारखी नोकरी लागू दे. मग घेईन ना त्याचा कडून.. सर, त्यामुळे कष्ट करून शिकायचा आणि पुढे जायचा माझा निर्धार वाढत गेला.'' ''मीनूला कॉलेजमध्ये ॲडमिशन आणि सर मला मनासारखी नोकरी मिळाली आहे आणि त्याच्या हा पहिला पगार मी तुम्हाला देतोय, मीनूची फीस म्हणून नाही'' डॉ. रवी हे ऐकून अवाक् झाले. सुमीने आणलेला नाश्ता, गप्पा आणि सेल्फी झाल्यावर सगळे घरी गेले. पहिल्या पगाराचा लिफाफा हातात घेऊन त्या चौघांना त्यातून काय घेऊन द्यायचं, याचा विचार करत डॉ. रवी स्वतःशीच बोलले, 'अनजाने में ही सही, बहुत बढीया काम हो गया रवी भाई!'

# द. गोलार्धात नव्या सूर्योदयाची चाहूल

वेध
संजीव ओक

भारत आणि ब्राझील या दोन देशांकडे आपण अनेकदा भौगोलिक अंतराच्या चष्म्यातून पाहतो. एक आशियात, दुसरा लॅटिन अमेरिकेत; पण जागतिक राजकारणाचा पट पाहिला, तर ही दोन राष्ट्रे एकाच रेषेवर उभी दिसतात. वसाहतवादानंतर उभी राहिलेली राष्ट्र, प्रचंड लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, विषम सामाजिक रचना आणि तरीही, लोकशाही-प्रक्रियेवरचा विश्वास. म्हणूनच, ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्या भारतभेटीकडे केवळ 'प्रोटोकॉल' म्हणून पाहणे चुकीचे ठरेल.



दिल्लीतील औपचारिक स्वागत समारंभ हा बाह्य भाग होता. प्रत्यक्षात या भेटीत दोन गोष्टी स्पष्ट झाल्या. पहिली म्हणजे भारत आणि ब्राझील दोघेही स्वतःला केवळ 'प्रादेशिक शक्ती' म्हणून मर्यादित ठेवू इच्छित नाहीत. दुसरी म्हणजे, 'ग्लोबल साऊथ'चा आवाज आता केवळ घोषणांपुरता न राहता, व्यवहारात उतरू लागला आहे.

भारत आणि ब्राझीलचे संबंध नवे नाहीत. स्वातंत्र्योत्तर काळातच दोन्ही देशांमध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. परंतु, २१व्या शतकात या नात्याला रणनीतिक भागीदारीचा दर्जा मिळाला. 'आयबीएसए' म्हणजे इंडिया, ब्राझील, साऊथ आफ्रिका या त्रिपक्षीय मंचाने दक्षिण-दक्षिण सहकार्याचा आराखडा मांडला. नंतर 'ब्रिक्स' या व्यासपीठाने या सहकार्याला व्यापक परिमाण दिले. आज 'ब्रिक्स' हा फक्त आर्थिक गट राहिलेला नाही, तर तो जागतिक सत्तासमीकरणांना पर्याय सुचवणारा मंच ठरत आहे. लुला आणि मोदी यांच्या भेटीत 'व्यापार' हा केंद्रस्थानी विषय होता. सध्या दोन्ही देशांमधील व्यापार सुमारे १५ अब्ज डॉलर्सच्या आसपास. हे प्रमाण दोन मोठ्या अर्थव्यवस्थांसाठी अपुरे आहे. त्यामुळे पुढील काही वर्षांत २० अब्ज डॉलर्सचा टप्पा गाठण्याचे ध्येय व्यक्त

> ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष नुकतेच भारत दौऱ्यावर आले आणि दिल्लीच्या राजनैतिक पटावर एक शांत; परंतु अर्थपूर्ण घटना घडली. ही फक्त औपचारिक भेट नव्हती, तर दोन मोठ्या लोकशाही, दोन उदयोन्मुख अर्थव्यवस्था आणि 'ग्लोबल साऊथ'चे प्रतिनिधी एकत्र येत, नव्या समीकरणांची ती नांदी ठरली.

झाले. भारत ब्राझीलकडून कच्चे तेल, सोयाबीन, साखर यांसारख्या वस्तू घेतो. ब्राझील भारताकडून औषधे, वाहनांचे सुटे भाग, रसायने, 'आयटी' सेवा घेतो. या पारंपरिक स्वरूपाला बदलून मूल्यवर्धित उत्पादन आणि तंत्रज्ञान सहकार्याकडे वळण्याची गरज दोघांनाही जाणवते.


इथेच महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो.

जागतिक पुरवठा साखळ्या आज अस्थिर आहेत. 'कोविड'नंतर आणि रशिया-युक्रेन संघर्षानंतर जगाला कळले की, काही मोजक्या देशांवर अवलंबून राहणे धोकादायक आहे. चीनवरचे अवलंबित्व कमी करण्याची चळवळ पाश्चात्त्य देशांत सुरू आहे. अशा वेळी भारत आणि ब्राझील दोघेही पर्यायी उत्पादन केंद्र म्हणून पुढे येऊ शकतात. ब्राझीलकडे खनिजसंपत्ती आणि कृषी उत्पादनाची ताकद आहे. भारताकडे उत्पादन-कौशल्य, तंत्रज्ञान आणि मोठी बाजारपेठ आहे. या पूरक क्षमतांचा मेळ घातला, तर दोन्ही देशांना परस्पर लाभ होऊ शकतो. दुर्मीळ खनिजांच्या क्षेत्रांत सहकार्याची चर्चा विशेष उल्लेखनीय आहे. इलेक्ट्रिक वाहनांपासून ते सेमीकंडक्टरपर्यंत अनेक उद्योग या खनिजांवर अवलंबून आहेत.

चीनने या क्षेत्रात वर्चस्व निर्माण केले आहे. भारताला आत्मनिर्भरतेचा मार्ग शोधायचा आहे. ब्राझीलकडे या खनिजांचे साठे आहेत. त्यामुळे या सहकार्याचा अर्थ केवळ द्विपक्षीय करारात मर्यादित राहत नाही, तो जागतिक आर्थिक संतुलनाशी जोडला जातो. कृषी क्षेत्रातही दोन्ही देशांमध्ये परस्पर शिकण्यासारखे बरेच आहे. ब्राझीलने मोठ्या प्रमाणावर आधुनिक शेती, जैवतंत्रज्ञान आणि निर्याताभिमुख उत्पादन विकसित केले. भारताकडे लघू शेतकरी, विविध पिके आणि अन्नसुरक्षेची गरज आहे. जैव-इंधनाच्या क्षेत्रात ब्राझीलचे 'मॉडेल' उल्लेखनीय आहे. उसावर आधारित 'इथेनॉल'निर्मितीत ब्राझील अग्रणी आहे. भारतानेही इथेनॉल मिश्रणाच्या दिशेने पावले टाकली आहेत. या क्षेत्रातील तांत्रिक सहकार्य ऊर्जा-सुरक्षेसाठी उपयुक्त ठरू शकते. 'डिजिटल अर्थव्यवस्था' हा आणखी एक महत्त्वाचा दुवा आहे.

भारताने डिजिटल पेमेंट, आधार, 'यूपीआय' यांसारख्या प्रणालींमुळे मोठा बदल अनुभवला. ब्राझीलमध्येही डिजिटल व्यवहारांची वाढ होत आहे. दोन्ही देशांनी परस्परांच्या अनुभवांचा अभ्यास केल्यास 'ग्लोबल साऊथ'साठी एक पर्यायी 'डिजिटल मॉडेल' उभे राहू शकते. 'ग्लोबल साऊथ' या संकल्पनेला भारताने गेल्या काही वर्षांत नवे परिमाण दिले. 'जी-२०' अध्यक्षपदाच्या काळात विकसनशील देशांचा आवाज पुढे आणण्याचा प्रयत्न झाला. ब्राझीलनेही समान भूमिका घेतली आहे. विकसित देशांनी लादलेल्या नियमांना पर्याय सुचवण्याची गरज आहे. भारत आणि ब्राझील एकत्र आले, तर हा आवाज अधिक ठाम होऊ शकतो.

कोणत्याही एका गटाशी पूर्णतः बांधील न राहता, बहुपक्षीय संबंध ठेवण्याची दोन्ही देशांची भूमिका आहे. ही भूमिका 'ग्लोबल साऊथ'साठी आदर्श ठरू शकते. भारताच्या दृष्टीने लॅटिन अमेरिकेत आपली उपस्थिती वाढवणे आवश्यक आहे. ब्राझीलसारख्या द. अमेरिकेतील मोठ्या अर्थव्यवस्थेशी दृढसंबंध निर्माण केले, तर त्या प्रदेशातील इतर देशांशीही व्यापार आणि गुंतवणूक वाढवता येईल. औषधनिर्मिती, 'आयटी', अवकाश तंत्रज्ञान, संरक्षण उत्पादन या क्षेत्रात भारताकडे क्षमता आहे. ब्राझीलसाठी भारत हा प्रचंड बाजारपेठ आहे. तसेच आशियातील रणनीतिक भागीदारही आहे. चीनसोबत ब्राझील-चे मोठे व्यापारसंबंध आहेत; परंतु एकाच देशावर अवलंबून राहण्याचा धोका त्यांनाही जाणवतो. भारतासोबतचे संबंध संतुलन साधण्यास मदत करू शकतात. सांस्कृतिक पातळीवर दोन्ही देशांमध्ये साम्य आहे. तसेच सांस्कृतिक देवाणघेवाण वाढली, तर लोकांमधील जवळीक राजनैतिक संबंधांना अधिक भक्कम आधार देईल. भारत-ब्राझील संबंधांचा हा टप्पा म्हणूनच महत्त्वाचा आहे. ही भेट एखाद्या तत्कालिक राजकीय कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता, दीर्घकालीन रणनीतिक आराखड्यात रूपांतरित झाली; तर दक्षिण गोलार्धातील समीकरणे बदलू शकतात. दोन मोठ्या लोकशाही राष्ट्रांनी एकमेकांकडे केवळ व्यापार भागीदार म्हणून नव्हे, तर समान प्रवासातील सहप्रवासी म्हणून पाहण्यास सुरुवात केली आहे. विकास, स्वायत्तता आणि जागतिक न्याय्यतेच्या शोधात भारत आणि ब्राझीलची ही सांगड भविष्यातील राजनैतिक समीकरणांना आकार देऊ शकते. दक्षिण गोलार्धात उगवणाऱ्या नव्या सूर्योदयाची ही चाहूल आहे की नाही, हे काळ ठरवेल; पण त्या दिशेने पावले पडू लागली आहेत, हे नक्की!



**राजकारणात सत्तांतर हे केवळ खुर्च्यांचे बदल नसतात; ते विचारधारांचे, धोरणांचे आणि जबाबदाऱ्याचे पुनर्मूल्यांकनही असते. बांगलादेशमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात, 'बीएनपी'चा विजय झाला आणि काळजीवाहू पंतप्रधान मोहम्मद युनूस यांची सत्ता संपुष्टात आली. या सत्तांतराने त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांचे कठोर परीक्षण करण्याची संधी निर्माण केली. यामध्ये बांगलादेशचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी आघाडी उघडली असून, युनूस यांनी घेतलेले अनेक निर्णय, केलेले दौरे हे मला अंधारात ठेवून केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.**

# आता हिशोबाची वेळ...

परराष्ट्रकारण
कौस्तुभ वीरकर

युनूस यांची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थतज्ज्ञ म्हणून चकचकीत असली; तरीही त्यांच्याच सत्ताकाळात बांगलादेशची अर्थव्यवस्था रोडावली, हे निश्चित. धार्मिक अल्पसंख्याकांवरच्या वाढत्या अत्याचारांच्या घटना, सामाजिक ध्रुवीकरणाची तीव्रता आणि प्रशासनाची निष्क्रियता या सर्वांनीच त्यांच्या सरकारच्या हेतूच्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उभे केले. भारताशी असलेले बांगलादेशचे संबंधही त्यांच्याच कार्यकाळात तणावपूर्ण झाले.

भारतासोबतचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक बंध लक्षात घेता, परराष्ट्रनीतीत संतुलन अपेक्षित होते. मतभिन्नता असणे स्वाभाविक असले, तरी जाणीवपूर्वक भारतविरोधी सूर लावणे हा कटाचा भाग असल्याचे आरोपही झाले. भारतद्वेषाची गरळ युनूस यांनी अगदी त्यांच्या समारोपाच्या भाषणातही ओकलीच. याहून चिंताजनक म्हणजे पाकिस्तानकडे झुकणारी त्यांची भूमिका. बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता, युनूस यांची ही दिशा अधिकच विसंगत ठरली. आर्थिक आघाडीवरही स्थिती समाधानकारक राहिली नाही. महागाईचा वाढता ताण, परकीय चलनसाठ्यातील अस्थिरता, गुंतवणुकीतील मंदी आणि बेरोजगारीचे सावट, लयाला चाललेला वस्त्रोद्योग या सर्वांनीच, सर्वसामान्य नागरिकांचे जीवन असह्य केले. या सगळ्याच्या वाटेला वाढती धार्मिक असहिष्णुता होतीच. वास्तविक, अर्थ विषयातील जाणकार म्हणून युनूस यांची निवड झाली असल्याचे म्हटले गेले होते. मात्र, त्यांच्या सत्ताकाळाचे वर्णन करायचे झाल्यास 'कावळ्याच्या हाती दिला कारभार आणि त्याने घाण करून ठेवला दरबार' असेच करता येईल.

या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील सत्तांतरानंतर राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांचे आरोप लक्षवेधी ठरतात. युनूस यांनी घटनात्मक संकेतांकडे दुर्लक्ष करून निर्णय-प्रक्रिया एकहाती केल्याचा आरोप केला. जर हे आरोप सत्य असतील, तर तो संस्थात्मक अपमान आहे. म्हणजे, एका संविधानिक सरकारला संविधानाच्या नावाने हटवू नेमके काय साधले? हाच प्रश्न निर्माण होतो. मुळात युनूस यांच्या सरकारचा पायाच असंविधानिक असल्याने त्यांच्याकडून संविधानाच्या रक्षणाची अपेक्षा करणे चूकच. जे बियाणेच विषारी असते, त्याला गोमटी फळे कशी लागणार? युनूस यांच्या निर्णयांवर टीका करताना एक प्रश्न निर्माण होतो की, राष्ट्रपतींची ही कबुली आताच का? जेव्हा युनूस बदफैली कारभार करत होते, तेव्हाच राष्ट्रपतींनी ठोस पावले का उचलली नाहीत? 'मला अंधारात ठेवले गेले', हे स्पष्टीकरण राष्ट्रपतींच्या जबाबदारीशी सुसंगत वाटत नाही. आज युनूस सत्तेबाहेर आहेत आणि 'बीएनपी'चा विजय झाला आहे. या नव्या राजकीय वास्तवात भूतकाळातील पापांची चर्चा सुलभ झाली आहे; परंतु उशिरा केलेली टीका ही प्रांजळ आत्मपरीक्षण आहे की, संभाव्य चौकशीपासून स्वतःला अलिप्त ठेवण्याची रणनीती, हा संशयही त्याचबरोबर निर्माण झाला आहे. सत्तेच्या शिखरावर असताना मौन बाळगणारे पदाधिकारी सत्तांतरानंतर आक्रमक होतात, तेव्हा त्यांच्याही भूमिकेचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन आवश्यक ठरते. युनूस यांनी घटनात्मक मर्यादा ओलांडल्या असतील, धार्मिक तणाव वाढण्यासाठी खतपाणी घातले असेल, तर त्यांचे अपराध नक्कीच अक्षम्य आहेत. पण, त्याचबरोबर कोणत्याही भीतीपोटी हे सर्व सहन कणारेही तितकेच दोषी मानावे लागतील.

लोकशाहीतील खरी कसोटी केवळ एका नेत्याच्या पराभवाने पूर्ण होत नाही. नव्या सरकारसमोरही तितकीच जबाबदारी आहे. सत्तांतर हा शेवट नसतो; तो प्रारंभ असतो. बांगलादेशसमोरील खरी परीक्षा आता सुरू झाली आहे, हे नक्की.

## रंग-श्रीरंग



श्रीरंग उडवितो रंग, गोपिकासंग ।
श्रीरंग खेळतो रंग, भक्ती गुणरंग ।।१।।
सतरंग उधळितो रंग, खेळे आनंद ।
सूररंग बासुरी दंग, नाद स्वानंद ।।२।।
स्वर्गंग राधिका नंद, नाद-रस-रंग ।
रसरंग मिसळला बुंद, हरी-सतरंग ।।३।।
हा छंद राधेगोविंद, हरी-सत्संग ।
हा नंदलाल आनंद होळीचा रंग ।।४।।
हा रंग तांबडा रक्तवर्ण गुणरंग ।
हा रंग नारंगी गुलाल उधळीत रंग ।।५।।
हा रंग पिवळा पीत-पितांबर रंग ।
हा रंग हरीत रेशमी शेला रंग ।।६।।
हा रंग असमानी हरीरंग श्रीरंग ।
नीलरंग मयुरगुणरंग शांतमनरंग ।।७।।
हा रंग जांभळा सप्तरंग स्वच्छंद ।
आनंद पसरितो धुंद भक्ती सुगंध ।।८।।
हा छंद भक्ती व्यासंग 'मनवा' मनसंग।
सारंग रंगबेरंगी वेणू श्रीरंग ।।९।।

**डॉ. मिलिंद इंदूरकर**





# हे 'शेर' नाही शेळपट!

**दिल्लीतील 'एआय इंडिया इम्पॅक्ट समिट'मध्ये युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अर्धनग्न अवस्थेत आंदोलन केले आणि देशाची अब्रू आंतरराष्ट्रीय पाहुणे, मान्यवरांसह धुळीस मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. परंतु, तेथील सुरक्षारक्षकांसह सुज्ञ भारतीयांनी या युवक काँग्रेस कार्यकर्त्यांना वेळीच पिटाळून लावले. आता पोलिसांनीही या अतिउत्साही कार्यकर्त्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहेच. पण, हे प्रकरण वाटते तितके नक्कीच सरळसाधे नाही. अशा आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताची प्रतिमा मलिन करण्याचेच हे एक नियोजित षड्यंत्र होते. असे म्हणतात की, यामागचे डोके होते, ते वृत्तवाहिन्यांवर काँग्रेसची बाजू मांडण्याच्या नावाखाली कोकलणाऱ्या त्या 'शोर'कर्त्या प्रवक्ता बाईंचेच...**

समाजभान
विजय कुलकर्णी

जागतिक एआय परिषद' हा भारताच्या नव्या युगाचा शंखनाद होता. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने आत्मविश्वासाने उडी घेऊन, जगातील महासत्तांशी खांद्याला खांदा लावून उभा राहिल्याचे चित्र जागाला दिसले. मात्र, असे असताना काँग्रेस युवांच्या अर्धनग्न आंदोलनाने अपशकून केलाच. यावर टीका कराताना देशाचे पंतप्रधान यांनी तुमचा नग्नपणा देशाला ज्ञात असताना, आणखी शर्ट उतरवण्याची गरज का पडली? अशी टीकाही केली. देश सन्मानाचा क्षण साजरा करत असताना काँग्रेसने राजकारणासाठी अंगप्रदर्शनाचा मार्ग स्वीकारून, स्वतःच्या नग्न वास्तवाचेच प्रदर्शन मांडले. लोकशाहीमध्ये प्रत्येकालाच आंदोलनाचा अधिकार आहे; पण ते कुठे करावे, यासाठीही विवेक असावा लागतो. त्याचीच काँग्रेसकडे वानवा आहे. जागतिक व्यासपीठावर भारताची प्रतिष्ठा वाढत असताना देशांतर्गत राजकारणाची चिखलफेक जगाला दाखवणे, हे कसे न्याय ठरेल? भारत-अमेरिका सहकार्यावर मतभेद असतील, तर ते मांडण्यासाठी संसद आहे, पत्रकार परिषद आहे. पण अंगावरचे वस्त्र उतरवून संताप व्यक्त करणे, ही राजकीय संस्कृती नव्हे, तर राजकीय अधःपतनाची साक्ष ठरते.

संकल्पना कुणाची का असोत, काँग्रेसचे युवराज राहुल गांधींच्या परवानगीशिवाय तर असे पाऊल उचलले गेले नसेलच. त्यामुळे प्रत्यक्षात 'भारत मंडपम'मध्ये राडा करणारे काँग्रेस कार्यकर्ते जितके दोषी, त्याहूनही अधिक दोषी या कार्यकर्त्यांना फितवणारे. पण, याची काँग्रेस पक्षाला, राहुल गांधींना ना खंत ना खेद. उलट, शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे, हा आमचा ऐतिहासिक वारसा आहे. हे आमच्या रक्तातच असून, तो प्रत्येक भारतीयाचा लोकशाहीतील अधिकार आहे, अशी दर्पोक्ती राहुल गांधींनी केली. एवढेच नाही, तर काँग्रेसच्या युवा कार्यकर्त्यांना आपल्या 'ट्विट'मध्ये त्यांनी चक्क 'बब्बर शेर' असेही संबोधले. आता अशा शेळपटांनाच 'शेर' मानणारा त्यांचा शेखचिल्ली नेता असेल, तर संघटनेच्या अवस्थेची कीव करावी तितकी कमीच. पण, तरीही सत्तेला सत्याचा आरसा दाखवणे ही देशभक्ती आहे, अशी वल्गना करीत राहुल गांधींनी अपेक्षितपणे आपल्या या निर्बुद्ध कार्यकर्त्यांवर स्तुतिसुमनेच उधळली. यावरून राहुल गांधींची कोती मानसिकता आणि देशविघातक वृत्ती पुन्हा एकदा देशासमोर आली. विरोधी पक्षनेते असूनही राहुल गांधींना याचेही भान राहिले नाही की, 'एआय परिषद' हा कोणताही राजकीय पक्षाचा कार्यक्रम नव्हता, तर तो बदलत्या भारताचे दर्शन घडविणारा सोहळा होता. पण, मुळातच ज्यांना देशाबद्दल काडीचीही आस्था नाही, देशाच्या प्रगतीचे कौतुक नाही, अशांकडून फार अपेक्षा बाळगणेच चुकीचे. राहुल गांधींनी केलेल्या अशा अपेक्षाभंगांमुळेच काँग्रेसवर आज अशी नामुष्कीजनक परिस्थिती ओढवली आहे, हेच खरे!

### बुद्धिवंतांकडून समाचार!

राहुल गांधी आणि त्यांच्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी 'एआय समिट'मध्ये जो काही धुमाकूळ घालण्याचा प्रयत्न केला, तो सर्वसामान्य भारतीयांची मानही शरमेने खाली घालणारा होता. समाजमाध्यमांपासून ते मुख्य प्रवाहातील माध्यमांपर्यंत काँग्रेसवर या प्रकरणावरुन टीकेची झोडही उठली. अशा वेळी समाजातील सज्जनशक्ती, बुद्धिवंतांनीही काँग्रेसच्या या कृत्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. २७० निवृत्त न्यायाधीश, अधिकारी आणि पोलिसांनी एकत्रितपणे काँग्रेसच्या या कृत्याला 'भारत मंडपममध्ये राष्ट्रीय लाज आणणारा प्रसंग' असे संबोधत, काँग्रेसच्या अरेरावी वृत्तीचा खरपूस शब्दांत समाचार घेतला. अशा या २७० माजी सरकारी अधिकाऱ्यांनी काढलेल्या संयुक्त निवेदनात म्हटले आहे की, लोकशाहीत आंदोलन करणे हे मान्य आहे. परंतु, असा निषेध अराजकता किंवा राष्ट्राचा सार्वजनिक अपमान करण्याचा परवाना देत नाही.

२०१४ नंतर सत्तेपासून दूर गेलेली काँग्रेस, आक्रमक नकारात्मकतेच्या मार्गावरच अग्रेसर आहे. 'राफेल' करारातील संशय, सैन्याच्या कारवायांवर प्रश्नचिन्ह, शेतकरी धोरणांवर भीतीचे सावट अशा देशहिताच्या प्रत्येक निर्णयावर अविश्वास पेरण्याचीच भूमिका काँग्रेसने घेतली. जनतेचा कौल नाकारून जनतेच्या निर्णयालाच संशयाच्या भोवऱ्यात ओढण्याची काँग्रेसची प्रवृत्ती, लोकशाहीसाठी धोकादायकच. संसदेतील अधिवेशने जनतेच्या प्रश्नांची उकल करण्यासाठी असतात; पण विरोधाच्या नावाखाली काँग्रेसने त्यांचे आखाडे केले. त्यात सध्याच्या काँग्रेसच्या नेतृत्वामुळे काँग्रेसची अवस्था 'आधीच मर्कट त्यात मद्य प्याला' अशीच झाली आहे! देशहितासाठीचा अर्घ्य सरकार सोडत असताना, काँग्रेस मात्र झारीतील शुक्राचार्य होण्याची भूमिका कमालीच्या प्रामाणिकपणाने निभावताना दिसते. एवढा प्रामाणिकपणा जनतेने संपुआकाळात दिलेली जबाबदारी निभावताना दाखवला असता, तर कदाचित देशाचे काही अंशी भले तरी झाले असते.

बौद्धिक कठोरता आणि संसदीय चर्चेद्वारे खरा विरोध व्यक्त केला पाहिजे होता. तसेच अशाप्रकारचे विरोधप्रदर्शन गुंतवणूकदारांचा विश्वास आणि परराष्ट्र संबंधांनाही ठेस पोहोचविणारे ठरू शकते, असेही संयुक्त निवेदनात माजी अधिकार्यांनी प्रामुख्याने नमूद केले आहे. एकूणच, आपल्या अशा निंदनीय कृत्यामुळे आपण केवळ सत्ताधार्यांनाच नाही, तर संपूर्ण देशाला, 'एआय' क्षेत्रात मेहनत घेणार्या वैज्ञानिकांचाही अपमान करतोय, याचेही साधे भान काँग्रेसला राहिलेले दिसत नाही. कारण ते तसे असते, तर अशाप्रकारे जागतिक परिषदेला गालबोट लागेल, असे कोणतेही कृत्य करण्यासाठी यांचे 'हात' शिवशिवले नसते. एकूणच काय; तर देश, सरकार, राजकारण यातील पुसट रेषा आणि त्यातील अंतर विरोधी पक्षनेते असूनही राहुल गांधींना उमजलेले नाही. दुसरीकडे विविध देशांशी भारताचे सांस्कृतिक, आर्थिक, राजनैतिक संबंध दृढ करण्यासाठी मोदी सरकारने मित्रपक्षांसह अन्य पक्षांतील खासदारांचे २३ संसदीय मैत्री-गट स्थापन केले असून, त्यात राजकीय विरोधक असलेल्या सुप्रिया सुळे, असदुद्दीन ओवेसी, कनिमोळी, चिदंबरम, संजय राऊत यांनाही स्थान दिले आहे. यावरून मोदी सरकार आणि राहुल गांधी यांच्या विचारांतील, कार्यशैलीतील जमीन-आसमानाचा फरक स्पष्टपणे अधोरेखित व्हावा. मोदी सरकारसाठी 'राष्ट्र प्रथम', तर राहुल गांधींसाठी 'मीच प्रथम' हीच नीती!

३ मार्च
विश्व वन्यजीव दिवस विशेष

**वन्यजीवांच्या संवर्धनासाठी साजरे होणारे विविध सप्ताह, दिवस त्यांच्यावरील प्रे ापोटी करण्याची बाब समजू शकते. पण मुळात आता आपण आपल्या अस्तित्व रक्षणासाठी हे दिवस साजरे करण्याची वेळ आली आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे. त्यांचे रक्षण केले नाही तर नजीकच्या भविष्यकाळात निसर्गसाखळीत मोठ्या प्रमाणात व्यत्यय येऊन समस्त मानवजातीला त्याचे भीषण परिणाम भोगावे लागतील, यात शंका नाही.**



# वन्यजीवांचे रक्षण काय साधते?

प्रासंगिक
प्रमोद माळी
प्रसिद्ध वनजीव अभ्यासक

दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या विश्व वन्यजीव दिनानिमित्त अनेक विषय चर्चेत येतात आणि तो दिवस वा ते साजरीकरण पार पडले की हवेत हलकेच विरूनही जातात. त्यामुळे आवश्यक वा कालसुसंगत ठरतील असे अपेक्षित बदल होताना दिसतच नाही. खरे पाहता बदलत्या काळातील प्रत्येक आव्हान वेगळे असते आणि त्यामध्ये म ाणसाबरोबरच निसर्ग आणि निसर्गातील सर्व घटक भरडले जात असतात. असे असताना वन्य जीव अपवाद कसे असतील? मात्र तरीही हव्या त्या गांभीर्याने त्याकडे पाहण्याची वृत्ती नसणे वा इतर प्रलोभनांुळे साफ दुर्लक्ष करणे यासारख्या कुप्रवृत्ती वन्यजीवांचे अस्तित्व अधिकाधिक धोक्यात आणत आहेत हे समजून घ्यायला हवे आणि या प्रश्नाची उकल शोधण्यासाठी काही बाबींचा विचार करायला हवा.

लोकवस्तीत वन्य जीवांचा वाढता वावर ही यासंदर्भातील अलिकडची चिंतेची आणि चर्चेतील पहिली बाब म्हणता येईल. याचे कारण बघायचे तर आता लोक मोठ्या प्रमाणात वन्य जीवांच्या अधिवासात येऊ लागले आहेत. म्हणजेच खरे पाहता प्राणी मनुष्य वस्तीत येऊ लागले नसून मनुष्य त्यांच्या वस्तीत जाऊ लागला आहे, असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. त्यामुळे या दिनानिमित्ताने सर्वप्रथम यावर नियंत्रण आणण्याचा विचार आणि त्यास समर्पक ठरणारी कृती होणे आवश्यक आहे. वन्य क्षेत्रात माणसाचा वावर संपवणे अशक्य असले, तरी तो नियंत्रित करण्याचे प्रयत्न नक्कीच करता येतील. वन्यजीवांशी संबंधित वा वनक्षेत्राशी संबंधित प्रश्नांची गुंतागुंत समजून घेतली तर उकल करणे सोपे जाईल असे वाटते. त्या अर्थाने बघायचे तर जंगल भागात वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या लोकांचा चरितार्थ पर्यटनावर चालतो. अर्थातच येथे येणारे शहरी पर्यटक त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतात. वन्यजीव दर्शनाच्या उद्देशाने ते त्या त्या भागात येतात. मात्र, तेथे प्राणी दिसले नाहीत तर त्यांची जंगलाकडे बघण्याची दृष्टी बदलते. साहजिकच पर्यटनाच्या व्याख्यादेखील बदलतात. यातूनच पुढे जंगलात जाऊन पार्ट्या करणे, गोंगाट करून वन्यजीवांना प्रतिकूल स्थिती निर्माण करण्याचे उद्योग सुरू होतात. हा अधिवास सोडण्याच्या प्रयत्नात वन्यजीव भटकतात आणि मनुष्यवस्तीत शिरतात. त्यामुळेच आधी हा घोळ वा हे दुष्टचक्र समजून ते संपवण्यासाठी प्रयत्न केले तर परिस्थिती सुधारू शकेल. शहरातून येणारे काही जाणकार, पर्यावरणाची ओढ लागण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यातील काही लोक जंगल बघायला प्रारंभ करतात, जंगलाकडे आकर्षित होतात आणि इथे येतात तेव्हा स्थानिक लोकांच्या काही व्यवहारांवर ते टीकाटिप्पणी करताना दिसतात. उदाहरणार्थ, जंगलाजवळचे रहिवासी इंधन म्हणून येथील जळाऊ लाकूड काढतात आणि डोक्यावर मोळ्या नेऊन घरात त्याचा दैनंदिन वापर करतात.

शासन नियमाप्रमाणे स्थानिकांनी जंगलातील जळाऊ लाकूड काढण्यास कोणतीही बंदी नाही. अर्थातच ते याची वाहनातून वाहतूक करू शकत नाहीत. मात्र, हा नियम ठाऊक नसल्यामुळे नवखे निसर्गमित्र मोळ्या नेताना पाहतात तेव्हा त्याचे फोटो काढून वन विभागाकडे पाठवतात. त्यावरून वन विभागातील लोक येतात आणि स्थानिकांवर कारवाई करतात. कारण तिथे बसणाऱ्या अधिकाऱ्याला मी काहीतरी केले आहे, हे दाखवून पदोन्नती मिळवायची असते. मात्र, या सगळ्यातून फार मोठी तेढ निर्माण होते; जी अखेरीस वन्यजीवांच्या अस्तित्वालाच नख लावणारी ठरते. जसे की, वन विभागाच्या कारवाईनंतर स्थानिकांना निसर्गमित्रांुळे आपल्यावर संकट आल्याचे समजते आणि ते या लोकांना अजिबात जवळ करत नाहीत. दुसरीकडे वन विभागाच्या विरोधात काही करता येत नसल्यामुळे ते मनातला राग वन्यजीवांवर काढतात. कारण आमच्या शेतात येणारे आणि नुकसान करून जाणारे प्राणी डिपार्टेंटचे... अशी सरधोपट मांडणी करतात. त्यामुळेच बरेचदा स्थानिकांकडून वन्यजीवांना धोका पोहोचवला जातो. हे दृश्य बदलायचे असेल तर आधी वनविभागात काम करणाऱ्या लोकांना नियमांची नीट माहिती देणे गरजेचे आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे यातील ८० टक्के कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना शेड्युल ए-१, ए, बी, सी यातील काहीही माहिती दिसत नाही. कुठला प्राणी कुठल्या कक्षेत येतो हे ते जाणत नाहीत. आज एखाद्या वन अधिकाऱ्याला वनांचे किती प्रकार आहेत वा तुम्ही काम करता ते वन कोणत्या प्रकारचे आहे, असे प्रश्न केले तर अचूक उत्तरे मिळतील, याची खात्री देता येत नाही. म्हणजेच इतके अज्ञान असल्यामुळे मूळ प्रश्न मागे राहतात आणि वन्यजीव, वन अधिकारी, निसर्गसेवक आणि स्थानिक यांच्यातील तिढाच परिस्थिती आणखी बिकट करत राहतो. आज हा तिढा सोडविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. जंगलात वणवे लागण्याच्या आणि आगीत वन्यजीव होरपळल्याच्या, त्यांचे अधिवास नष्ट झाल्याच्या बातम्या आपण ऐकतो. विशेषत: उन्हाच्या झळा वाढू लागल्या की या प्रकरणांची संख्याही वाढते. वणवा लागतो की लावला जातो याविषयीदेखील प्रचंड चर्चा होते. मुळात वणवा लागणे ही अत्यंत योगायोगाची घटना आहे. झाडांच्या वाळलेल्या फांद्या एकमेकांवर घासून ठिणगी पडणे आणि ती पडून खालच्या गवताने पेट घेणे हा एवढा मोठा योगायोग आहे की जवळपास ५० वर्षांतून एकदाच होत असेल.

प्रत्यक्षात दरवर्षी शेकडो ठिकाणी वणवे लागतात. त्यातील ९९.९९ टक्के वणवे लावले जातात आणि ०.१ टक्का वणवे नैसर्गिक असतात. पण पाठ्यपुस्तकांध्ये हा ०.१ चा भागच शिकवला जातो. अन्य भागावर साधी चर्चाही होत नाही. त्यामुळे वणव्यांुळे होणारे वन्यजीवांचे नुकसान टाळण्यासाठी आधी अगदी पाठ्यपुस्तकां धील धड्यांच्या माध्यमापासून याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. यामुळेदेखील वन्यजीवांना अभय मिळणे शक्य होईल. वन विभागावरील राग काढण्यासाठी, आपल्या शेतमालाचे नुकसान करणाऱ्या वन्यजीवांना संपवण्यासाठी स्थानिकांकडून टाकली जाणारी एक काडीही विझवता आली तर मनातले अनेक वणवे लागण्याआधीच विझू शकतील. कारण तेढ कोणामध्येही आणि कोणत्याही कारणांुळे वाढली तरी शेवटी त्यात बळी वन्यजीवांचा जाणार, हे अंतिम सत्य आहे. वनखात्याकडे पैशाची कमतरता नाही. त्यांना भरपूर निधी येतो. एक उदाहरण सांगतो. काही वेळा जंगलात झोपड्या उभ्या करण्याचे आदेश दिले जातात. पर्यटकांची, वननिरीक्षकांची, कर्मचाऱ्यांची निवाऱ्याची वा सावलीची सोय म्हणून अशा झोपड्या उभ्या केल्या जातात. पण सह्याद्रीच्या संपूर्ण पट्ट्यात मुळातच सदाहरित जंगल असून या '१० टक्के जंगला'मध्ये खरोखरच वर्षाच्या बाराही महिन्यांध्ये केवळ १० टक्केच सूर्यप्रकाश खाली येतो, ही बाब कोणीही लक्षात घेत नाही. म्हणजेच नैसर्गिक सावली असतानाही वरून आदेश आला की, अंलबजावणी करण्यासाठी आणि त्यातून मिळणारा मेवा घेण्यासाठी एखादी जागा हेरली जाते आणि तिथली झाडे तोडून झोपडी बांधली जाते. बरे, अशा प्रकारे निर्माण केलेल्या कृत्रिम सावलीमध्ये बसणाऱ्यांची संख्या ती किती असणार! मग असा आडोसा दारूड्यांना, गैरप्रकार करणाऱ्या आसरा देतो. तिथे बसून हे लोक दारू पितात, तिथेच चुली मांडून मांस शिजवतात आणि वनभोजनाचा आनंद लुटतात. आता दारूच्या फोडून टाकलेल्या बाटल्या, उरलेले अन्न आणि ते शिज-वताना केलेली घाण कोणत्या वन्यजीवाचा अधिवास सुरक्षित ठेवू शकेल? त्यामुळे अशा कामांधून वन अधिकाऱ्यांना आणि ठेकेदाराला आपापला हिस्सा मिळतो, उपद्रवी माणसांना मौजम जेच्या दोन घटका मिळतात; पण वन्यजीवांना मात्र नाहक शिक्षा मिळते. बरेचदा स्थानिक लोकच तिथे दारू प्यायला जातात, अशी राळ उठवली जाते; पर्यायाने तेढ वाढतच जाते. स्थानिकांना दाबून ठेवण्यामागे बरेच अधिकारी स्मगलिंगमध्ये सहभागी असणे हेदेखील एक कारण आहे. गैरप्रकार स्थानिकांच्या निदर्शनाला येऊन त्यांनी अटकाव करू नये, या हेतूने त्यांना जास्तीत जास्त लांब ठेवायचादेखील काहींचा हेतू असतो. त्यामुळेच आधी माणसा-माणसातील तेढ कमी व्हायला हवी. ती कमी झाली तरच ते एकत्र येऊन वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन करू शकतील. अन्यथा, दोघांच्या भांडणात या मुक्या प्राण्यांचाच जीव जात राहणार, हे त्रिवार सत्य आहे. त्यासाठी सगळ्या मनुष्यप्राण्यांनी आम्ही निसर्गमित्र, आम्ही वन्यजीवप्रेमी अशा वल्गना करत असे दिवस वा सप्ताह साजरे करणे बंद करावे. खरे सांगायचे, तर आपण आता स्वार्थासाठी त्यांना जगवू लागलो आहोत. त्याखेरीज आता काहीही तरुणोपाय नाही हे समजून घ्यायला हवे; कारण वन्यजीव जगले नाहीत तर निसर्गसाखळी पुढे इतकी विस्कळीत होईल की एकही मनुष्यप्राणी जगू शकणार नाही. म्हणूनच भविष्यातील आपला विनाश टाळण्यासाठी प्रयत्न करणे सुरू ठेवण्याचा कार्यक्रम हाती घेतला आणि तो प्रामाणिकपणे राबवला तरी खूप काही साध्य होईल.




# 'एआय'चे भवितव्य जोखणारी परिषद

**नवी दिल्लीमध्ये नुकतेच 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या जागतिक स्तरावरील एका मोठ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत एआयचे उपयोग, गैरवापर आणि नियमन यावर व्यापक चर्चा करण्यात आली. एआय तज्ज्ञ, विविध राष्ट्रांमधील उद्योजक, तज्ज्ञ तसेच गूगल, ओपन एआयसारख्या कंपन्यांच्या सीईओंनी हजेरी लावलेल्या या परिषदेला उपस्थित राहून घेतलेला आढावा.**

विशेष
कस्तुरी पाठक

काही वर्षांपूर्वी केवळ ठरावीक क्षेत्रांपुरते मर्यादित असलेले एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान सर्वसाम ान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. अगदी चार ओळींचा मेसेज किंवा फॉर्मल ई-मेल लिहायचा असला, तरी सहज चॅट-जीपीटी किंवा 'जेमिनी'ची मदत घेतली जाते. अनेक कंपन्या विशेषत: स्टार्टअप्स, जाहिरातींचे स्क्रिप्ट लिहिण्यापासून व्हिडीओ तयार करण्यापर्यंत सर्व कामे एआयच्या मदतीने करतात.

थोडक्यात, आता आपण एआयला सरावलो आहोत. अशा वेळी एआयचे फायदे, उपयोग, संभाव्य धोके, नियमन आदी विषयांवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारमंथन होणे गरजेचे होते. नेमका हाच धागा पकडून भारताने नवी दिल्लीमध्ये 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या जागतिक स्तरावरील एका मोठ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदेचे आयोजन केले. हा जगातील सर्वात मोठ्या एआय इव्हेंट्सपैकी एक मानला जात आहे. या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यासाठी जगभरातून तज्ज्ञ, स्टार्टअप्स, विद्यार्थी अशा अनेकांनी हजेरी लावली. त्यात 'ओपन एआय'चे प्रमुख सॅम ऑल्टमन, गूगल/अल्फाबेटचे सीईओ सुंदर पिचाई, अँथ्रोपिकचे सीईओ डॅरिओ अमोडी यांच्याबरोबरच हजारो स्टार्टअप्स आणि एआय प्रोडक्ट डेव्हलपर्स यांचा समावेश होता. त्याचबरोबर विविध टेक आणि मशीन लर्निंग कंपन्या, २० हून अधिक देशांचे देशांचे राष्ट्राध्यक्ष, ६० हून अधिक मंत्र्यांचे प्रतिनिधी, आणि ५०० हून अधिक जागतिक एआय तज्ज्ञांनीही या परिषदेला हजेरी लावली. शिवाय येथे ३०० हून अधिक कंपन्या आणि स्टार्टअप्सनी त्यांचे तंत्रज्ञान आणि एआय आधारित उत्पादनांचे प्रदर्शन केले. या परिषदेला 'जी २०' परिषदेचा दर्जा देण्यात आला होता. परिषदेचे मुख्य उद्दिष्ट्य म्हणजे एआय क्षेत्रात ग्लोबल साऊथचा आवाज आणि प्रभाव वाढविणे. हे क्षेत्र केवळ अमेरिका किंवा युरोपियन युनियनपुरते मर्यादित राहू न देता विकसनशील देशांनाही एआय नियमन आणि उपयोगात भाग घेता यावा, वैश्विक नियम, नैतिकता, जबाबदार एआय, रोजगार आणि सामाजिक परिवर्तनाचा व्यापक विचार केला जावा, ही होती. एआय तंत्रज्ञान मानवासाठी उपयुक्त असले, तरी त्याचे अनेक गंभीर धोकेही आहेत. एआयचे समर्थन करणाऱ्या तज्ज्ञांच्या मते हे तंत्रज्ञान मानवसेवेच्या क्षेत्रात सुधारणा करेल. यामुळे नियमित, खोट्या किंवा त्रुटीपूर्ण कामांपासून मुक्त होण्यास मदत होईल, एआयमुळे अनेक रोजगार जातील अशी भीती वाटत असली, तरी एआयमुळे रोजगाराचे प्रकार बदलतील आणि अनेक नवे रोजगार अस्तित्वात येतील. एआय विरोधकांच्या मते एआयमुळे काही उद्योग आणि पारंपरिक कामे कमी होऊ शकतात, डेटा सुरक्षितता आणि गोपनीयतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अर्थात अद्याप तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर यासंदर्भात ठोस नियमन नसल्याने एआयच्या दुरुपयोगाची मोठी भीती आहे. त्यासाठी भारताने पुढाकार घेतला आणि 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६'च्या व्यासपीठावर सर्वंकष चर्चा घडवून आणली. यातून नक्कीच काही तरी चांगले घडेल याची खात्री वाटते. हे आयोजन केवळ भारतातल्या संस्था किंवा उद्योजकांसाठी नव्हे, तर 'ग्लोबल साऊथ' म्हणजे दक्षिण गोलार्धात असलेले विकसनशील देश आणि जागतिक समुदायासाठी महत्त्वपूर्ण एआय संवादाचे एक केंद्र ठरले. भारत मंडपममध्ये एकीकडे विविध कंपन्यांच्या एआय सेवा आणि उत्पादनांचे प्रदर्शन सुरू होते तर दुसरीकडे एकाच वेळी विविध दालनांम ध्ये एआयशी संबंधित विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. सुमारे दीड तासाच्या चर्चासत्रांमध्ये जगातील विविध देशांमधून आलेल्या या क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश होता. या चर्चासत्रांमध्ये उपस्थितांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरेही दिली जात होती. अशी चर्चासत्रे रोज दिवसभर सुरू होती. त्यामुळे या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आणि रुची असणाऱ्या मंडळींसाठी ही एक मोठी पर्वणी होती. या चर्चासत्रांमध्ये एआय आणि रोजगार, संधी आणि धोके, सुरक्षित आणि जबाबदार एआय, एआय आणि सर्वसमावेशक विकास, सुरक्षा आणि संरक्षणात एआय असे अनेक विषय चर्चिले गेले. काही तज्ज्ञांच्या मते एआयमुळे पारंपरिक नोकऱ्यांमध्ये बदल दिसून येईल आणि या बदलाशी जुळवून घेण्यासाठी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील. त्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. या चर्चासत्रांमध्ये तज्ज्ञांनी एआयचा अवैध किंवा हानीकारक वापर होऊ नये, यासाठी जागतिक स्तरावर नियमन आणि मार्गदर्शक तत्त्वे बनविण्याचा आग्रह ठेवला.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एआय कसे वापरता येईल, भाषा अनुवादाचे एआय उपयोजन, ग्रामीण भागात एआय आधारित सेवांचा वापर यावरही चर्चा करण्यात आली. भारतीय लष्कराने व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम, डीपफेक डिटेक्शन, एआय फेशियल रेकग्निशन सिस्टिम अशा एआय आधारित प्रकल्पांचे विविध उपयोग सादर केले. या प्रकल्पांची भविष्यात सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनात मदत होऊ शकेल. समिटम ध्ये केवळ चर्चासत्रेच आयोजित करण्यात आली होती, असे नाही तर विविध एआय सेवा, उत्पादने आणि तंत्रज्ञानाचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले. शिक्षणात तर भाषा अनुवाद, डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्म्स यासाठी एआयचा वापर होतच आहे; पण आरोग्यसेवांमध्येही एआय मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहे. एमआरआय, एक्स रे आणि विविध चाचण्यांच्या रिपोर्टस्वरून एआयच्या मदतीने व्याधी निदान केले जात आहे. त्यात अचूकताही येत आहे आणि विशेष म्हणजे या निदानाला अगदी नगण्य वेळ लागत आहे. सुरक्षा तंत्रज्ञानात डीपफेक शोधणे, फेशियल रेकग्निशन, व्हेईकल ट्रॅकिंग यामुळे मानवी चुका होण्याची शक्यता खूपच कमी झाली आहे. ऊर्जा व्यवस्थापन, हवामान अंदाज अशा क्षेत्रांमध्ये मशीन लर्निंग आधारित डेटा मॉडेल्सचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. हे आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये सुरू झालेला एआयचा वापर या प्रदर्शनात दिसून आला. विशेषत: डेटा ॲनॅलिसिस करावे लागणाऱ्या क्षेत्रांसाठी तर एआय आणि मशिन लर्निंग वरदान ठरत आहे.

एका कंपनीने क्रिकेट प्रशिक्षणात एआय किती महत्त्वाची भूमिका बजावू शकते, याचे प्रात्यक्षिक दाखवले. यात खेळाडूच्या गोलंदाजी किंवा फलंदाजीच्या शैलीचे चित्रीकरण करून एआयकडून विश्लेषण केले जाते. यात त्या खेळाडूच्या अगदी बारीक चुकाही दाखवल्या जातात आणि त्यात काय सुधारणा हवी आहे, ते सांगितले जाते. त्यामुळे प्रशिक्षकांचे आणि खेळाडूंचे काम सोपे होते. हे तंत्रज्ञान जनजीवनात विविध समस्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे. पुरुष, स्त्री, युवा किंवा वृद्ध अशा सर्वांनाच एआयचा लाभ मिळू शकेल. 'एआय इम्पॅक्ट समिट २०२६' सर्वसमावेशक, जागतिक दृष्टिकोनातून-एआयचा उपयोग, धोके, नियम, सामाजिक परिणाम आणि करीअरच्या संधी याबद्दलची साधकबाधक चर्चा करणारे मोठे व्यासपीठ ठरले. या समिटचा प्रभाव सुगम एआय आणि एआय-एनेबल्ड भविष्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

## आँखो देखा हाल

**भारत मंडपम ही जागतिक दर्जाचे इव्हेंट्ससाठी दृष्टीने उत्तम जागा आहे. इथे अशा मोठ्या इव्हेंट्ससाठी लागणाऱ्या सर्व अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. दालने आणि प्रदर्शनाची जागा प्रशस्त आणि भव्य आहेत. 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६'साठी सर्वांनाच मोफत प्रवेश असल्याने या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या किंवा त्यात रस असणाऱ्यासाठी ही मोठी पर्वणी होती. साहजिकच इथे मोठी गर्दीही होती. गर्दी आणि सुरक्षेचे उपाय यामुळे हव्या त्या दालनापर्यंत जाण्यासाठी किमान अर्धा ते पाऊण तास लागत होता. उपस्थितांमध्ये सुमारे ८० टक्के पुरुष असले, तरी महिलाही मोठ्या संख्येने हजर होत्या. या परिषदेला हजेरी लावणाऱ्यांमध्ये परदेशी नागरिकांची संख्याही मोठी होती. विशेष म्हणजे इथे अनेक लोक पारंपरिक वेशभूषांमध्ये दिसले. चर्चासत्रांमध्ये जागतिक कीर्तीच्या दिग्गजांचा सहभाग असल्यामुळे उपस्थितांना त्यांचे अनुभवाचे बोल ऐकून या क्षेत्राच्या बऱ्याच 'इनसाईट्स' मिळाल्या. या ठिकाणी प्रदर्शनात अनेक कंपन्यांचे स्टॉल्स असल्यामुळे त्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. त्यामुळे या परिषदेच्या निमित्ताने स्टॉल्सना भेट देणाऱ्या आणि स्टॉल्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळींना 'बिझनेस नेटवर्किंग'ची मोठी संधी उपलब्ध झाली.**